जनमाध्यम

✦ अमरावती, शनिवार ७ नोव्हेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०

एक प्रतिष्ठित सवय

दादा हयात असते तर दोन्ही राष्ट्रवादी आज एकत्र दिसले असते



सुनील तटकरे यांचा दावा

मुंबई/प्रतिनिधी- राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे नेते प्रफुल पटेल यांनी गुरुवारी रात्री ब्रीच कँडी रूग्णालयात शरद पवार यांची भेट घेतली. ज्यानंतर शरद पवार यांनी आपण १० तारखेनंतर एकत्र बसू असं प्रफुल पटेल यांना सांगितलं. याबाबत विविध चर्चा घडू लागल्या. दरम्यान सुनील तटकरे यांनी आता दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाबात भाष्य केलं आहे. आज अजित पवार हयात असते तर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र दिसले असते असं तटकरे यांनी म्हटलं आहे.

अजितदादा असते तर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस आज एकत्र दिसल्या असत्या असं वक्तव्य सुनील तटकरे यांनी केलं आहे. सुनील तटकरे म्हणाले, अजितदादा हयात असताना विलीनीकरणाची चर्चा त्यावेळी नक्की झाली होती. विलीनीकरण कसं होणार तेदेखील त्यांनी सांगितलं होतं. अजितदादा असते तर १२ फेब्रुवारीला विलीनीकरण झालं असतं. अजितदादांच्या प्रखर इच्छाशक्तीतून हे घडलं असतं. मी अजितदादांचा जवळचा सहकारी होतो. त्यामुळे मला हा विषय माहीत आहे असं सुनील तटकरे यांनी केलं आहे. अजित पवार यांचं २८ जानेवारीला अपघाती निधन झालं. त्यामुळे पुढे गोष्टी घडल्या नाहीत असंही सुनील तटकरे यांनी म्हटलं आहे.

अजित पवारांच्या निधनानंतर विलीनीकरणाच्या चर्चा रंगल्या होत्या

अजित पवार यांचा २८ जानेवारी २०२६ ला विमान अपघात झाला आणि यातच त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांचं विलीनीकरण होणार याच्या चर्चा रंगल्या होत्या. मात्र चर्चा अजित पवारांशी झाली आहे त्यामुळे आता ते नाहीत तर तो विषयही संपल्यात जमा आहे असं वक्तव्य सुप्रिया सुळेंनी केलं होतं. दरम्यान अजित पवार यांच्याशी विलीनीकरणाच्या चर्चा झाल्या होत्या आणि ते हयात असते तर विलीनकरण झालं असतं असं सुप्रिया सुळेंही म्हणाल्या होत्या. आता सुनील तटकरे यांनी दिलेल्या मुलाखतीत १२ फेब्रुवारीला विलीनीकरण होणार होतं अशी माहिती दिली आहे. तसंच अजित पवार हयात असते तर दोन्ही पक्ष एकत्र झालेले दिसले असते असंही म्हटलं आहे.

विलीनीकरणाच्या चर्चा का सुरू झाल्या? - जुलै २०२३ मध्ये अजित पवार हे शरद पवारांपासून वेगळे झाले होते. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातला मोठा गट घेऊन महायुतीत गेले होते. ज्यानंतर ते उपमुख्यमंत्रीही झाले. तसंच त्यांच्या बरोबर आलेल्या प्रमुख नेत्यांना मंत्रिपदंही मिळाली. २०२४ मध्ये ज्या विधानसभा निवडणुका झाल्या त्यातही अजित पवारांच्या पक्षाला चांगले आमदार निवडून आणता आले. दरम्यान २०२६ मध्ये अजित पवार आणि शरद पवार यांचे दोन्ही पक्ष एकत्र येतील या चर्चा सुरू झाल्या होत्या. १२ डिसेंबर २०२५ ला शरद पवारांच्या वाढदिवसाच्या दिवशी अजित पवार यांनी दिल्लीत जाऊन त्यांची भेट घेतली होती. त्यांना शुभेच्छा दिल्या होत्या.

उच्च न्यायालय बॉम्बने उडविण्याची धमकी

मुंबई : मुंबईतील ऐतिहासिक आणि अत्यंत सुरक्षित मानल्या जाणा-या मुंबई उच्च न्यायालयाला लक्ष्य करण्याची धमकी एका ई-मेलद्वारे देण्यात आली आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, उच्च



न्यायालयाच्या प्रशासकीय विभागाला गुरुवारी रात्री उशिरा एक ई-मेल प्राप्त झाला. ज्यामध्ये अत्यंत आक्षेपार्ह भाषेत, मुंबई उच्च न्यायालयाची इमारत बॉम्बने उडवून दिली जाईल असा स्पष्ट उल्लेख करण्यात आला होता. प्रशासनाने या गंभीर ई-मेलची तात्काळ दखल घेत मुंबई पोलिस आयुक्तालय आणि स्थानिक आझाद मैदान पोलिस ठाण्याला याची माहिती दिली. रात्रीपासूनच पोलिस प्रशासन ॲक्शन मोडमध्ये आले. सुरक्षा यंत्रणांनी तात्काळ मुंबई उच्च न्यायालयाच्या हेरिटेज इमारतीला, तसेच नवीन विस्तारित परिसराला वेढा घातला. सुरक्षेचा उपाय म्हणून न्यायालय परिसरातील प्रत्येक कोप-याची कसून तपासणी करण्यात येत आहे.

लोकशाही वाचवायची असेल तर 'गोकुळ' सोडा-राज ठाकरे

मुंबई/प्रतिनिधी- गोकुळ दूध संघाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीवरून सध्या राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. महायुती सरकारने संघावर ५ शासननियुक्त संचालक नेमण्याचा आणि त्यातील ४ जणांना मतदानाचा अधिकार देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे सतेज पाटील यांच्या समविचारी आघाडीच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यावरून आता विरोधक आक्रमक झाले असून, मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी देखील महायुतीवर जोरदार हल्लाबोल करत सतेज पाटील यांना उघड पाठिंबा दर्शवला आहे.

गोकुळच्या सत्तासंघर्षात सतेज पाटलांना राज ठाकरेंचंही बळ मिळाले आहे. राज ठाकरे यांनी नुकतीच एक्सवर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी लिहिले की भारतीय जनता पक्ष हा एक अजब पक्ष आहे. जो खालपासून वरपर्यंत सत्तेत आहे तरीही लोकशाही वाचवा म्हणून मोर्चे काढत आहे. हे जगातील एकमेव उदाहरण असेल जिथे सत्ताधारी पक्ष विरोधी पक्षाच्या विरोधात मोर्चा काढतो. बर लोकशाहीची बूज राखायची खरोखर इतकी इच्छा असेल तर गोकुळ प्रकरणात तुमच्या भाजप पॅनलचे १२ विरोधात सतेज पाटील पॅनलचे



१३ जण निवडून आल्यावर लगेच तुम्ही सरकारचे (म्हणजे तुमचेच) ५ संचालक का नेमले आणि त्यांना मतदानाचा अधिकार देऊन काय सिद्ध करताय तुम्ही ? बरे ते बॅलेट मतदान पद्धतीने आणि लोकशाही मार्गाने निवडणूक लढवून निवडून आले.

तुम्हाला खरंच लोकशाहीची पर्वा किंवा काळजी वाटत असती तर हा असला प्रकार तुम्ही केला नसता. गोकुळवर तुम्हाला सत्ता मिळवता नाही आली म्हणून तुम्ही लगेच तुमची सगळी तत्त्व बाजूला ठेवणार आणि म्हणे लोकशाही वाचवा म्हणून मोर्चे काढणार. सध्या महाराष्ट्रात पाण्याचा भीषण दुष्काळ आणि भारतीय जनता पक्षात समजूतदारपणाचा भीषण दुष्काळ एकाच वेळी कसा यावा, याचेच आश्चर्य वाटते!

लोकशाही वाचवा म्हणून मोर्चे काढतील- सत्तेत असताना ते लोकशाही वाचवा म्हणून मोर्चे काढतील आणि स्वत:च लोकशाहीचा गळा आवळतील. यांच्या काळात अतिरेकी हल्ले झाले, कायदा सुव्यवस्था बिघडली म्हणून दहशतवादापासून देश वाचवा यासाठी मोर्चे काढतील. देशाची अर्थव्यवस्था गाळात गेली आहे म्हणून आता अर्थव्यवस्था वाचवा साठी पण मोर्चे काढतील. भारतीय जनता पक्षाने रडीचा डाव खेळणे बंद करावे. कुठल्या का मार्गाने तुम्ही जे बहुमत मिळवले ते सर्व विरोधी पक्षांनी १२ वर्षे सहन केलं मग आता विरोधी पक्षांकडे या देशातील जनता झुकायला लागली आहे तर त्यापुढे भाजपाने पण सहन करायला शिकले पाहिजे!

कौटुंबिक वादातून ७ जणांची हत्या

बंगळुरू : येथे खळबळजनक घटना उघडकीस आली असून कौटुंबिक वादातून एका कॅब चालकाने पत्नीसह सात जणांची हत्या केली. या घटनेमुळे संपूर्ण शहर हादरले आहे. बंगळुरुच्या राजाजीनगर भागातील



बाशम सर्कलजवळ ही घटना घडली. पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. इंदुशेखर असे आरोपी कॅब चालकाचे नाव आहे. इंदुशेखरचा २० वर्षांपूर्वी सुनिता हिच्याशी विवाह झाला होता. या जोडप्यात वारंवार वाद होत होते. वादात पत्नीचे कुटुंबीय तिला साथ देत होते. यामुळे व्यथित झालेल्या इंदुशेखरने टोकाचं पाऊल उचलत नियोजित कट रचून पत्नीसह सासरच्यांची हत्या केली. आरोपीने सात वर्षांच्या मुलालाही सोडले नाही. हे हत्याकांड उघडकीस आल्यानंतर पोलिसही चक्रावून गेले. इंदुशेखरने आधी आपल्या पत्नीची हत्या केली. तिचा मृतदेह नंदी हिल्स येथे नेऊन तिथे फेकून दिला. त्यानंतर आपल्या सासरच्या मंडळींना घरी बोलावून एकामागून एक त्यांची हत्या केली. आरोपीने सात वर्षांच्या मुलाचीही हत्या केली. त्यानंतर त्याने त्याचे दोन मेहुणे, शिवकुमार आणि शंकर यांना पार्टीच्या बहाण्याने घरी बोलावून दोघांनाही जागीच ठार मारले. त्यानंतर त्याने त्याची सासू रूपावती आणि तिच्या सुना दिव्या आणि नलिनी यांना वेगवेगळ्या बहाण्यांनी घरी बोलावून त्यांची निर्घृणपणे हत्या केली. त्याने शिवकुमारचा सात वर्षांचा मुलगा पुनीत याचीही हत्या केली. आरोपीने हत्या करण्यासाठी घरात ठेवलेल्या एका जड जात्याचा वापर केला. हत्या केल्यानंतर आरोपीने रक्ताचे डाग स्वच्छ केले. हत्यांमध्ये वापरलेला जात्याचा दगडही ➪(पान २ वर)

'ई २०' पेट्रोलच्या नावाखाली ३१ टक्क्यांपर्यंत इथेनॉलची विक्री

बंगळूरू : देशभरात विक्री होणा-या ई २० पेट्रोलवरून निर्माण झालेला वाद आता पुन्हा सुरु होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सरकार आणि तेल कंपन्या पेट्रोलमध्ये केवळ २० टक्के इथेनॉल मिसळत असल्याचा दावा करत असल्या, तरी कर्नाटक सरकारने



घेतलेल्या पेट्रोलच्या नमुन्यांमध्ये ठरवून दिलेल्या २० टक्के मर्यादेपेक्षा कितीतरी जास्त इथेनॉल आढळल्याचा धक्कादायक दावा केला आहे. काही पेट्रोल पंपांवर तर हे प्रमाण थेट ३१.२ टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. या प्रकारामुळे ग्राहकांच्या वाहनांचे आतोनात नुकसान होत असून कर्नाटक सरकारने हा तपासणी अहवाल केंद्र सरकारकडे पाठवण्याचा निर्णय घेतला आहे.कर्नाटक सरकारने विविध पेट्रोल पंपांवरून पेट्रोलचे नमुने घेऊन त्याची प्रयोगशाळेत चाचणी केली. इंडियन ऑइल, हिंदुस्तान पेट्रोलियम, भारत पेट्रोलियम, नायरा आणि शेल या नामांकित कंपन्यांच्या पेट्रोल पंपांवरून एकूण ६३ नमुने गोळा करण्यात आले होते. धक्कादायक बाब म्हणजे, ६३ पैकी एकाही पेट्रोल पंपावर नियमानुसार २० टक्के किंवा ➪(पान २ वर)

निवडणूक आयोगाचा मोठा निर्णय

मतदार यादीतून नाव वगळलेल्यांना आणखी एक संधी मिळणार

मुंबई/प्रतिनिधी- गेल्या काही महिन्यांपासून देशभरात केंद्रीय निवडणूक आयोगाच्या माध्यमातून विशेष सखोल पुनरीक्षण मोहीम राबवली जात आहे. या एसआयआर प्रक्रियेवरून आरोप-प्रत्योपही सुरू आहेत, त्यामुळे राजकारणही चांगलंच तापलेलं आहे. अनेक ठिकाणी मतदार याद्या देखील जाहीर करण्यात आल्या आहेत, तर काही राज्यात लाखो मतदारांची नावं मतदार यादीतून वगळण्यात आले आहेत. मतदार यादीतून वगळण्यात आलेल्यांच्या संदर्भात आता निवडणूक आयोगाने एक मोठा निर्णय घेतला आहे. ज्या नागरिकांची नावं मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत किंवा चुकीच्या पद्धतीने हटवली गेली आहेत, त्यांना फॉर्म ६ (Form 6) भरून पुन्हा नाव नोंदवण्याची आणखी एक संधी देण्यात आली आहे, म्हणजे निवडणूक आयोगाने मतदार यादीच्या एसआयआर प्रक्रियेदरम्यान मसुदा मतदार यादीमधून वगळलेल्या मतदारांची नावं पुन्हा मतदार यादीत जोडण्यासाठी एक संधी देण्यात आली आहे. दरम्यान, निवडणूक आयोगाने शुक्रवारपासून ही प्रक्रिया पुन्हा ➪(पान २ वर)

अमरावतीचे तहसीलदार विजय लोखंडे अखेर निलंबित

◆ गंभीर प्रशासकीय अनियमिततेचा ठपका ◆ विभागीय चौकशी प्रस्तावित

अमरावती/प्रतिनिधी:- आपल्या अधिकार क्षेत्राचे उल्लंघन करून भूखंड विभाजन, एकत्रिकरण व अकृषक परवानग्यांबाबत गंभीर प्रशासकीय अनियमितता केल्याप्रकरणी अमरावतीचे तहसीलदार विजय लोखंडे यांना राज्य शासनाने तत्काळ प्रभावाने शासकीय सेवेतून निलंबित केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाद्वारे ६ नोव्हेंबर २०२६ रोजी या कारवाईचे आदेश जारी करण्यात आले आहेत.

नकाशा, अकृषक परवानगी व संबंधित नियोजन प्राधिकरणाच्या मान्यतेची शिफारस न तपासता बेकायदेशीर आदेश पारित करणे, तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम १५५ चा गैरवापर करून अधिकार अभिलेखात नवीन ७/१२ उतारे तयार केल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे.



याशिवाय, जमाबंदी आयुक्तांच्या निर्देशानुसार 'ई-हक्क' प्रणाली अनिवार्य असताना ऑफलाइन अर्ज स्वीकारणे, मूळ खातेदारांना वैधानिक नोटीस न बजावणे आणि नैसर्गिक न्यायतत्त्वाचा भंग करत एकतर्फी निर्णय देणे अशा अनेक गंभीर त्रुटी त्यांच्या कामकाज पद्धतीत आढळून आल्या आहेत. या कृतीमुळे महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ चे उल्लंघन झाले असून, लोखंडे यांच्याविरोधात महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम-८ नुसार विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. निलंबन कालावधीत विजय लोखंडे यांचे मुख्यालय जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे निश्चित करण्यात आले असून जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय त्यांना मुख्यालय सोडता येणार नाही. तसेच नियमानुसार त्यांना निलंबन निर्वाह भत्ता अनुज्ञेय राहील, मात्र या काळात त्यांना कोणताही खासगी व्यवसाय किंवा नोकरी करता येणार नाही.

संतोष आठरे नवे तहसीलदार- विजय लोखंडे यांच्या निलंबनामुळे रिक्त झालेल्या अमरावती तहसीलदार पदावर महसूल विभागाकडून तात्काळ प्रशासकीय व्यवस्था करण्यात आली आहे. विभागीय आयुक्त कार्यालयातील सामान्य प्रशासनाचे तहसीलदार असलेले संतोष राधाकिसन आठरे यांची सार्वजनिक सेवेच्या हितार्थ आणि प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने अमरावती येथील रिक्त पदावर बदली करण्यात आली असून, त्यांना तात्काळ ९ नोव्हेंबर २०२६ रोजी नवीन पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

दहावी आणि बारावीच्या परीक्षा १६ फेब्रुवारीपासून सुरू

नवी दिल्ली/वृत्तसंस्थाकेंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने २०२७ मध्ये होणाऱ्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या बोर्ड परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले आहे. मंडळाने ६ नोव्हेंबर २०२६ रोजी आपल्या अधिकृत संकेतस्थळावर परीक्षांचे वेळापत्रक प्रसिद्ध केले. त्यानुसार, दहावी आणि



बारावी बोर्डाच्या परीक्षांना १६ फेब्रुवारी २०२७ पासून सुरुवात होणार आहे. त्यामुळे परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना आता अभ्यासाचे नियोजन करणे सोपे होणार आहे. सीबीएसईच्या वेळापत्रकानुसार, इयत्ता दहावीच्या परीक्षा १६ फेब्रुवारी ते ९ मार्च २०२७ या कालावधीत पार पडणार आहेत. यंदा दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी एकूण ८३ विषयांच्या परीक्षा आयोजित करण्यात येणार आहेत. प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र परीक्षा तारीख निश्चित करण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या विषयानुसार अधिकृत वेळापत्रक तपासून घ्यावे. इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षांनाही १६ फेब्रुवारी २०२७ पासून सुरुवात होईल. मात्र, बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक तुलनेने अधिक मोठे असून, शेवटचा पेपर ९ एप्रिल २०२७ रोजी होणार आहे. बारावीच्या ➪(पान २ वर)

WCL विरोधातील लढा आता पेटला!

हजारो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत बच्चू कडूंच्या नेतृत्वात दिवा लावा आंदोलन



भद्रावती/प्रतिनिधी:- शेतकऱ्यांच्या जमिनी कवडीमोल दराने घेऊन त्यांच्या भविष्याचा प्रश्न अनुत्तरित ठेवण्याच्या विरोधात बच्चू कडू यांच्या नेतृत्वात आयोजित दिवा लावा आंदोलन हजारो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत उत्स्फूर्तपणे पार पडले. चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी एकजूट दाखवत WCL आणि प्रकल्प व्यवस्थापनाच्या विरोधात जोरदार आवाज बुलंद केला. दिव्याच्या प्रकाशातून पेटलेली संघर्षाची ज्योत आता व्यापक लढ्याचे रूप घेत असल्याचे चित्र यावेळी पाहायला मिळाले.

शेतकऱ्यांच्या जमिनी अवघ्या १७ हजार ते ५० हजार रुपये प्रति एकर दराने घेण्यात आल्याचा आरोप असून, त्याबदल्यात किमान ३० लाख रुपये प्रति एकर मोबदला देण्यात यावा, प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना कायमस्वरूपी नोकरी मिळावी, शेतीसाठी २४ तास वीज उपलब्ध करून द्यावी आणि भूजल पातळी खोल गेल्याने सौरपंप बंद पडलेल्या शेतकऱ्यांना कृषी पंप उपलब्ध करून द्यावेत, अशा प्रमुख मागण्या आंदोलनातून करण्यात आल्या.

बच्चू कडू यांनी हा लढा केवळ ५०० प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांपुरता मर्यादित नसून संपूर्ण चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या हक्कांचा प्रश्न असल्याची भूमिका मांडली. शेतकऱ्यांच्या जमिनीवर प्रकल्प उभे राहत असतील, तर त्यांच्या पुढच्या पिढीच्या रोजगाराची आणि भविष्याची जबाबदारीही प्रकल्प व्यवस्थापनाने स्वीकारली पाहिजे, असा ठाम मुद्दा यावेळी उपस्थित करण्यात आला.

या आंदोलनाला शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे पाठबळ लाभले. बच्चू कडू यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांच्या प्रश्नांना व्यापक व्यासपीठ मिळाले. हजारो शेतकऱ्यांनी दिवे पेटवून आपल्या मागण्यांसाठी एकजूट दाखवली. हे आंदोलन केवळ प्रतीकात्मक न राहता शेतकऱ्यांच्या असंतोषाचा आणि न्यायाच्या मागणीचा बुलंद आवाज ठरले. ➪(पान २ वर)

दर्शनाला निघालेल्या भाविकांच्या कारचा अपघात

४ जणांचा मृत्यू, २ गंभीर जखमी

सोलापूर - पुणे-सोलापूर महामार्गावरील मोहोळ तालुक्यातील शेटफळ ते तेलंगवाडी गावादरम्यान कार आणि कंटेनरचा भीषण अपघात झाला. भरधाव वेगात असलेली कार समोर जात असलेल्या कंटेनरला जोरात धडकला. या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला असून दोघे गंभीर जखमी झाले आहेत. प्राथमिक माहितीनुसार भारंबे कुटुंबीय अक्कलकोटला देवदर्शनासाठी शुक्रवारी



सकाळी कल्याणहून निघाले होते. दुपारी ४ च्या सुमारास मोहोळ तालुक्यातील शेटफळजवळ कंटेनरला धडक दिल्याने ही दुर्दैवी घटना घडली. दरम्यान जखमी रुग्णांना खासगी रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या अपघातात आठ वर्षाच्या चिमुकल्यासह तिघांचा जागीच मृत्यू तर अन्य दोन जण अपघातात गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. मृतांमध्ये पार्थ तुषार भारंबे (वय ८), विलास चांगु भारंबे (वय ६६) आणि शोभा विलास भारंबे (वय ६३) अशी मृत लोकांची नावे समोर आली आहेत. तुषार विलास भारंबे आणि पूनम तुषार भारंबे हे पती-पत्नी जखमी झाले आहेत.



जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

e paper www.janmadhyam.com

पान १ व १० वरून

गोरगरिबांची दिवाळी क्लेशदायक!

मुंबई/ पुणे : शहरांमध्ये रोषणाईचा झगमगाट आणि बाजारात कोट्यवधींची उलाढाल होत असताना, देशाचा अन्नदाता असलेल्या ग्रामीण भागात मात्र यंदाची दिवाळी अत्यंत क्लेशदायक ठरली आहे. सततची नापिकी, परतीच्या पावसाने केलेली फसवणूक आणि शेतीमालाला न मिळालेला हमीभाव यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे. त्यातच गरिबांचा मुख्य आधार असलेली शासकीय रेशन व्यवस्था ऐन सणासुदीत कोलमडल्याने ग्रामीण भागातील गोरगरिबांच्या ताटातील हक्काचा घास हिरावला गेला आहे. शेतात राबणा-या शेतमजुरांच्या आणि अल्पभूधारक शेतक-यांच्या घरात यंदा दिवाळीचा दिवा पेटणेही कठीण झाले असून, सणाचा आनंद तर दूरच, पण पुढील महिना कसा काढायचा? या विवंचनेने ग्रामीण जनतेचे जीणे अस केले आहे.शहरी भागातील चकचकाटापासून दूर असलेल्या राज्यातील ग्रामीण भागात यंदाची दिवाळी अत्यंत शांत आणि गरिबीच्या छायेत साजरी झाली. खरीप हंगामातील पिके हातातून गेल्यामुळे शेतक-यांकडे पैसा उरलेला नाही, तर शेतीकामे ठप्प झाल्याने शेतमजुरांच्या हाताला काम नाही. अशा दुहेरी संकटात सापडलेल्या ग्रामीण जनतेला शासनाच्या आनंदाचा शिधा योजनेकडून मोठी अपेक्षा होती, मात्र तिथेही प्रशासकीय अनागोंदीचा फटका बसला. ग्रामीण भागातील शेकडो गावांमधील रेशन दुकानांवर दिवाळी संपत आली तरी धान्याचा पुरवठा झाला नाही.



दहावी आणि बारावीच्या परीक्षा

विद्यार्थ्यांसाठी एकूण १२१ विषयांच्या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. विद्यार्थ्यांनी आपल्या शाखेनुसार आणि निवडलेल्या विषयांनुसार परीक्षांच्या तारखा तपासणे आवश्यक आहे. दहावी आणि बारावीच्या सर्व परीक्षा सकाळी १०.३० वाजता सुरू होतील. परीक्षा केंद्रावर पोहोचण्याची वेळ, आवश्यक कागदपत्रे आणि सोबत नेता येणाऱ्या साहित्याबाबतची सविस्तर माहिती प्रवेशपत्रावर दिली जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी प्रवेशपत्रावरील सर्व सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात. तसेच परीक्षेच्या दिवशी कोणतीही धावपळ होऊ नये, यासाठी वेळेआधी परीक्षा केंद्रावर पोहोचावे.बोर्डाच्या नियमित शाळांमधील विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा आणि प्रकल्पांचे मूल्यमापन १ जानेवारी २०२७ पासून सुरू होणार आहे. तर हिवाळी प्रदेशातील शाळांसाठी प्रात्यक्षिक परीक्षा आणि अंतर्गत मूल्यमापनाचे नियोजन वेगळे करण्यात आले होते. या शाळांमधील प्रात्यक्षिक परीक्षा ९ नोव्हेंबर ते १९ डिसेंबर २०२६ या कालावधीत पार पडल्या आहेत.दरम्यान, विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या तयारीसोबतच प्रात्यक्षिक परीक्षा आणि अंतर्गत मूल्यमापनाबाबत आपल्या शाळेकडून माहिती घ्यावी. बोर्डाच्या परीक्षांचे विषयानुसार सविस्तर वेळापत्रक पाहण्यासाठी सीबीएसईच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी.

हजारो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत

या आंदोलनाचे आयोजन निप्पॉन डेंड्रो प्रकल्पग्रस्त (एमआयडीसी) शेतकरी समिती, तालुका भद्रावती यांच्या वतीने करण्यात आले. लोकसभा संघटक मुकेश मनोज जिवतोडे यांनी आयोजनात पुढाकार घेतला, तर प्रमुख उपस्थिती म्हणून ॲड. दीपक चपते, प्रदेशाध्यक्ष, शेतकरी संघटना युवा आघाडी उपस्थित होते.जमिनी घेतल्या असतील तर योग्य मोबदला द्या, प्रकल्प उभारला असेल तर प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना कायमस्वरूपी रोजगार द्या! शेतकऱ्यांच्या मागण्यांवर ठोस निर्णय होईपर्यंत हा लढा सुरूच राहील, असा निर्धार आंदोलनातून व्यक्त करण्यात आला. दिवा छोटा असला तरी संघर्षाची ज्योत मोठी आहे, याची प्रचिती हजारो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या या आंदोलनाने दिली. WCL विरोधातील लढ्याने आता नवे वळण घेतले आहे.

कौटुंबिक वादातून ७ जणांची

स्वच्छ केला. हत्या केल्यानंतर आरोपीने मृतदेह गाडीत भरले आणि बंगळुरुपासून सुमारे ६० किलोमीटर अंतरावर असलेल्या चिक्कबळ्ळापूर जिल्ह्यातील नंदी टेकड्यांच्या आसपासच्या विविध ठिकाणी ते फेकून दिले. कुटुंबातील सदस्य अचानक गायब झाल्याने एका नातेवाईकांनी बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली. पोलिसांनी कुटुंबाचा शोध सुरू केला. तपासादरम्यान पोलिसांना इंदुशेखरवर संशय आल्याने त्याची कसून चौकशी केली. चौकशीत इंदुशेखरने गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी नंदी टेकड्यांजवळून सात वर्षीय पुनीतचा मृतदेह ताब्यात घेतला. पोलिस परिसरात शोध घेत असून त्याच्या घरातून पुरावे गोळा करत आहेत.

'F& 20' पेट्रोलच्या नावाखाली

त्यापेक्षा कमी इथेनॉल असलेले पेट्रोल आढळले नाही. उलट, सर्वच ठिकाणी इथेनॉलचे प्रमाण २० टक्क्यांपेक्षा जास्त होते. राज्यातील ७ जिल्ह्यांमधील नमुन्यांमध्ये तर हे प्रमाण प्रचंड वाढलेले दिसले.

सरकारने सुरुवातीला या नमुन्यांबाबत संबंधित तेल कंपन्यांना विचारणा केली होती. मात्र, कंपन्यांच्या प्रयोगशाळांकडून आणि व्यवस्थापनाकडून यावर कोणतेही स्पष्ट उत्तर न मिळाल्याने अखेर खाजगी प्रयोगशाळेत या चाचण्या करण्यात आल्या, असे राज्य सरकारने स्पष्ट केले.

वाहनचालकांचे दरवर्षी तब्बल १ लाख कोटींचे नुकसान?

पेट्रोलमध्ये प्रमाणाबाहेर इथेनॉल मिसळल्याने वाहनांचे आणि ग्राहकांचे मोठे आर्थिक नुकसान होत असल्याचे कर्नाटक सरकारने म्हटले आहे. पेट्रोलमध्ये इथेनॉलचे प्रमाण जास्त असल्यास वाहनाची इंधन कार्यक्षमता (माइलेज) १० टक्क्यांपर्यंत घसरते. यामुळे राज्यातील आणि देशातील वाहनचालकांना दरवर्षी अंदाजे ६२ हजार कोटी रुपयांचा भुर्दंड सहन करावा लागत आहे. जास्त इथेनॉलमुळे वाहनांच्या इंजिनचे अंतर्गत भाग खराब होतात. पाईप्स आणि इंजिनमध्ये बिघाड झाल्यामुळे दुरुस्ती आणि सर्व्हिसिंगचा खर्च वाढतो, ज्याचा बोजा वर्षाला ३९ हजार कोटींवर जातो.

केंद्र सरकारकडे स्पॉयलेज फंड उभारण्याची मागणी- कर्नाटकचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री रिजवान अरशद यांनी या प्रकरणी केंद्र सरकारने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी केली आहे. 'कंपन्यांच्या मनमानीमुळे आणि चुकीच्या मिश्रणामुळे वाहनचालकांना नाहक सोसावे लागत आहे. त्यामुळे केंद्राने तात्काळ एक 'स्पॉयलेज फंड' तयार करावा. या निधीमधून ज्या वाहनचालकांच्या गाड्यांचे अवाजवी इथेनॉलमुळे नुकसान झाले आहे किंवा ज्यांना आर्थिक फटका बसला आहे, त्यांना नुकसानभरपाई किंवा रिफंड दिला जावा,' असे अरशद यांनी म्हटले आहे. सध्या या गंभीर तपासणी अहवालामुळे देशभरातील तेल कंपन्यांच्या कार्यपद्धतीवर आणि ई २० इंधन धोरणावर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मतदार यादीतून नाव

सुरू केली आहे. त्यानुसार, स्थलांतरित, अनुपस्थित, मृत किंवा दुबार म्हणून नोंद झाल्याने मसुदा मतदार यादीतून वगळलेल्या मतदारांना पुन्हा समावेशासाठी पुन्हा एकदा संधी मिळणार आहे. हा निर्णय दिल्ली, महाराष्ट्र, हरियाणा, आंध्र प्रदेश, झारखंड, तेलंगणा आणि नागालँड या सात राज्यांना लागू असणार आहे. कारण या ठिकाणी अद्याप अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध झालेल्या नाहीत.निवडणूक आयोगाने म्हटलं की, ज्या मतदारांना अर्ज देण्यात आले होते, पण ज्यांची नावं अनुपस्थित, स्थलांतरित, मृत किंवा दुबार म्हणून नोंद झाल्यामुळे मसुदा यादीतून वगळण्यात आले होते, त्यांना आता अंतिम यादीत समावेशासाठी पुन्हा अर्ज सादर करण्याची परवानगी दिली जाणार आहे. आतापर्यंत अशा मतदारांना नवीन नोंदणीसाठी वापरला जाणारा अर्ज, फॉर्म ६, सादर करण्यास सांगण्यात आलं आहे. या सुधारित प्रक्रियेनुसार ते त्यांच्या सध्याच्या निवासस्थानाशी संबंधित असलेल्या मतदार नोंदणी अधिकारी किंवा सहायक मतदार नोंदणी अधिकाऱ्याकडे पूर्ण केलेले अर्ज सादर करू शकतात.

३ लाख ६ हजार

अचलपूर तालुक्यात २९ हजार ०७४ शेतकऱ्यांना १४ कोटी ५३ लाख ७० हजार, अंजनगाव सूर्जी तालुक्यात २३ हजार ३८१ शेतकऱ्यांना ११ कोटी ६९ लाख ५ हजार, भातकुली तालुक्यात २१ हजार ३६८ शेतकऱ्यांना १० कोटी ६८ लाख ४० हजार, चांदूर रेल्वे तालुक्यात ११ हजार ८९७ शेतकऱ्यांना ५ कोटी ९४ लाख ८५ हजार, चांदूर बाजार तालुक्यात १८ हजार ९५६ शेतकऱ्यांना ९ कोटी ४७ लाख ८० हजार, चिखलदरा तालुक्यात ८ हजार ४४ शेतकऱ्यांना ४ कोटी २ लाख २० हजार, दर्यापूर तालुक्यात ३२ हजार ५०० शेतकऱ्यांना १६ कोटी २५ लाख, धामणगाव रेल्वे तालुक्यात २३ हजार ५७ शेतकऱ्यांना ११ कोटी ५२ लाख ८५ हजार, धारणी तालुक्यात १४ हजार ५०८ शेतकऱ्यांना ७ कोटी २५ लाख ४० हजार, मोर्शी तालुक्यात ३० हजार ९९१ शेतकऱ्यांना १५ कोटी ४९ लाख ५५ हजार, नांदगाव खंडेश्वर तालुक्यात २९ हजार १९८ शेतकऱ्यांना १४ कोटी ५९ लाख ९० हजार, तिवसा तालुक्यात ११ हजार २३१ शेतकऱ्यांना ५ कोटी ६१ लाख ५५ हजार, वरूड तालुक्यात ३२ हजार ४४ शेतकऱ्यांना १६ कोटी २ लाख २० हजार इतकी रक्कम जमा करण्यात आली आहे.

तालुकास्तरावरून मंजूरी देण्यात आलेल्या खात्यांना जिल्हास्तरावरून तातडीने मंजुरी देण्यात आली. यानंतर राज्यस्तरावरून शेतकऱ्यांच्या बँक खात्यात मदतीची रक्कम तातडीने जमा करण्यात येत आहे. अद्याप खाते स्विकृती व रक्कम जमा करण्याची प्रक्रिया सुरुच आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या संख्येत वाढ होणार आहे.

७ तास महासमाधीस्थळावर

यादरम्यान गुरुदेव सेवकांनी उपस्थित केला. राष्ट्रसंतांच्या महासमाधीस्थळी शेकडो गुरुदेव भक्त एकत्र येत आत्मक्लेश आंदोलनात सहभागी झाले होते.आंदोलनात चंद्रकांत वानखडे, अमोल मिटकरी, किशोर बळी, ज्ञानेश्वर रक्षक, प्रेमकुमार बोके, डॉ. रघुनाथ वाडेकर, प्रशांत कांबळे, रवी मानव, रुपराव वाघ, डॉ पी आर राजपूत, वैभव वानखडे, अंकुश वाघ, शफीक शहा, ज्ञानेश वाकुडकर, गणेश हलकारे, पंकज आवारे, रोशन कांडलकर, गोविंद पोलाड, हेमंत टाले, डॉ नरेंद्र तराळ, सीमा बोके, सुयोग राजनेकर, अमर वानखडे, राजेश धुरंधर, अंकुश मानकर, राजेश वानखडे, मनोज अंबाडकर, बाळा जगताप, राजाभाऊ जाणे, हरिष पाटील, प्रसाद कुंजेकर, रामेश्वर बरगट, बाबासाहेब शेळके, अक्षय यावले, प्रवीण पाचघरे, मनोहरराव वाघ, अजित पठाण, चेतन कांडलकर, सुशील निमकर, आदी गुरुदेव सेवक उपस्थित होते.

या आहेत प्रमुख मागण्या- श्रद्धांजली पूर्वी घेतलेल्या निवेदनाची स्क्रिप्ट देण्यात यावी. शिवाय, यापुढे पुण्यतिथी महोत्सवात निवेदनाची स्क्रिप्ट निवेदनानंतर गुरुदेव अनुयायांसाठी प्रसारित करावी. पुण्यतिथी महोत्सवात निवेदनात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या जिवनपटांचाच भावनिक उल्लेख असावा. पुण्यतिथी महोत्सवाच्या मंचावर दरवर्षी सर्वधर्मांची प्रतीके लावण्यात यावीत. प्रत्येक धर्माची प्रार्थना संबंधित धर्मगुरूंकडूनच त्यांच्या धर्मपरंपरेनुसारच घेण्यात यावी.

कपाशी लाल्या रोगाच्या

अनेक शेतातील कपाशीचे पीक लाल्या रोगाला बळी पडले. त्यामुळे झाडाची वाढ खुंटली. पाने लाल होऊन बोंडाची अपेक्षित वाढ सुद्धा झाली नाही. रोगाला बळी पडल्याने बोंडासहीत झाडे सुकण्याचे प्रमाणात वाढ झाली असून कोरडवाहू हलक्या जमिनीमधील कपाशी पिकाला मोठ्या प्रमाणात फटका बसत आहे. त्यामुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पादन मिळणे अशक्य असल्याचे शेतकऱ्याचे म्हणणे आहे. नैसर्गिक वातावरण अनुकुल नसल्याने कापूस पिकासोबत तुरीचे पीक सुद्धा अडचणीत सापडण्याची शंका व्यक्त होत आहे. शेतीचा वाढता खर्च आणि नैसर्गिक वातावरणामुळे उत्पादनाची अनिश्चितता यामुळे शेतकरी आर्थिक कोंडीत सापडला. शेतकऱ्यांनी रात्र दिवस मेहनत करून पीक जगविण्यासाठी संघर्ष केला. कर्जबाजारी होऊन आशेने हजारो रुपये पिकावर खर्च केला. परंतु निसर्गाची साथ मिळाली नसल्याने कमी पावसाने सोयाबीन गेले. लाल्या रोगाने कपाशीचे पीक संकटात सापडले. नैसर्गिक प्रतिकूल वातावरणामुळे तुरीचे पिकाला सुद्धा फटका बसण्याची भीती व्यक्त होत आहे. विदारक सत्य असूनही शासन मात्र फक्त मदतीच्या घोषणाचा वर्षाव करून दिवाळी करिता शेतकऱ्याला पाच हजार रुपये मदत करून ढोल पिटत असून शेतकऱ्यांची थट्टा चालविलेली आहे. शेतकऱ्याला आता मदतीच्या घोषणा नको तर त्याच्या कुटुंबाचे जीवनमान सावरण्याकरीता प्रत्यक्ष भरीव आर्थिक मदतीची गरज आहे.

फायनान्स कर्मचाऱ्यांचा मोर्चा

फायनान्स कार्यालयांची तोडफोड करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी.कर्जदारांनी कर्ज भरावे, हीच आमची अपेक्षा आहे. आम्ही कोणालाही त्रास देण्यासाठी जात नाही, मात्र आमच्यावरच हल्ले होत असतील तर आम्ही काम कसे करणार? अशी व्यथा कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली.शेकडो कर्मचारी मोर्चामध्ये सहभागी झाले.

अल्पवयीन मुलीचे अपहरण

करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

१४ साक्षीदारांची तपासणी; दोघे फितूर- या खटल्यात सरकार पक्षाने एकूण १४ साक्षीदार तपासले. त्यापैकी दोन साक्षीदार फितूर झाले. मात्र, उपलब्ध पुरावे आणि साक्षीदारांच्या साक्षींच्या आधारे न्यायालयाने दोन आरोपींवरील आरोप सिद्ध झाल्याचे मान्य केले. पोक्सो कायद्याच्या कलम ६ अंतर्गत दोघांना जन्मठेपेची सश्रम कारावासाची शिक्षा आणि प्रत्येकी २० हजार रुपये दंड ठोठावण्यात आला. अपहरण तसेच ॲक्ट्रॉसिटी कायद्यांतर्गतही विविध कलमांनुसार कारावास व दंडाच्या शिक्षा सुनावण्यात आल्या. या प्रकरणातील अन्य दोन आरोपींची संशयाचा फायदा देऊन मुक्तता करण्यात आली.

पीडितेला नुकसानभरपाईचेही आदेश- न्यायालयाने विविधकलमांनुसार ठोठावलेल्या दंडाची एकूण रक्कम ९० हजार रुपये असून, अपील कालावधी संपल्यानंतर ती पीडितेला देण्याचे आदेश दिले आहेत. याशिवाय महाराष्ट्र पीडित नुकसानभरपाई योजनेअंतर्गत पीडितेला योग्य नुकसानभरपाई देण्याचेही निर्देश न्यायालयाने दिले. सरकार पक्षातर्फे अतिरिक्त शासकीय अभियोक्ता ॲड. मंगेश भागवत यांनी बाजू मांडली. तपासात उपविभागीय पोलीस अधिकारी आशित कांबळे, चांदूर रेल्वेचे तत्कालीन ठाणेदार मंगेश मोहोड, जिल्हा पैरवी अधिकारी पोलीस हेडकॉन्स्टेबल रोहन दुधे आणि महिला पोलीस शिपाई सोनल कुमरे यांनी सहकार्य केले.

विजेच्या तारेच्या संपर्कात

मोटर लावण्यात आली होती. मोटरच्या विजेच्या केबलचा एक जोड उघडा होता, मात्र परिवारातील सदस्यांचे त्याकडे लक्ष गेले नाही. त्याच दरम्यान घरात खेळत असलेली नव्या तिथे पोहोचली आणि तिचा स्पर्श उघड्या विजेच्या तारेला झाला. घटनेची माहिती मिळताच कुटुंबीयांनी तिला तात्काळ आरोग्य केंद्रात नेले. मात्र, तपासणीनंतर डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. यानंतर मृतदेह पोस्टमॉर्टमसाठी अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला. दिवाळीच्या सुरुवातीच्या दिवसांत घडलेल्या या हृदयद्रावक घटनेमुळे इंगोले परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

आ.प्रवीण पोटे पाटील

वाढदिवस साजरा करताना होणारा अनावश्यक खर्च टाळून त्याच पैशातून संकटग्रस्त शेतकरी कुटुंबांना मदतीचा हात देण्याची ही संकल्पना नागरिकांच्या विशेष पसंतीस उतरली. शुभेच्छा, सत्कार आणि दिखाऊपणापेक्षा सामाजिक बांधिलकीला प्राधान्य देत वाढदिवसही समाजोपयोगी उपक्रमातून साजरा करता येतो, याचा आदर्श आमदार प्रवीण पोटे पाटील यांनी या उपक्रमातून घालून दिला.आमदार प्रवीण पोटे पाटील यांच्या या आगळ्यावेगळ्या आणि संवेदनशील उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.

दोन दिवसांत गुटख्याची

अशा एकूण १३ प्रकरणांत प्रतिबंधित गुटख्याची विक्री करणाऱ्यांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. संबंधित आरोपींकडून १ लाख ४६ हजार ४५३ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम आणि अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकासह ब्राह्मणवाडा, मोर्शी, खोलापूर, परतवाडा, शिरखेड, माहुली जहागीर, खल्लार, येवदा, बेनोडा आणि धारणी पोलीस ठाण्यांच्या पथकांनी या मोहिमेत सहभाग घेतला.

समृद्धी महामार्गावर ट्रकची

अन्य दोघांवर उपचार सुरू आहेत. दरम्यान, अपघातानंतर ट्रकचालकाने घटनास्थळावरून पळ काढला. क्रेनच्या मदतीने अपघातग्रस्त वाहने बाजूला करून महामार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यात आली. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पसार ट्रकचालकाचा शोध सुरू आहे.

घरातच गांजाचा साठा;

पोलीस उपनिरीक्षक आशिषकुमार साळुंखे, सचिन होले, सुधीर राऊत, शुभम शर्मा, चंदू वानखडे, सचिन कोकणे, घनश्याम किरोले, जितेश बाबील आणि काजल गुप्ता यांचा सहभाग होता.

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्री.एस.एस.भिंगारकेव ७ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.[illegible]/२०२६
सुरेखा व इतर विरुद्ध निरंक
पुढील ता.०५.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :-
1. Surekha Kishor Bulande, Age 55 yrs. Occ.- Household R/o. Jalaram Nagar, Near Shyam Kirana Shop, Amravati
2. Vandana Dilip Wairale, Age 48 yrs. Occ.- Household R/o. Rajgad Colony S.No. 40/4/1 flat No. 5 Shri Ganesh Apartment, Rahatani Link Road, Opposite Gayatri Building Rahatani, Pune
3. Pradip Bhaurnoji Raut, Age 31 yrs. Occ.- Private Job R/o. Flat No. 102, First Floor Siddhi Oceans Chs Ltd. Plot No. 7/8 Sector-10A, Airoli, Navi Mumbai
4. Bhavari Ramdas Raut, Age 48 yrs. Occ.- Household
5. Shrutika Ramdas Raut, Age 23 yrs. Occ.- Education
6. Rushikesh Ramdas Raut, Age 27 yrs. Occ.- Education Applicant No. 4 to 6 all R/o. Gadge Nagar, Shivaji Nagar, Amravati

-- विरुद्ध --

गैरअर्जदार :- निरंक

[illegible] APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE [illegible]

[illegible]

आज दि.[illegible].२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार, सहायक अधीक्षक, दिवाणी न्यायालय, [illegible] अमरावती
शिक्का

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्री.एस.एस.भिंगारकेव ७ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.[illegible]/२०२६
Manik Suryabhan Lokhande+2
Versus Sachin Manikrao Lokhande
पुढील ता.[illegible].२०२६

जाहीरनामा/सायटेशन

Applicants :-
1. Manik Suryabhan Lokhande, Age 8[illegible] yrs. Occ.- Retired R/o. Gandhi [illegible] Layout Camp, Amravati, Tq. & dist. Amravati-[illegible]
2. Rahul Manikrao Lokhande, Age 54 yrs. Occ.- Service R/o. G 5-01, Kalpataru CHS, Sector 11, New Mumbai Post [illegible] Dist. Thane-[illegible] At Present R/o. F-15, 102, Ivy Apartment, Ivy Estate, Wagholi Pune - 412207
3. Anagha Manikrao Lokhande, Age 4[illegible] yrs. Occ.- Service R/o. [illegible] Layout Camp, Amravati. Tq. & Dist. Amravati-4446[illegible]

-- Versus --

Non-Applicant Sachin Manikrao Lokhande, Age 51 yrs. Occ.- Service, R/o. [illegible] Holly Ave SE, Black Diamond WA 98010 [illegible] Mob. No.- [illegible] - E-mail [illegible]@gmail.com

[illegible] Pushpa Manikrao Lokhande [illegible] Manik Suryabhan Lokhande+2 Versus Sachin Manikrao Lokhande [illegible] APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE [illegible]

[illegible] Manik Suryabhan Lokhande +2 Versus Sachin Manikrao Lokhande [illegible]

आज दि.[illegible].११.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार, सहायक अधीक्षक, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती
शिक्का

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्री.आर.आर.खामतकर ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.[illegible]/२०२६
किरण व तीन वि.निरंक
पुढील ता.०४.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :- 1. किरण कृष्णा गायकवाड, वय ३५ वर्षे, व्यवसाय- गृहिणी
२. [illegible] कृष्णा गायकवाड, वय [illegible] वर्षे, व्यवसाय- शिक्षण
३. [illegible] कृष्णा गायकवाड, वय [illegible] वर्षे, व्यवसाय- [illegible]
[illegible]
४. [illegible]

-- विरुद्ध --

गैरअर्जदार- NIL

[illegible] APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE [illegible]

[illegible]

आज दि.[illegible] रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार, सहायक अधीक्षक, दिवाणी न्यायालय [illegible] अमरावती
शिक्का

मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील

किरकोळ (RMJC) अर्ज क्र.३००/२०२६ — नै.ता.०२.१२.२०२६

१. निलिमा सुरेशराव मेहरे
२. श्रीकांत सुरेशराव मेहरे
३. कृष्णकांत सुरेश मेहरे
४. निकिता सुरेशराव मेहरे सर्व रा. [illegible] ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

// वि //

निरंक

ज्याअर्थी मयत सुरेश विश्वनाथजी मेहरे यांचा मृत्यू दि.१७.०५.२०२६ मध्ये नांदगाव खंडेश्वर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. [illegible] विमल विश्वनाथजी मेहरे यांचा मृत्यू दि.१०.०७.२०१८ मध्ये [illegible], ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. [illegible] अर्जदार क्र.१ ही पत्नी असून अर्जदार क्र. २ व ३ ही मुलं आणि अर्जदार क्र.४ ही मुलगी आहे. [illegible]

आज दिनांक ३१ ऑक्टोंबर २०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार, सहायक अधीक्षक, मा. दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर
शिक्का

दिवाणी न्यायालय (क.स्तर) नांदगाव खंडेश्वर जिल्हा अमरावती
जन्म/मृत्यू नोंदणीचा आदेश होण्याकरिता दाखल केलेल्या प्रकरणाचा जाहिरनामा

किरकोळ फौजदारी अर्ज क्र.[illegible]/२०२६ — नै.ता.२३/११/२०२६

अर्जदार — आसिया परवीन मतीन खान, वय [illegible] वर्ष, व्यवसाय - घरकाम, [illegible]

... विरुद्ध...

गैरअर्जदार- सचिव तथा जन्म मृत्यु अधिकारी, ग्रामपंचायत नांदसावंगी, जि.अमरावती

ज्याअर्थी अर्जदार [illegible] आसिया परवीन मतीन खान [illegible] जन्म दिनांक १८/०८/[illegible] रोजी नांदसावंगी, ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती येथे झाला. [illegible]

आज दिनांक [illegible]/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार, सही/- सहायक अधिक्षक, दिवाणी व फौजदारी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर
शिक्का

वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा/सायटेशन नोटीस

[illegible] दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) [illegible] जि.अमरावती यांच्या न्यायालयात

अर्जदार : १. अंजू सुधाकर तेलखडे, लग्नानंतरचे नाव- अंजू मनोज वर्मा, वय [illegible] वर्षे, धंदा- घरकाम [illegible] ता.जि.अकोला
२. [illegible] सुधाकर तेलखडे, वय [illegible] वर्षे, धंदा- घरकाम [illegible] जि.अमरावती

-- विरुद्ध --

गैरअर्जदार १. [illegible] सुधाकर तेलखडे, वय [illegible] वर्षे, धंदा- नोकरी [illegible] अमरावती, ता.जि.अमरावती
२. [illegible] वय [illegible] वर्षे, धंदा- घरकाम [illegible] जि.अमरावती
३. [illegible] वय [illegible] वर्ष, धंदा- नोकरी [illegible]

ज्याअर्थी मधुकर बापुराव तेलखडे हे दि.३०.०९.२००९ रोजी मयत झाले. [illegible]

आज दिनांक ०४.११.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

आदेशान्वये, [illegible] दिवाणी न्यायालय, [illegible] दि.०४.११.२०२६
शिक्का

वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा/सायटेशन नोटीस

[illegible] दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) [illegible] जि.अमरावती यांच्या न्यायालयात

अर्जदार : १. अंजू सुधाकर तेलखडे, लग्नानंतरचे नाव- अंजू मनोज वर्मा [illegible]
२. [illegible] सुधाकर तेलखडे, वय [illegible] वर्षे, धंदा- [illegible]

-- विरुद्ध --

गैरअर्जदार १. अमरदिप सुधाकर तेलखडे, वय [illegible] वर्षे, धंदा- नोकरी [illegible]
२. [illegible] वय [illegible] वर्षे, धंदा- घरकाम [illegible]

ज्याअर्थी सुधाकर बापुराव तेलखडे हे दि.[illegible] रोजी मयत झाले. [illegible]

आज दिनांक ०४.११.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

आदेशान्वये, सहायक अधीक्षक, दिवाणी न्यायालय, [illegible] दि.०४.११.२०२६
शिक्का

जाहीर नोटीस

दि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर, जि.अमरावती येथील ए.एम.जोशी, ३ रे सह दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.[illegible]/२०२६ — नै.ता.[illegible].१२.२०२६

अर्जदार - १. कविता मेघश्याम बावनेर, वय [illegible] वर्षे, धंदा - घरकाम
२. योगेश विजय बावनेर, वय [illegible] वर्षे, [illegible]
३. पुष्पा विजय बावनेर, वय [illegible] वर्षे, धंदा - घरकाम [illegible] ता.दर्यापूर, जि.अमरावती

-- विरुद्ध --

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, विजय मेघश्याम बावनेर हे दिनांक [illegible] रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VIII १८२७ चे कलम २ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणेकरिता न्यायालयात अर्ज केला आहे. [illegible] ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना [illegible] वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.[illegible].२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार, सहाय्यक अधीक्षक (प्रशा.) दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
शिक्का

जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

एक प्रतिष्ठित सवय

■ शनिवार, ७ नोव्हेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

अकोलेकरांना दिवाळीची १३२ कोटींची भेट!

पाणीटंचाई निवारणासाठी मोर्णा धरण ते महान जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत जलवाहिनी टाकणार

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या पाठबळामुळे आ. सावरकर यांच्या प्रयत्नांना यश



मुख्यमंत्र्यांनी अकोल्याचे पालकत्व कृतीतून सिद्ध केले!

अकोला शहराच्या पाणीप्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अल्पावधीत या योजनेला मंजुरी दिली. अकोल्याच्या विकासासाठी आणि शहरवासीयांच्या मूलभूत प्रश्नांसाठी मुख्यमंत्री सातत्याने सकारात्मक भूमिका घेत असल्याचे या निर्णयातून स्पष्ट झाले आहे. दिवाळीच्या पूर्वसंध्येला अकोलेकरांना मिळालेली ही १३२ कोटींची भेट म्हणजे पाणीटंचाईच्या संकटावर मात करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल असल्याचे आमदार रणधीर सावरकर यांनी सांगितले. या योजनेच्या मंजुरीसाठी सहकार्य करणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि संबंधित सर्व प्रशासकीय यंत्रणेचे आमदार रणधीर सावरकर यांनी अकोला शहरातील नागरिकांच्या वतीने मनःपूर्वक आभार मानले.

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला शहरावर घोंघावणाऱ्या भीषण पाणीटंचाईच्या संकटावर मात करण्यासाठी राज्य शासनाने अखेर मोठा निर्णय घेतला आहे. शहराच्या संभाव्य पाणीटंचाई निवारणासाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (SDRF) / राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीतून तब्बल १३२.११ कोटी रुपयांच्या योजनेला ६ नोव्हेंबर रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारामुळे आणि आमदार रणधीर सावरकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अकोलेकरांना दिवाळीपूर्वी मोठी भेट मिळाली आहे.

यंदा पावसाने ओढ दिल्याने काटेपूर्णा प्रकल्पातील जलसाठ्यात मोठी घट झाली होती. सप्टेंबर महिन्यात प्रकल्पातील उपयुक्त जलसाठा केवळ १४.८२५ दलघमी म्हणजेच १७.१६ टक्क्यांवर आला होता. सरासरीपेक्षा सुमारे ४० टक्के कमी पर्जन्यमान झाल्याने अकोला शहरावर पाणीटंचाईचे गंभीर संकट निर्माण झाले. सुमारे १० लाख लोकसंख्या असलेल्या शहराची वार्षिक पाणीमागणी २८ दलघमी आहे. सध्या दहा दिवसांच्या अंतराने अकराव्या दिवशी पाणीपुरवठा होत असून, उपलब्ध जलसाठा जानेवारी २०२७ अखेर संपण्याची भीती व्यक्त होत होती.

या पार्श्वभूमीवर मोर्णा धरण ते महान येथील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत जलवाहिनी टाकण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला होता. या प्रस्तावाला मंजुरी मिळावी म्हणून आमदार रणधीर सावरकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. केवळ पत्रव्यवहारावर न थांबता मंत्रालयात प्रत्यक्ष संबंधित विभागांचा पाठपुरावा करण्यात आला. उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडेही सावरकर यांनी ही मागणी लावून धरली होती.

जलवाहिनीसाठी ८७.६७ कोटी, टँकरसाठी ४४.४४ कोटी!

शासनाने मंजूर केलेल्या १३२.११ कोटी रुपयांच्या निधीपैकी ८७.६७ कोटी रुपये मोर्णा धरण ते महान जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत आवश्यक साहित्यासह जलवाहिनी टाकण्यासाठी खर्च केले जाणार आहेत. तर ४४.४४ कोटी रुपये टँकरद्वारे पाणीपुरवठा आणि वितरण व्यवस्थेसाठी मंजूर करण्यात आले आहेत. त्यामुळे संभाव्य पाणीटंचाईच्या काळात पर्यायी पाणीपुरवठ्याची व्यवस्थाही उभी राहणार आहे.

दुष्काळाचे सावट गडद; आ.झनक यांचे प्रशासनाला उपाय योजना करण्याच्या सूचना!



■ प्रतिनिधी | रिसोड ■

संभाव्य दुष्काळी परिस्थिती आणि पाणी टंचाईचे संकट लक्षात घेता नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकण्याची वेळ येऊ नये, यासाठी प्रशासनाने आतापासूनच नियोजनबद्ध उपाययोजना कराव्यात. पाणीटंचाई निवारणाच्या कामात कोणतीही दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही, अशा स्पष्ट सूचना आमदार अमित सुभाषराव झनक यांनी प्रशासनाला दिल्या.

रिसोड-मालेगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमित झनक यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार, ता.५ नोव्हेंबर रोजी पंचायत समिती रिसोड येथील सभागृहात दुष्काळ प्रतिबंधक उपाययोजना व पाणीटंचाई निवारणार्थ आढावा बैठक पार पडली.यावेळी उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर,तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर,गटविकास अधिकारी पल्लवी लांडे यांच्यासह सर्वच विभागातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

रिसोड तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी आवश्यक उपाययोजना, गावनिहाय पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, पाणीपुरवठा योजनांची सद्यस्थिती तसेच भविष्यात उद्भवणाऱ्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर करावयाच्या उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. संबंधित विभागांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. मुख्यतः वीज वितरण आणि ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या संदर्भातील प्रश्नाचा भडिमार गावातील सरपंच ग्रामसेवक मंडळींनी केला.दोन्ही विभागाच्या अधिकाऱ्यांनी सर्व सूचनांचे अंमलबजावणी तत्काळ करण्याची ग्वाही दिली. यावेळी वाशिमचे उपविभागीय अधिकारी, रिसोडचे तहसीलदार, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे शाखा अभियंता, महावितरणचे शाखा अभियंता यांच्यासह तालुक्यातील सरपंच, प्रशासक, उपसरपंच, ग्रामसेवक आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तक्षशिला आयुर्वेद कॉलेजमध्ये आयुर्वेदाचे आद्यदैवत भगवान धन्वंतरी यांची जयंती साजरी



■ प्रतिनिधी | वाशिम ■

दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावती द्वारा संचालित तक्षशिला आयुर्वेद कॉलेज, हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, खेर्डा शुक्रवार, ०६ नोव्हेंबर २०२६ रोजी आयुर्वेदाचे आद्यदैवत भगवान धन्वंतरी यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर,आयुर्वेदाचे आद्यदैवत भगवान धन्वंतरी व श्री.दादासाहेब गवई यांच्या प्रतिमेचे पूजन करून हारार्पण करण्यात आले.याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रदीप पांडव यांनी भगवान धन्वंतरी यांच्या आयुर्वेदातील योगदानाचे महत्त्व सांगितले.आयुर्वेद ही निरोगी जीवन जगण्याची जीवनशैली असून आयुर्वेदाचे ज्ञान आत्मसात करून रुग्णसेवा व समाजसेवेला प्राधान्य द्यावे,असे आवाहन केले.कार्यक्रमातून आयुर्वेदाचे महत्त्व, आरोग्य संवर्धन आणि रुग्णसेवेची प्रेरणा मिळाली.शेवटी आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. 'आरोग्य हीच खरी संपत्ती आणि आयुर्वेद हाच निरोगी जीवनाचा आधार' हा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पंकज पानभरे यांनी केले.

मोटारसायकल चोरीचा छडा; ५० हजारांची दुचाकी जप्त!

वाशिम शहरातील चोरीचा गुन्हा उघडकीस; एक आरोपी ताब्यात



■ प्रतिनिधी | रिसोड ■

रिसोड पोलिसांनी वाहतूक नियंत्रण आणि नाकाबंदी दरम्यान दाखविलेल्या सतर्कतेमुळे वाशिम शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मोटारसायकल चोरीचा गुन्हा उघडकीस आणण्यात यश मिळविले आहे. या प्रकरणी एका संशयित आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून, त्याच्याकडून सुमारे ५० हजार रुपये किमतीची मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे.

४ नोव्हेंबर रोजी रिसोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोलीस अंमलदार सुधाकर सोनार व शिवाजी केंद्रे हे वाहतूक नियंत्रण आणि नाकाबंदी दरम्यान कर्तव्य बजावत असताना एका संशयित इसमास वाहनासह अडवून चौकशी केली. यावेळी सदर वाहन वाशिम शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यातील असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी तत्काळ कारवाई करीत आरोपीला ताब्यात घेतले.

या प्रकरणी आणखी आरोपी तसेच इतर गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असून, पुढील तपासासाठी आरोपी व जप्त मोटारसायकल वाशिम शहर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील, अपर पोलीस अधीक्षक लता फड आणि उपविभागीय पोलीस अधिकारी रामकृष्ण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वात पोलीस पथकाने केली.

प्रत्येकाच्या घरात दिवाळीचा आनंद पोहोचला पाहिजे!

अकोला : दिवाळी हा आनंदाचा, उत्साहाचा आणि प्रकाशाचा सण आहे. जगातील सर्वांत मोठ्या सणांपैकी एक असलेला हा सण प्रत्येकाच्या आयुष्यात सुख, समाधान आणि समृद्धी घेऊन येवो.मात्र, यंदा दुष्काळाच्या परिस्थितीमुळे शेतकरी बांधवांसमोर एक मोठा प्रश्न उभा आहे, तो म्हणजे यंदाची दिवाळी साजरी कशी करायची? शेतकऱ्यांची हीच अडचण लक्षात घेऊन माननीय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांनी दिवाळी शिधा वाटपाचा उपक्रम हाती घेतला असल्याचे विदर्भ शिवसेना प्रवक्ते प्रा प्रकाश डवले यांनी प्रसिध्द पत्रकाद्वारे सांगितले.'मदतीचे तोरण, हेच शिवसेनेचे धोरण!'या ब्रीदवाक्याला अनुसरून ट्रकच्या ट्रक भरून दिवाळी शिधा शेतकरी बांधवांपर्यंत पोहोचविण्याचे काम सुरू आहे. सर्व शिवसैनिकांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांना मदतीचा हात द्यावा.

आयुर्वेद पंचकर्मा प्रदर्शनी आयोजन



■ प्रतिनिधी | कारंजा ■

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनीच्या अमृत महोत्सवी वर्ष २०२६ निमित्त गुरुमंदिर, कारंजा (लाड) येथे दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट,अमरावती द्वारा संचालित तक्षशिला आयुर्वेद कॉलेज, हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, खेर्डा यांच्या वतीने आयुर्वेद पंचकर्मा प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले.या प्रदर्शनीच्या माध्यमातून आयुर्वेदातील प्राचीन उपचारपद्धती, पंचकर्माचे महत्त्व, त्याचे विविध प्रकार तसेच मानवी आरोग्य संवर्धनातील आयुर्वेदाची भूमिका याविषयी नागरिकांना माहिती देण्यात आली. पंचकर्मातील विविध उपचारपद्धतीचे प्रात्यक्षिक, माहितीफलक व मार्गदर्शनाच्या माध्यमातून आयुर्वेद शास्त्राची उपयुक्तता आणि महत्त्व उपस्थितांना समजावून सांगण्यात आले.

या उपक्रमासाठी तक्षशिला आयुर्वेद कॉलेजचे प्राचार्य तथा वैद्यकीय अधीक्षक डॉ.प्रदीप पांडव यांनी विशेष मार्गदर्शन केले.त्यांनी आयुर्वेदाचे शास्त्रीय ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे तसेच पारंपरिक उपचारपद्धतींबाबत जनजागृती करण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

फटाक्यांचा धूर नको, निसर्गाचा श्वास हवा!

■ प्रतिनिधी | कारंजा ■

दिवाळी म्हणजे आनंदाचा, प्रकाशाचा आणि उत्साहाचा सण! मात्र या आनंदाच्या उत्सवात फटाक्यांचा धूर, कर्णकर्कश आवाज आणि वाढते प्रदूषण यामुळे पर्यावरणासह माणसांच्या आरोग्यावरही गंभीर परिणाम होत आहेत. हीच बाब लक्षात घेऊन, गोविंद स्कूल, कारंजा येथे विद्यार्थ्यांना प्रदूषणमुक्त दिवाळीचे महत्त्व पटवून देत पर्यावरण संवर्धनाची शपथ देण्यात आली.

या उपक्रमात शाळेतील मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विद्यार्थ्यांनी हात पुढे करून प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करण्याची सामूहिक शपथ घेतली. केवळ स्वतःच फटाके न फोडता आपल्या कुटुंबीयांना, मित्रांना आणि समाजातील इतर नागरिकांनाही याबाबत जागरूक करण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी केला. यावेळी विद्यार्थ्यांना फटाक्यांमुळे निर्माण होणाऱ्या वायुप्रदूषण आणि ध्वनिप्रदूषणाचे दुष्परिणाम समजावून सांगण्यात आले. फटाक्यांच्या धुरामुळे दमा, श्वसनाचे विकार, डोळ्यांची जळजळ आणि श्वसनासंबंधी त्रास होऊ शकतो. तसेच मोठ्या आवाजामुळे लहान मुले, वृद्ध व्यक्ती, आजारी रुग्ण आणि पशुपक्ष्यांनाही त्रास सहन करावा लागतो. फटाक्यांमुळे होणारे अपघात आणि भाजण्याच्या घटनाही चिंतेचा विषय आहेत. या उपक्रमातून शाळेने विद्यार्थ्यांमध्ये केवळ पुस्तकी ज्ञान न देता पर्यावरणाविषयी संवेदनशीलता, सामाजिक जाणीव आणि जबाबदार नागरिकत्वाचे संस्कार रुजविण्याचा स्तुत्य प्रयत्न केला. आज या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी घेतलेली शपथ उद्याच्या समाजासाठी एक मोठा संदेश देणारी आहे. कारण पर्यावरणाचे रक्षण ही केवळ शासनाची किंवा एखाद्या संस्थेची जबाबदारी नसून ती आपल्या प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे.

समृद्धी महामार्गावर ट्रक उलटून भीषण अपघात; चालकासह क्लीनर जखमी

■ प्रतिनिधी | कारंजा ■

समृद्धी महामार्गावरील मुंबई कॉरिडॉरवर गुरुवारी (दि. ५ नोव्हेंबर) दुपारी ३.४५ वाजताच्या सुमारास ट्रकचा भीषण अपघात झाला. चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रक महामार्गावरून खाली कोसळला. या अपघातात ट्रक चालकासह क्लीनर असे दोघे जण जखमी झाले.

33E8169 क्रमांकाचा हा ट्रक छत्तीसगडहून मुंबईच्या दिशेने जात होता. अपघातात दिलीप घोष (वय २६) आणि राहुल घोष (वय २७), दोघेही रा. कोलकाता, पश्चिम बंगाल, हे जखमी झाले.

घटनेची माहिती मिळताच समृद्धी महामार्गावरील १०८ घ्य-०८ रुग्णवाहिकेचे पायलट रवी ऊर्फ सोनू शिंदे आणि वैद्यकीय अधिकारी डॉ. आशुतोष मुठाळ यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जखमींना त्वरित कारंजा उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर पुढील उपचारासाठी त्यांना अमरावती येथे हलविण्यात आले.

या बचावकार्यात श्री गुरुमाऊली रुग्णवाहिकेचे रुग्णसेवक रमेश देशमुख, समृद्धी रुग्णवाहिकेचे श्याम घोडेस्वार आणि आई एकविरा रुग्णवाहिकेचे चालक विनोद खोंड यांनीही सहकार्य केले. यावेळी समृद्धी महामार्ग अग्निशमन दलाचे जवान आणि पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

काशी पोहरादेवी संत नगरीत गोमातेचा जयघोष !

राज्यातील पहिल्याच ऐतिहासिक गोदान सोहळ्याने रचला नवा अध्याय!

■ प्रतिनिधी | मानोरा ■

बंजारा समाजाची काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र पोहरादेवी येथे दीपावलीच्या पहिल्याच दिवशी वसुबारसच्या शुभमुहूर्तावर भव्य व ऐतिहासिक गोदान आणि गोपूजन महासोहळा मोठ्या थाटामाटात पार पडला. आद्य गोरक्षक संत सेवालाल महाराज यांच्या गोदान परंपरेला उजाळा देण्यासाठी ५ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजता शेकडो संत-महंतांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

महासोहळ्याच्या प्रारंभी धर्मगुरु आमदार बाबूसिंग महाराज यांच्या हस्ते वसुबारसच्या मुहूर्तावर गोमातेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर संत रामराव महाराज मंदिरात महाआरती व अरदास करण्यात आली. यावेळी देवी बापू भक्त महंत शेखर महाराज यांनी भोग अर्पण केला. गोदान संवाद विचारपीठावर भागवत महर्षी संत मनीष भाईजी (भागवत धाम), आचार्य विष्णू महाराज (मध्य प्रदेश), विष्णू गिरी महाराज (महामंडलेश्वर), रामदास महाराज (गराशागड), अंकुशानंद महाराज (बासर), प्रेमचंद महाराज (वृंदावन धाम), बंडू महाराज दापेकर, जगदीश भारती, कैलास महाराज, शेखर महाराज पिंपळगाव, गोवर्धन राठोड आर्णी, पंकज महाराज, भाजप नेते देवीदास राठोड, मंगल नायक (उत्तर प्रदेश), रतन नायक (तेलंगणा), महंत सुनील महाराज, शेखर महाराज, संजय महाराज व भक्तराज महाराज राठोड यांच्यासह अनेक संत-महंतांची उपस्थिती होती.

'प्राची' उपक्रमातून ग्रामीण विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला नवे व्यासपीठ

■ प्रतिनिधी | वाशिम ■

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांची आवड निर्माण व्हावी आणि त्यांची शैक्षणिक गुणवत्ता विकसित व्हावी, या उद्देशाने जिल्हा परिषद वाशिमच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांच्या संकल्पनेतून तसेच माध्यमिक शिक्षणाधिकारी मंगला धूपे व प्राथमिक शिक्षणाधिकारी विठ्ठल भुसारे यांच्या मार्गदर्शनाखाली 'PRACHI' (Preparing Rural Achievers for Competitive Exam Honours and Incentive Scheme – गुणवत्तेची नवीन पहाट) हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत आयोजित तीन शिष्यवृत्ती सराव परीक्षांच्या मालिकेतील पहिली परीक्षा ३ नोव्हेंबर २०२६ रोजी जिल्ह्यातील ७१ केंद्रांवर शिस्तबद्ध व शांततापूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडली. या परीक्षेला जिल्हा परिषद शाळांमधील इयत्ता चौथी व सातवीच्या मराठी आणि उर्दू माध्यमातील एकूण १० हजार ५५४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने आणि आत्मविश्वासाने परीक्षेत सहभाग घेतला. मुख्य शिष्यवृत्ती परीक्षेपूर्वी परीक्षेच्या वातावरणाचा अनुभव मिळावा, उत्तरपत्रिका भरण्याचा सराव व्हावा तसेच परीक्षेविषयीची भीती दूर व्हावी, या उद्देशाने या सराव परीक्षेचे आयोजन करण्यात आले. परीक्षेच्या स्वरूपात सहभागी होण्याची संधी मिळाल्याने विद्यार्थ्यांना आपल्या तयारीचे मूल्यमापन करता आले. यामुळे त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होण्यास मदत झाली आहे.

पीएमएफएमई योजनेंतर्गत डीएलसी लाभार्थ्यांसाठी तीन दिवसीय प्रशिक्षण संपन्न

■ प्रतिनिधी | वाशिम ■



प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना अंतर्गत जिल्हास्तरीय समिती लाभार्थ्यांची तांत्रिक क्षमता वृद्धिंगत करून त्यांना सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांच्या स्थापनेसाठी व यशस्वी संचालनासाठी सक्षम करण्याच्या उद्देशाने कृषी विज्ञान केंद्र, वाशिम आणि कृषी विभाग, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ३ ते ५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत विधाता प्रशिक्षण सभागृह, वाशिम येथे तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. आर. एल. काळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न झाला.

या प्रशिक्षणादरम्यान अन्न प्रक्रिया तंत्रज्ञान, कृषी उत्पादनांचे मूल्यवर्धन, अन्नपदार्थांची गुणवत्ता व सुरक्षितता, स्वच्छता मानके, पॅकेजिंग तंत्रज्ञान, उद्योजकता विकास तसेच उद्योग व्यवस्थापन या महत्त्वपूर्ण विषयांवर तज्ज्ञांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

शुभांगी वाटाणे (कार्यक्रम सहाय्यक, गृहविज्ञान) यांनी अन्न प्रक्रिया तंत्रज्ञान, कृषी उत्पादनांचे मूल्यवर्धन, अन्नपदार्थांची गुणवत्ता व सुरक्षितता, अन्न प्रक्रिया उद्योगातील स्वच्छता मानके आणि शास्त्रीय पॅकेजिंग पद्धती याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. एस. के. देशमुख यांनी सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांचे आर्थिक व व्यावसायिक महत्त्व, उद्योग स्थापनेसाठी आवश्यक पूर्वनियोजन, उत्पादन विकास, उपलब्ध संसाधनांचा कार्यक्षम वापर आणि प्रक्रिया उद्योगांमधील व्यवसायाच्या विविध संधी याविषयी तांत्रिक माहिती दिली. अर्चना कदम यांनी उद्योजकीय कौशल्य विकास, उद्योग व्यवस्थापन, आर्थिक नियोजन, ब्रँडिंग, विपणन धोरणे आणि बाजारपेठ व्यवस्थापन या विषयांवर मार्गदर्शन केले. प्रशिक्षणाच्या समारोपाच्या दिवशी, दिनांक ५ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रशिक्षणार्थींना मंगरूळपीर येथील इश्इर्ं योजनेच्या लाभार्थी सौ. छाया गावंडे यांच्या 'जय अंबे दुग्ध प्रक्रिया युनिट' येथे क्षेत्रीय अभ्यासभेट आयोजित करण्यात आली. या भेटीदरम्यान दुग्ध प्रक्रिया तंत्रज्ञान, दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन व मूल्यवर्धन, प्रक्रिया पद्धती, स्वच्छता व गुणवत्ता नियंत्रण, पॅकेजिंग, उत्पादनांचे विपणन तसेच उद्योगाचे दैनंदिन व्यवस्थापन याविषयी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांसह माहिती देण्यात आली. यावेळी उद्योजिका सौ. छाया गावंडे यांनी दुग्ध प्रक्रिया उद्योगाची उभारणी, व्यवसायातील अनुभव, आव्हाने आणि उपलब्ध संधी यांविषयी प्रशिक्षणार्थींशी संवाद साधून अनुभव कथन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन अभिषेक देशमुख यांनी केले.

जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्ष १४ ■ अंक ३४० ■ शनिवार, ७ नोव्हेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

धनत्रयोदशीला वर्धेच्या बाजारपेठेत पैशांचा पाऊस

सोन्या-चांदीच्या दुकानांत ग्राहकांची झुंबड; भांडी बाजारही फुलला, कोट्यवधींची उलाढाल

दरातील घसरणीने खरेदीला बळ; पितळ, तांबे, चांदीच्या वस्तूंना विशेष मागणी

वर्धा जनमाध्यम : महागाईचे चटके, आर्थिक गणितांची ओढाताण आणि दैनंदिन खर्चाचा वाढता बोजा असतानाही धनत्रयोदशीच्या शुभमुहूर्तावर वर्धेच्या बाजारपेठेत पैशांची बरसात झाली. सोने-चांदीच्या दागिन्यांपासून ते तांब्या-पितळेच्या भांड्यांपर्यंत खरेदीसाठी ग्राहकांनी दुकानांमध्ये गर्दी केली. सराफा बाजार, भांडी बाजार, कपडा लाईन आणि मुख्य बाजारपेठेत दिवसभर खरेदीचा उत्साह ओसंडून वाहत होता. धनत्रयोदशीच्या एका दिवसात शहरात कोट्यवधी रुपयांची उलाढाल झाल्याने व्यापाऱ्यांच्या चेहऱ्यावरही समाधान झळकले.

धनत्रयोदशी हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक महत्त्वाचा मुहूर्त मानला जातो. या दिवशी सोने, चांदी आणि धातूंच्या वस्तूंची खरेदी करणे शुभ मानले जाते. याच धार्मिक श्रद्धेतून नागरिकांनी खरेदीसाठी बाजारपेठेला पसंती दिली. सकाळपासूनच सराफा दुकानांमध्ये ग्राहकांची वर्दळ सुरू झाली होती. दुपारनंतर गर्दीने अधिकच जोर धरला. सायंकाळच्या सुमारास तर अनेक दुकानांमध्ये ग्राहकांना खरेदीसाठी प्रतीक्षा करावी लागत होती.

सोन्याच्या दरातील घसरणीने ग्राहकांना दिलासा

गतवर्षीच्या तुलनेत यंदा सोने आणि चांदीच्या दरात मोठी घसरण झाल्याने बाजारपेठेत खरेदीचा उत्साह वाढल्याचे चित्र होते. गतवर्षी २४ कॅरेट सोन्याचा दर प्रति दहा ग्रॅम १ लाख ७० हजार रुपयांपर्यंत पोहोचला होता. यंदा तो सुमारे १ लाख ४० हजार रुपयांवर आला आहे. चांदीचा दरही प्रतिकिलो ३ लाख ५० हजार रुपयांवरून १ लाख ८० हजार रुपयांपर्यंत खाली आला आहे. दरातील या घसरणीमुळे



ग्राहकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला. विशेष म्हणजे, सोन्याचे दर भविष्यात पुन्हा वाढू शकतात, या अंदाजाने अनेक ग्राहकांनी सणासुदीची वाट न पाहता धनत्रयोदशीचा मुहूर्त साधला. २४ कॅरेट सोन्याची नाणी, हॉलमार्कयुक्त २२ कॅरेट दागिने, चांदीची नाणी, भांडी आणि विविध आकर्षक मूर्तींना मागणी होती. काही ग्राहकांनी यापूर्वीच दागिन्यांची नोंदणी करून ठेवली होती. शुभमुहूर्तावर दागिने ताब्यात घेत अनेकांनी आपली खरेदी पूर्ण केली.

भांडी बाजारातही गर्दीचा उच्चांक

केवळ सराफा बाजारच नव्हे, तर शहरातील भांडी बाजारातही धनत्रयोदशीचा उत्साह दिसून आला. पितळ आणि तांब्याच्या भांड्यांना विशेष मागणी होती. स्टीलच्या भांड्यांसह पूजेसाठी लागणाऱ्या साहित्याचीही मोठ्या प्रमाणात विक्री झाली. लक्ष्मी-कुबेराच्या मूर्ती, समई, दिवे, ताट, वाट्या, पूजेची भांडी आणि इतर सजावटीच्या वस्तू खरेदी करण्यासाठी नागरिकांनी दुकानांमध्ये गर्दी केली होती.

सायंकाळच्या वेळी भांडी बाजारातील परिस्थिती आणखीच गजबजलेली होती. दुकानांसमोर ग्राहकांच्या रांगा लागल्या होत्या. अनेक ठिकाणी पाय ठेवायलाही जागा नव्हती. धनत्रयोदशीच्या मुहूर्तावर भांडी बाजारातही कोट्यवधी रुपयांची उलाढाल झाल्याची माहिती घाऊक भांडी विक्रेते हरीश वघले यांनी दिली.

व्यापाऱ्यांना दिवाळीच्या हंगामाकडून मोठ्या अपेक्षा

धनत्रयोदशीच्या दिवशी झालेल्या खरेदीमुळे व्यापाऱ्यांना दिवाळीच्या पुढील दिवसांतील व्यवसायाबाबत आशा निर्माण झाली आहे. सोने-चांदी, भांडी, कपडे, फटाके आणि पूजासाहित्याच्या दुकानांमध्ये ग्राहकांची वाढती वर्दळ पाहता यंदाचा दिवाळी हंगाम बाजारपेठेसाठी महत्त्वाचा ठरण्याची शक्यता आहे. धनत्रयोदशीच्या निमित्ताने झालेली कोट्यवधींची उलाढाल ही शहरातील व्यापारासाठी उत्साहवर्धक ठरली आहे.

शेतमजुरांना ३० हजारांची नुकसानभरपाई द्या

लालबावटा संघटनेचे मुख्यमंत्र्यांना निवेदन; मनरेगावर एक हजार रुपये रोजंदारीसह सहा प्रमुख मागण्या

हिंगणघाट जनमाध्यम : दुष्काळामुळे शेतीची कामे ठप्प झाल्याने शेतमजुरांच्या हाताला काम मिळणे कठीण झाले आहे. परिणामी ग्रामीण भागातील शेतमजुरांवर उपासमारीची वेळ आली असून, रोजगार बुडाल्यामुळे झालेल्या आर्थिक नुकसानीपोटी प्रत्येक शेतमजुराला ३० हजार रुपयांची नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शेतमजूर इतर मजूर युनियनच्या लालबावटा संघटनेने केली आहे. या मागणीसाठी ४ नोव्हेंबर रोजी राज्यव्यापी आंदोलन करण्यात आले. आंदोलनाचा एक भाग म्हणून वर्धा जिल्हा संघटनेच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तहसीलदारांमार्फत निवेदन सादर करण्यात आले. संघटनेने भूमिहीन शेतमजुरांना ई-क्लास, गायरान आणि देवस्थानच्या जमिनी कसण्यासाठी वाटप करण्याची मागणी केली आहे. तसेच जिल्हाभरात मनरेगाची कामे तातडीने सुरू करून या कामांवर एक हजार रुपये रोजंदारी देण्यात यावी, अशी भूमिका मांडली आहे. मोफत रेशन व्यवस्था सुरू ठेवण्यासोबतच किमान १४ जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करावा. विद्यार्थ्यांचे सर्व प्रकारचे



शैक्षणिक शुल्क पुढील दोन वर्षांसाठी माफ करावे, अशाही मागण्या निवेदनातून करण्यात आल्या आहेत. दुष्काळाचा सर्वाधिक फटका शेतमजूर आणि भूमिहीन कुटुंबांना बसत असताना त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे शासनाने या मागण्यांची तातडीने दखल घेऊन ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी संघटनेचे अध्यक्ष कॉ. प्रमोद धनविज यांनी केली आहे.

यावेळी अध्यक्ष प्रमोद धनविज, सचिव संध्या संभे, कोषाध्यक्ष मनोहर ठाकरे, जिल्हासचिव भैय्याजी देशकर, सुनील घिमे, पांडुरंग राऊत, किसान सभेचे जिल्हा सदस्य शंकर पार यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

भरधाव ट्रकची दुचाकीला मागून धडक ; एक ठार, दुसरा गंभीर

वर्धा जनमाध्यम : नागपूर-चंद्रपूर राज्य महामार्गावर नंदोरी चौकाजवळ भरधाव ट्रकने दुचाकीला मागून जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात दुचाकीवरील एकाचा जागीच मृत्यू झाला, तर दुसरा गंभीर जखमी झाला. ही घटना ६ नोव्हेंबर रोजी सकाळी ६.३० वाजताच्या सुमारास जाम ते चंद्रपूर मार्गावर घडली.

अरविंदू पुरणेंदू सेन (वय ३०) रा. परगणा, पश्चिम बंगाल असे मृताचे नाव असून, अनिमेष अमोल बिस्वास (वय ३७) रा. परगणा, पश्चिम बंगाल हा गंभीर जखमी झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अरविंदू सेन आणि अनिमेष बिस्वास हे दोघे डोंगरगाव येथून एमएच ३४ एब्ल्यू ०१६४ क्रमांकाच्या दुचाकीने जाममार्गे नागपूरच्या दिशेने जात होते. दरम्यान, नंदोरी चौकाजवळ मागून भरधाव वेगाने आलेल्या एमएच ३२ एजे ११११ क्रमांकाच्या ट्रकने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेनंतर दुचाकीवरील दोघेही रस्त्यावर कोसळले. यात अरविंदू सेन याचा जागीच मृत्यू झाला, तर अनिमेष बिस्वास



गंभीर जखमी झाला.

अपघाताची माहिती मिळताच जाम महामार्ग पोलिस चौकीच्या सरिता यादव यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. जखमीला तातडीने रुग्णालयात हलविण्यात आले. या प्रकरणी समुद्रपूर पोलिसांनी ट्रकचालक देविदास हटवार याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

दुःखितांच्या अश्रूंना आधार, वृद्धांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणार

कृष्णगीरी परिवाराचा दिवाळीनिमित्त माणुसकीचा उपक्रम

वर्धा जनमाध्यम : दिवाळी म्हणजे आनंद, उत्साह आणि प्रकाशाचा सण. मात्र, काहींच्या आयुष्यात दुःखाचा अंधार असताना त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याचा प्रयत्न म्हणजेच खऱ्या अर्थाने माणुसकीचा दीप उजळविणे. याच सामाजिक जाणिवेतून कृष्णगीरी परिवाराने यंदा दिवाळीनिमित्त दोन स्तुत्य सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले आहे. समृद्धी महामार्गावरील भीषण अपघातात प्राण गमावलेल्या वर्धा शहरातील सोमनाथे लेआऊट येथील माताराणी नवदुर्गा उत्सव मंडळाच्या भाविकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत, तसेच जखमी भाविकांच्या कुटुंबीयांना भेटवस्तू देऊन आधार देण्यात येणार आहे. यासोबतच मातोश्री वृद्धाश्रमातील ज्येष्ठांसोबत दिवाळी साजरी करून त्यांच्या आयुष्यात आनंदाचे क्षण फुलविण्याचा संकल्प परिवाराने केला आहे.

समृद्धी महामार्गावरील त्या दुर्दैवी अपघाताने अनेक कुटुंबांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले. काहींनी आपल्या जवळच्या व्यक्तींना कायमचे गमावले, तर काही जण जखमी होऊन वेदनांशी संघर्ष करीत आहेत. या कुटुंबांच्या दुःखात सहभागी होत कृष्णगीरी परिवार त्यांच्या पाठीशी उभा राहणार आहे. अपघातात मृत्यू पावलेल्या भाविकांच्या कुटुंबीयांना रोख आर्थिक मदत, तर जखमी भाविकांच्या कुटुंबीयांना भेटवस्तू देण्यात येणार आहेत.

जिल्ह्यात १ लाख ५१ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात प्रत्येकी ५ हजार जमा

आतापर्यंत ७५ कोटी ५० लाख खात्यात

१ लाख ८८ हजार शेतकऱ्यांचे खाते स्वीकृत

वर्धा जनमाध्यम : कमी पर्जन्यमान आणि भूगर्भातील कमी जलसाठ्यामुळे यावर्षी दुष्काळस्थिती निर्माण झाली आहे. जिल्ह्यातील सर्व तालुक्यांत दुष्काळ घोषित करण्यात आला आहे. कमी पर्जन्यमानाचा खरीप पिकांवर देखील परिणाम झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी दिवाळीपूर्वी प्रत्येकी ५ हजार रुपये त्यांच्या खात्यात जमा करण्याची घोषणा करण्यात आली होती. त्यानुसार आतापर्यंत १ लाख ५१ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा करण्यात आली आहे.

एलनिनोच्या प्रभावामुळे यावर्षी पर्जन्यमान कमी झाले. त्याचा परिणाम कापुस, सोयाबिन, तुरसह अन्य पिकांवर झाला.

बहुतांश भागात शेतकऱ्यांना उत्पन्नात घट आली. पुढे रब्बी आणि उन्हाळी पिकांवर देखील विपरीत परिणाम होणार आहे. अशा स्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने दुष्काळी परिस्थिती जाहीर करून उपाययोजना सुरु केल्या आहे. त्यात विविध दिलासादायक बाबींचा समावेश आहे.

दुष्काळीस्थितीमुळे हवालदील शेतकऱ्यांना तातडीचा दिलासा देण्यासाठी शासनाने दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात प्रत्येकी ५ हजार रुपये जमा करण्याची घोषणा केली होती. जिल्ह्यात दिनांक २ नोव्हेंबर पासून शेतकऱ्यांच्या आधारलिंक खात्यात रक्कम जमा केली जात आहे.

तालुका व जिल्हास्तरावर आतापर्यंत १ लाख ८८ हजार १९७ शेतकऱ्यांची खाती स्विकृत करण्यात आली आहे. त्यापैकी १ लाख ५१ हजार खात्यांमध्ये प्रत्येकी ५ हजार याप्रमाणे ७५ कोटी ५० लाख रुपये जमा करण्यात आले आहे. अद्याप खाते स्विकृती व रक्कम जमा करण्याची प्रक्रिया सुरुच आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या संख्येत वाढ होणार आहे.

आतापर्यंत रक्कम जमा करण्यात आलेल्या शेतकऱ्यांची तालुकानिहाय संख्या पुढील प्रमाणे आहे. आर्वी तालुका १७,१९७ शेतकरी ८,५९,८५,०००, आष्टी तालुका ११,५२५ शेतकरी ५,७६,२५,०००, देवळी तालुका १९,५८२ शेतकरी ९,७९,१०,०००, हिंगणघाट २८,०९१ शेतकरी १४,०४,५५,०००, कारंजा तालुका १५,१९० शेतकरी ७,५९,५०,०००, समुद्रपुर तालुका २६,२०२ शेतकरी १३,१०,१०,०००, सेलू तालुका १७,८९६ शेतकरी ८,९४,८०,०००, वर्धा तालुका १५,१०७ शेतकरी ७,५५,३५,००० याप्रमाणे रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आली आहे.

हिंगणघाटमध्ये एमडी तस्करीचा पर्दाफाश

कारमधून ७.०९ ग्रॅम एमडी जप्त; दोन आरोपींना अटक

हिंगणघाट जनमाध्यम : शहरात अमली पदार्थांची तस्करी आणि विक्री करणाऱ्या टोळीचा हिंगणघाट पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. एमडी ड्रग्जची वाहतूक करणाऱ्या दोन आरोपींना पोलिसांनी अटक केली.

५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी संत ज्ञानेश्वर वॉर्ड परिसरात ही कारवाई करण्यात आली. आरोपींकडून एमडी ड्रग्ज, कार, रोख रक्कम आणि मोबाईल असा एकूण ३ लाख ३४ हजार ९७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

हिंगणघाट पोलिस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाला

३.३४ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

शहरात एमडी ड्रग्जची तस्करी होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी वसंत पॅलेस मार्गावर नाकाबंदी केली. यावेळी एमएच ०२ सीडी १९७६ क्रमांकाची संशयित कार पोलिसांनी अडवून झडती घेतली. कारची तपासणी केली असता त्यामध्ये ७.०९ ग्रॅम एमडी ड्रग्ज आढळून आले. या अमली पदार्थाची किंमत २९ हजार ९७० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

पोलिसांनी कारवाईदरम्यान कार, एमडी ड्रग्ज, पाच हजार रुपये रोख आणि तीन मोबाईल असा एकूण ३ लाख ३४ हजार ९७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी गणेश अनिल चिताडे (२८, रा. सेंट्रल वॉर्ड, हिंगणघाट) आणि अविनाश सुरेश लांबे (३०, रा. ज्ञानेश्वर वॉर्ड, हिंगणघाट) या दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरात अमली पदार्थांची विक्री आणि तस्करी रोखण्यासाठी पोलिसांकडून कारवाई केली जात असताना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. कारमधून एमडी ड्रग्जची वाहतूक होत असल्याचे उघड झाल्याने अमली पदार्थाच्या अवैध व्यवहाराचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपविभागीय पोलिस अधिकारी सुशीलकुमार नायक आणि पोलिस निरीक्षक अनिल राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक ज्ञानोबा पळनाटे, प्रशांत ठोंबरे, राजेश शेंडे, आशिष नेवारे आणि मंगेश वाघमारे यांनी केली.

सायफनच्या गळतीने सिंचनाचे पाणी नाल्यात

८० टक्के पाणी वाया; शेकडो हेक्टर शेती सिंचनापासून वंचित, पाटबंधारे विभागाच्या कारभारावर शेतकऱ्यांचा संताप

सेलू जनमाध्यम : एकीकडे दुष्काळाची तीव्रता वाढत असताना दुसरीकडे सिंचनासाठी उपलब्ध झालेले पाणी शेतापर्यंत पोहोचण्याऐवजी थेट नाल्यात वाहून जात आहे. बोर प्रकल्पांतर्गत पिपरा मायनरवरील दोन सायफन जीर्ण झाल्याने तब्बल ८० टक्के पाण्याची गळती होत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. पाटबंधारे विभागाच्या दुर्लक्षामुळे शेकडो हेक्टर शेती सिंचनापासून वंचित राहत असून, शेती करायची तरी कशी, असा संतप्त प्रश्न शेतकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे.

बोर प्रकल्पांतर्गत पिपरा मायनरवरील सायफन क्रमांक १ (साखळी क्रमांक ६०००) आणि सायफन क्रमांक २ (साखळी क्रमांक ६७००) पूर्णपणे जीर्ण झाले आहेत. या दोन्ही सायफनचे कायमस्वरूपी नवीन बांधकाम अथवा आवश्यक दुरुस्ती तातडीने करण्याची गरज आहे. मात्र, वारंवार समस्या निर्माण होत असतानाही अद्याप ठोस कार्यवाही झालेली नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. या संदर्भात डॉ. कुमारप्पा पाणी वापर संस्था, सेलडोहचे अध्यक्ष मुकिंदा खोडे यांनी सेलू येथील पाटबंधारे उपविभाग कार्यालयाला लेखी निवेदन दिले आहे. दोन्ही सायफनमधील गळतीमुळे सिंचनासाठी सोडलेले पाणी मोठ्या प्रमाणात नाल्यात वाहून जात असून, प्रत्यक्ष शेतापर्यंत अत्यल्प पाणी पोहोचत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. बोर प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासन तसेच पालकमंत्र्यांकडून निधी उपलब्ध करून देण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. या निधीतून दोन्ही सायफनची दुरुस्ती अथवा नवीन बांधकाम होणे अपेक्षित असताना प्रत्यक्ष कामाला अद्याप सुरुवात झालेली नाही. त्यामुळे निधी उपलब्ध असल्याचा दावा आणि प्रत्यक्ष कामाची स्थिती यामध्ये तफावत असल्याचा प्रश्न उपस्थित होत आहे. सेलूचे उपविभागीय सिंचन अधिकारी मोहाचे हे शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी आपल्या स्तरावर प्रयत्न करीत असल्याचे सांगण्यात येते. मात्र, या कामासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांचे तांत्रिक सहकार्य आणि आर्थिक मंजुरी आवश्यक आहे. वरिष्ठ अधिकारी वर्षभरात या परिसराकडे फिरकत नसल्याचा आरोपही ग्रामस्थांनी केला आहे.



त्यामुळे स्थानिक अधिकाऱ्यांच्या प्रयत्नांना वरिष्ठ पातळीवरून अपेक्षित साथ मिळणार का, असा सवाल शेतकरी उपस्थित करीत आहेत.

आंदोलनाचा इशारा; प्रशासनाला निवेदन

दोन्ही सायफनची दुरुस्ती आणि नवीन बांधकाम तातडीने सुरू न झाल्यास पाटबंधारे विभागाच्या सेलू अथवा वर्धा कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा डॉ. कुमारप्पा पाणी वापर संस्था आणि संतप्त शेतकऱ्यांनी दिला आहे. या निवेदनाच्या प्रती जलसंपदा मंत्री, पालकमंत्री डॉ. पंकज भोयर आणि जिल्हाधिकारी वर्धा यांनाही पाठविण्यात आल्या आहेत. आता प्रशासन या गंभीर प्रश्नाची दखल घेऊन सायफनच्या दुरुस्तीला कधी सुरुवात करते, याकडे परिसरातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

पतसंस्थेच्या तिजोरीवर रोखपालाचाच डल्ला; २.२४ कोटींचा अपहार

सिंदी रेल्वे जनमाध्यम : ज्या रोखपालाच्या हातात पतसंस्थेच्या पैशांची चावी होती, त्याच रोखपालाने संस्थेच्या तिजोरीवर डल्ला मारल्याचा धक्कादायक प्रकार सिंदी रेल्वे येथे उघडकीस आला आहे. समर्थ नागरी सहकारी पतसंस्थेतील तब्बल २ कोटी २४ लाख ५७ हजार ८०० रुपयांचा अपहार केल्याचा आरोप रोखपाल महेंद्र हेमराज बहेकर याच्यावर करण्यात आला आहे. खोटे हिशेब लिहून आणि बनावट पुरावे तयार करून संस्थेची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी सिंदी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

महेंद्र बहेकर हा ऑगस्ट २०१५ ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत समर्थ नागरी सहकारी पतसंस्थेत रोखपाल कम लिपिक म्हणून कार्यरत होता. सभासद आणि दैनंदिन अभिकर्त्यांकडून जमा होणारी रोख रक्कम स्वीकारण्याची जबाबदारी त्याच्याकडे होती. तब्बल दहा वर्षे संस्थेच्या आर्थिक व्यवहारांची जबाबदारी सांभाळल्यानंतर १० सप्टेंबर २०२५ रोजी त्याने स्वतःहून राजीनामा दिला. मात्र, त्याच्या कार्यकाळातील आर्थिक व्यवहारांच्या वार्षिक लेखापरीक्षणादरम्यान संशयास्पद बाबी समोर आल्या. त्यानंतर अधिक सखोल तपासणी करण्यात आली असता आर्थिक व्यवहारांच्या हिशेबात मोठी तफावत आढळून आली.

लेखापरीक्षक मनोज बोदडे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, बहेकर याने पतसंस्थेचा खोटा हिशेब लिहून तसेच खोटे पुरावे तयार करून संस्थेच्या २ कोटी २४ लाख ५७ हजार ८०० रुपयांचा अपहार केल्याचे नमूद आहे. विशेष म्हणजे, व्यवस्थापक विनोद भूते, माजी व्यवस्थापक मनोहर जुमडे आणि अध्यक्ष सुधाकर घवघवे यांनी २०२५-२६ व त्यापूर्वीच्या कॅशबुकवर स्वाक्षऱ्या केल्या होत्या. त्यामुळे या आर्थिक व्यवहारांची तपासणी आता महत्त्वाची ठरणार आहे.

जाहीर सुचना

सर्व आम जनतेस सूचित करण्यात येते की, मौजे डोंगरगाव, ता.आर्वी, जि.वर्धा येथील शेत ज्याचा भुमापन क्र.२८ हि. क्र.७/२ एकूण क्षेत्रफळ ५ हे.८२ आर ही संपूर्ण शेती माझे पक्षकार **सुनिता रमेश शिंदे आणि सविता उर्फ जोत्सना दिपकराव शिंदे** यांचे वडिलोपार्जित मालमत्ता असून त्यामधील काही भाग माझे पक्षकाराचा भाचा स्वप्नील सुनिल रणनवरे रा.रोहना, ता.आर्वी, जि.वर्धा यांनी बेकायदेशिरपणे राकेश सुरेशराव वडाळकर, रा.रोहना, ता.आर्वी, जि.वर्धा यांस विक्री करुन दिलेला आहे. त्याबाबत विद्यमान दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, पुलगांव येथे रे.दि.मु.नं. ४१/२०२५ सुनिता + १..वि..स्वप्नील + ७ हा दाखल असून तारीख २५/११/२०२६ रोजी सुनावणीकरिता प्रलंबित आहे.

माझे पक्षकारास खात्रीपूर्वक समजले की, राकेश सुरेश वडाळकर यांचे ताब्यात असलेली वरील शेताचा काही हिस्सा त्याने जाणिवपूर्वक विक्री करीता काढलेला आहे. वास्तविक पाहता सदर शेतीमध्ये माझे पक्षकाराचा सामाईक हिस्सा असून त्याबाबत दिवाणी कोर्टात वाद प्रलंबित आहे. तेव्हा सर्वत्र जनतेस सुचित करण्यात येते की, सदर शेती संबंधी कोणीही व कोणत्याही प्रकारचा खरेदी विक्री वा हस्तांतरणाचा व्यवहार करु नये केल्यास सदर व्यवहार हा माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही.

करिता ही जाहीर सूचना.

सही/-
अॅड.अजय एन.थिमन
(पक्षकारातर्फे अधिवक्ता)

दिनांक ०६.११.२०२६

जाहीर सुचना

माझे अशील श्री. रजत नामदेवराव दुधबुडे हे मौजा येळाकेळी, मौजा क्र. १३८ पी.एच. क्र. ११, तहसील सेलू, जिल्हा वर्धा येथील, ग्रामपंचायत येळाकेळीच्या हद्दीत व दुय्यम निबंधक कार्यालय, सेलू यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या फील्ड सर्वे क्र. ५३ मधील प्लॉट क्र. १४ (चौदा), क्षेत्रफळ २२४.७९ चौ. मीटर या मिळकतीचे मालक व प्रत्यक्ष कब्जेदार आहेत. सदर मिळकतीच्या चतुःसीमा खालीलप्रमाणे आहेत.

पूर्वेस – प्लॉट क्र. १३,
पश्चिमेस – अंतर्गत लेआउट रस्ता,उत्तरेस – ६ मीटर रुंदीचा अंतर्गत लेआउट रस्ता,
दक्षिणेस – प्लॉट क्र. २२,

सदर मिळकतीबाबत श्री. धुवनेश्वर नथुजी येळेरे यांनी दिनांक १५/०९/२०२५ रोजी दुय्यम निबंधक कार्यालय, सेलू येथे दस्त क्रमांक १७६३/२०२५ अन्वये हक्कसोडपत्र करून प्लॉट क्र. १४ बाबतचा आपला हक्क माझे अशील श्री. रजत नामदेवराव दुधबुडे यांच्या नावे सोडून दिलेला आहे.तसेच, सदर मिळकतीशी संबंधित पूर्वीचे मूळ लिंक खरेदीखत दस्त क्रमांक १३८९/२००९ दिनांक ०९/१२/२००९ व दस्त क्रमांक ७०८/२०१९ दिनांक २९/०४/२०१९ हे माझे अशील श्री. रजत नामदेवराव दुधबुडे यांच्याकडून हरविलेले आहेत. सदर मूळ दस्तऐवज हरविल्याबाबत माझ्या अशिलांनी संबंधित पोलीस ठाण्यात प्रथम खबर अहवाल (एफ.आय .आर) दाखल केलेला असुन, सदर मिळकतीवर महिंद्रा रुरल हाऊसिंग फायनान्स कंपनीकडुन कर्ज घेण्याकरिता अर्ज केलेला आहे. त्यामुळे सदर मिळकतीबाबत किंवा वरील नमूद व्यवहारांबाबत कोणत्याही व्यक्तीचा कोणत्याही प्रकारचा मालकी हक्क, हितसंबंध, दावा, हरकत, बोजा, तारण, गहाण, लियन अथवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क किंवा अधिकार असल्यास तसेच वरील नमूद हरविलेले मूळ खरेदीखत कोणास मिळून आल्यास, अशा व्यक्तींनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर आपला लेखी दावा किंवा हरकत आक्षेपक त्या कागदपत्रांच्या पुराव्यासह सादर करावी.विहित मुदतीत कोणताही लेखी दावा अथवा हरकत प्राप्त न झाल्यास, सदर मिळकतीबाबत कोणाचाही कोणताही हक्क, दावा किंवा हरकत नाही असे गृहीत धरून माझे अशील पुढील कायदेशीर कार्यवाही करतील. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही दाव्याची किंवा हरकतीची दखल घेतली जाणार नाही व त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित व्यक्तीवर राहील.

स्थळ : वर्धा
दिनांक : ०७/११/२०२६

अॅड.आर.आर.तिवारी
रामनगर वर्धा. मो. ९९२२४२६१६८

जाहीर सुचना

माझे अशील श्री. सुरज इसंबर कांबळे हे खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे कायदेशीर मालक व प्रत्यक्ष कब्जेदार आहेत. सदर मिळकत मौजा सेवाग्राम, मौजा क्र. ४३९,, पी.एच. क्र. २२, तहसील व जिल्हा वर्धा, ग्रामपंचायत सेवाग्राम हद्दीमध्ये स्थित असून, तिचा जुना फील्ड सर्वे क्र. २७१ व नवीन फील्ड सर्वे क्र. २२९, त्यामधील प्लॉट क्र. २६, एकूण क्षेत्रफळ १९९.३४ चौ. मी. (२१४५.००चौ. फूट) आहे.सदर मिळकतीच्या चतुःसीमा खालीलप्रमाणे आहेत :

पूर्वेस – ६.०० मीटर रुंदीचा रस्ता, श्री. राजू घनश्याम भगत व सौ. मंदा पुष्पराज भगत यांनी सदर प्लॉट क्र. २६, क्षेत्रफळ १९९.३४ चौ. मी. (२१४५.००चौ. फूट) हा दिनांक २५/०३/२०२१ रोजी दस्त क्र. १४३६/२०२१ अन्वये नोंदणीकृत खरेदीखताद्वारे श्री. सुरज इसंबर कांबळे यांच्या नावे विक्री करून दिलेला आहे. त्यानंतर श्री. सुरज इसंबर कांबळे यांनी सदर मिळकतीबाबत श्री. नितीन लक्ष्मण हिंगे यांच्यासोबत विक्री करारनामा केलेला असुन, श्री. नितीन लक्ष्मण हिंगे यांनी जना स्मॉल फायनान्स बँकेकडे कर्ज मिळण्याकरिता अर्ज केलेला आहे.माझे अशील श्री. सुरज इसंबर कांबळे यांचे सदर मिळकतीशी संबंधित खालील मूळ खरेदीखतांच्या प्रती/दस्तऐवज हरविलेले आहेत.

१) दिनांक ०९/१२/२०१४ रोजीचा दस्त क्र. ५९४९/२०१४, (२.) दिनांक ०५/०७/२०१३ रोजीचा दस्त क्र. ५७५२/२०१३, (३.) दिनांक ०२/११/२०१२ रोजीचा दस्त क्र. ८७१०/२०१२, (४.) दिनांक १७/०३/२००८ रोजीचा दस्त क्र. १९४९/२००८

त्यामुळे सदर मिळकतीबाबत अथवा प्रस्तावित व्यवहाराबाबत कोणत्याही व्यक्तीचा कोणत्याही प्रकारचा मालकी हक्क, अधिकार, हितसंबंध, दावा, हरकत, बोजा, धारणाधिकार, गहाण, तारण, अन्य कोणतेही दावित्व अथवा कायदेशीर हक्क असल्यास किंवा वरील नमूद केलेली हरविलेली मूळ खरेदीखते कोणास आढळून आल्यास, त्यांनी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर आवश्यक त्या कागदपत्रांसह लेखी स्वरूपात आपला दावा अथवा हरकत सादर करावी.विहित मुदतीत कोणताही लेखी दावा अथवा हरकत प्राप्त न झाल्यास किंवा हरविलेली मूळ खरेदीखते प्राप्त न झाल्यास, कोणाचाही दावा अथवा हरकत नाही असे गृहीत धरून माझे अशील पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यास मोकळे राहतील. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही दाव्याची अथवा हरकतीची दखल घेतली जाणार नाही.

अॅड. आर. आर. तिवारी
रामनगर वर्धा.मो. ९९२२४२६१६८

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

साखरेचा दर ३१ वरुन ४२ रुपये करा

ऑल इंडिया शुगर ट्रेडर्स असोसिएशनची सरकारकडे मोठी मागणी

नवी दिल्ली/वृत्तसंस्था -देशात साखरेच्या दरात अलीकडे काही प्रमाणात नियंत्रण आले होते, पण आता पुन्हा भाववाढीच्या शक्यता वर्तवली जात आहे. ऑल इंडिया शुगर ट्रेडर्स असोसिएशनने सरकारकडे साखरेचा किमान विक्री दर ३१ रुपये प्रति किलोवरून ४२ रुपये प्रति किलोपर्यंत वाढवण्याची मागणी केली आहे. या संघटनेने सरकारच्या उसाच्या दराला 'वाजवी आणि योग्य' असेही म्हटले आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांमधील वाढत्या असंतोषाची चौकशी एक समिती करत असतानाच ही मागणी करण्यात आली आहे.



ऑल इंडिया शुगर ट्रेड असोसिएशनने नीती आयोगाचे माजी सदस्य रमेश चंद यांच्या अध्यक्षतेखालील चार सदस्यीय समितीसमोर सादरीकरणाद्वारे ही मागणी केली. कर्नाटक आणि महाराष्ट्रातील आंदोलन करणाऱ्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी प्रामुख्याने १३ ऑक्टोबर रोजी ही समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने ४ नोव्हेंबर रोजी बंगळूरूमध्ये आणि नंतर पुण्यात ऊस उत्पादक शेतकऱ्यांची भेट घेतली. पुण्यातील बैठकीत AISTA च्या प्रतिनिधी मंडळानेही सहभाग घेतला होता. AISTA चे अध्यक्ष प्रफुल्ल विठ्ठलानी यांनी सांगितले की, फेब्रुवारी २०१९ पासून साखरेचा किमान विक्री दर (MSP) अपरिवर्तित राहिला आहे. साखर कारखाने त्यांच्या उत्पादन खर्चापेक्षा कमी दरात साखर विकणार नाहीत, हे सुनिश्चित करण्यासाठी तो किमान ४२०० रुपये प्रति क्विंटलपर्यंत वाढवला पाहिजे.एएइ चा पूर्ण अर्थ 'मिनिमम सपोर्ट प्राईस' 'किमान आधारभूत किंमत' असा होतो. ही सरकारकडून शेतकरी आणि उत्पादकांना दिली जाणारी एक प्रकारची आर्थिक हमी (हमीभाव) आहे. याला आधारभूत किंमत मानले जाऊ शकते, ज्याच्या खाली बाजारात कोणतेही उत्पादन विकण्यास किंवा खरेदी करण्यास परवानगी नाही, ज्यामुळे उत्पादकांचे नुकसानीपासून संरक्षण होते. साखरेसाठी किमान आधारभूत किंमत (MSP) कारखान्यांसाठी निश्चित केली जाते. यानुसार, कोणताही साखर कारखाना किंवा घाऊक विक्रेता बाजारात ३१ रुपये प्रति किलोग्राम (सध्याचा सरकारी दर) पेक्षा कमी दराने साखर विकू शकत नाही.

बाजारावर AISTA च्या मागणीचा परिणाम- जर सरकारने किमान आधारभूत किंमत (MSP) ४२ रुपये प्रति किलोग्रामपर्यंत वाढवली, तर साखर कारखान्यांची कमाई वाढेल. सध्या, किमान आधारभूत किंमत ३१ रुपये प्रति किलोग्राम असल्याने, कारखान्यांना साखर त्यांच्या उत्पादन खर्चापेक्षा कमी दराने विकावी लागते, ज्यामुळे नफ्याचे नुकसान होते. जर ही किंमत ४२ रुपये प्रति किलोग्रामपर्यंत वाढवली, तर विक्री किंमत थेट ११ रुपये प्रति किलोग्रामने वाढेल. उत्पादन खर्च तोच राहिल्याने, कारखान्यांना साखरेवर प्रति किलोग्राम ४ ते ६ रुपयांचा थेट नफा मिळेल. यामुळे कारखान्यांना शेतकऱ्यांना त्यांची उसाची थकबाकी अधिक लवकर आणि वेळेवर देणे शक्य होईल. मात्र, यामुळे खुल्या बाजारात साखरेच्या किमतीही वाढू शकतात, ज्यामुळे साखर आणि तिची उत्पादने सर्वसामान्यांसाठी थोडी महाग होऊ शकतात.



कर्मभूमी एक्सप्रेसला भीषण आग, जीव वाचवण्यासाठी प्रवाशांची धावपळ, बचावकार्य सुरु

नवी दिल्ली/वृत्तसंस्था -पंजाबमधील पटियाला आणि राजपुरा दरम्यान आज (६ नोव्हेंबर २०२६) एक मोठी रेल्वे दुर्घटना घडली आहे. सराई बंजारा येथे कर्मभूमी एक्सप्रेस रेल्वेच्या चार डब्यांना आग लागल्याची घटना घडली आहे. धावत्या ट्रेनला लागलेल्या आगीमुळे प्रवाशांमध्ये घबराट पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अनेक प्रवासी आगीत अडकले होते. आगीचे कारण आणि झालेल्या नुकसानीबद्दलची माहिती अद्याप मिळालेली नाही. मिळालेल्या माहितीनुसार, ही ट्रेन पंजाबहून बिहारकडे जात होती यावेळी पटियाला येथे या रेल्वेला भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. धुराचे लोट वेगाने पसरले आणि प्रवासी घाबरून खाली उतरू लागले. आगीचे अनेक भयानक व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आले आहेत. दिवाळीसाठी रेल्वेगाड्या खचाखच भरलेल्या असतानाच हा अपघात घडला. कर्मभूमी एक्सप्रेसला आग लागल्याने प्रवासी चिंतेत आहेत. मात्र, कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. सर्व प्रवासी वेळेवर उतरल्याने मोठा अनर्थ टळल्याची माहिती मिळत आहे.

या घटनेमुळे ट्रेनमधील प्रवाशांमध्ये घबराट- प्राथमिक माहितीनुसार, ट्रेनच्या इंजिनमधून पाचव्या डब्यापर्यंत धूर निघत असल्याचे दिसून आले. यानंतर रेल्वे प्रशासनाला या घटनेची माहिती देण्यात आली आणि अधिकारी व संबंधित कर्मचाऱ्यांना सतर्क करण्यात आले. सराई बंजारा परिसराजवळ ट्रेनच्या चार डब्यांना आग लागल्याचे वृत्त आहे. या घटनेमुळे ट्रेनमधील प्रवाशांमध्ये घबराट पसरली. अनेक प्रवाशांनी आपल्या सामानासह डब्यांमधून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला. काही प्रवासी आगीत सापडल्याचेही वृत्त आहे. मात्र, जखमींची संख्या आणि संभाव्य जीवितहानीबाबतची अधिकृत माहिती अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. आग लागल्यामुळे नेमकं किती नुकसान झालं, याची माहिती समोर आलेली नाही. सणासुदीचे दिवस असल्यानं ट्रेनमध्ये बरीच मोठी गर्दी होती. त्यामुळे मोठा अनर्थ घडण्याची शक्यता आहे. दरम्यान, शॉर्ट सर्किटमुळं आग लागल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

सध्या मदत आणि बचाव पथक कार्य सुरू- मिळालेल्या माहितीनुसार, रायपुरा जंक्शनच्या आधी सराय बंजारा जवळ कर्मभूमी एक्स्प्रेस आग लागली. आग सर्वप्रथम पँट्री कारमध्ये लागल्याची माहिती समोर आली आहे. यानंतर आग झपाट्यानं पसरत गेली. बघता बघता चार डब्यांनी पेट घेतला. या आगीत सुदैवानं कोणतीही जीवितहानी झालेली नाही. सध्या मदत आणि बचाव पथक कार्य सुरू आहे.

दीपावलीनिमित्त विविध मान्यवरांकडून राज्यपालांना शुभेच्छा

मुंबई/प्रतिनिधी- दीपावली निमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांनी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची महाराष्ट्र लोकभवन येथे सदिच्छा भेट घेऊन त्यांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या. राज्याचे कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, आमदार अमिन पटेल, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ सुरेश गोसावी, प्रकुलगुरु डॉ पराग काळकर, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ अपूर्वा पालकर व अभिनेत्री पूनम धिल्लो यांनी राज्यपालांना दिवाळीनिमित्त शुभेच्छा दिल्या. कुर्ला येथील मुंबई महानगरपालिकेच्या एस. जी. बर्वे दिव्यांग मुलांच्या शाळेच्या विद्यार्थ्यांना राज्यपालांनी शुभेच्छा दिल्या व भेटवस्तू दिल्या.रा.स्व. संघाचे परळ विभाग प्रांत संघचालक रविंद्र संघवी, सैफी हॉस्पिटलचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ शकील सैफी, रेडिओलॉजिस्ट डॉ राहुल सावजी, ब्रह्मकुमारी रुक्मिणी व इतर ब्रह्मकुमारी, बॉबकार्डचे विधी व कॉर्पोरेट सामाजिक दायित्व जबाबदारी प्रमुख विपुल बारोट, पत्रकार भीमराव धुळप, द योग इन्स्टिट्यूटचे सहायक संचालक ऋषी योगेंद्र आदींनी देखील राज्यपालांची भेट घेऊन त्यांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या.

दुष्काळग्रस्त ८७ लाख ४५ हजार शेतकऱ्यांना ४,३७२ कोटींची दिवाळी अग्रीम मदत

विभागनिहाय आणि जिल्हानिहाय मदतीचे वितरण; तांत्रिक अडचणी दूर करून उर्वरित पात्र शेतकऱ्यांनाही मदत

मुंबई/प्रतिनिधी- राज्यातील ३०४ दुष्काळग्रस्त तालुक्यांतील पात्र शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी आर्थिक दिलासा देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्येकी पाच हजार रुपये दिवाळी अग्रीम देण्याची ग्वाही दिली होती. यानुसार ५ नोव्हेंबर २०२६ अखेर राज्यातील ८७ लाख ४५ हजार ६६९ शेतकऱ्यांच्या खात्यात ४ हजार ३७२ कोटी ८३ लाख रुपयांची दिवाळी अग्रीम मदत वितरित झाली आहे. उर्वरित पात्र शेतकऱ्यांनाही मदत देण्याची प्रक्रिया सुरू असून, तांत्रिक अडचणींमुळे काही शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा झाली नसल्यास त्या अडचणी दूर करून त्यांनाही अग्रीम मदत देण्यात येणार असल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिली.

राज्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन शेतकऱ्यांना सणासुदीच्या काळात आर्थिक आधार मिळावा, यासाठी शासनाने दिवाळी अग्रीम मदतीचा निर्णय घेतला. महसूल, मदत व पुनर्वसन आणि कृषी विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी मदत वितरणाची प्रक्रिया युद्धपातळीवर राबवून थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात मदतीची रक्कम जमा करण्यावर भर देण्यात आला. या मदतीमुळे लाखो शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळाला आहे, असेही मंत्री जाधव पाटील यांनी सांगितले.

विभागनिहाय आणि जिल्हानिहाय मदत वितरण

अमरावती विभागातील १२ लाख ८२ हजार २०३ शेतकऱ्यांच्या खात्यात ६४१ कोटी १० लाख रुपये जमा झाले आहेत. यामध्ये अकोला जिल्ह्यातील १ लाख ६२ हजार १५२ शेतकऱ्यांना ८१ कोटी ८ लाख रुपये, अमरावती जिल्ह्यातील ३ लाख ६ हजार ७०९ शेतकऱ्यांना १५३ कोटी ३५ लाख रुपये, बुलढाणा जिल्ह्यातील ४ लाख २५ हजार ८३३ शेतकऱ्यांना २१२ कोटी ९२ लाख रुपये, वाशिम जिल्ह्यातील १ लाख ५९ हजार ५०८ शेतकऱ्यांना ७९ कोटी ७५ लाख रुपये आणि यवतमाळ जिल्ह्यातील २ लाख २८ हजार १ शेतकऱ्यांना ११४ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत.

छत्रपती संभाजीनगर विभागातील ३३ लाख ३६ हजार ३६० शेतकऱ्यांच्या खात्यात १६६८ कोटी १८ लाख रुपये जमा झाले आहेत. यामध्ये बीड जिल्ह्यातील ६ लाख १२ हजार ९३ शेतकऱ्यांना ३०६ कोटी ५ लाख रुपये, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ४ लाख ४४ हजार ३८२ शेतकऱ्यांना २२२ कोटी १९ लाख रुपये, धाराशिव जिल्ह्यातील ३ लाख



४७ हजार ७२ शेतकऱ्यांना १७३ कोटी ५४ लाख रुपये, हिंगोली जिल्ह्यातील २ लाख १२ हजार ७६० शेतकऱ्यांना १०६ कोटी ३८ लाख रुपये, जालना जिल्ह्यातील ४ लाख ३८ हजार ८४४ शेतकऱ्यांना २१९ कोटी ४२ लाख रुपये, लातूर जिल्ह्यातील ३ लाख ८१ हजार ९६१ शेतकऱ्यांना १९० कोटी ९८ लाख रुपये, नांदेड जिल्ह्यातील ५ लाख ६२ हजार ८६८ शेतकऱ्यांना २८१ कोटी ४३ लाख रुपये आणि परभणी जिल्ह्यातील ३ लाख ३६ हजार ३८० शेतकऱ्यांना १६८ कोटी १९ लाख रुपये वितरित करण्यात आले आहेत.

कोकण विभागातील ६३ हजार ६४७ शेतकऱ्यांच्या खात्यात ३१ कोटी ८२ लाख रुपये जमा झाले आहेत. यामध्ये पालघर जिल्ह्यातील ८ हजार २१३ शेतकऱ्यांना ४ कोटी ११ लाख रुपये, रायगड जिल्ह्यातील २ हजार २१८ शेतकऱ्यांना १ कोटी ११ लाख रुपये, रत्नागिरी जिल्ह्यातील २२ हजार ४९४ शेतकऱ्यांना ११ कोटी २५ लाख रुपये आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ३० हजार ७२२ शेतकऱ्यांना १५ कोटी ३६ लाख रुपये वितरित करण्यात आले आहेत.

नागपूर विभागातील ७ लाख ५० हजार ४१ शेतकऱ्यांच्या खात्यात ३७५ कोटी २ लाख रुपये जमा झाले आहेत. यामध्ये भंडारा जिल्ह्यातील १ लाख १५८ शेतकऱ्यांना ५० कोटी ८ लाख रुपये, चंद्रपूर जिल्ह्यातील २ लाख ६२९ शेतकऱ्यांना १०० कोटी ३१ लाख रुपये, गडचिरोली जिल्ह्यातील ३० हजार ७८८ शेतकऱ्यांना १५ कोटी ३९ लाख रुपये, गोंदिया जिल्ह्यातील ७४ हजार ९१० शेतकऱ्यांना ३७ कोटी ४६ लाख रुपये, नागपूर जिल्ह्यातील १ लाख ९२ हजार ७६६ शेतकऱ्यांना ९६ कोटी ३८ लाख रुपये आणि वर्धा जिल्ह्यातील १ लाख ५० हजार ७९० शेतकऱ्यांना ७५ कोटी ४० लाख रुपये वितरित करण्यात आले आहेत.

नाशिक विभागातील १८ लाख ७ हजार ३२ शेतकऱ्यांच्या खात्यात ९०३ कोटी ५२ लाख रुपये जमा झाले आहेत. यामध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील ८ लाख ७ हजार २८४ शेतकऱ्यांना ४०३ कोटी ६४ लाख रुपये, धुळे जिल्ह्यातील ६५ हजार ९३० शेतकऱ्यांना ३२ कोटी ९७ लाख रुपये, जळगाव जिल्ह्यातील ४ लाख ८ हजार ६३५ शेतकऱ्यांना २०४ कोटी ३२ लाख रुपये, नंदुरबार जिल्ह्यातील १ लाख ७ हजार ५३४ शेतकऱ्यांना ५३ कोटी ७७ लाख रुपये आणि नाशिक जिल्ह्यातील ४ लाख १७ हजार ६४९ शेतकऱ्यांना २०८ कोटी ८२ लाख रुपये वितरित करण्यात आले आहेत.

पुणे विभागातील १५ लाख ६ हजार ३८६ शेतकऱ्यांच्या खात्यात ७५३ कोटी १९ लाख रुपये जमा झाले आहेत. यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील ७४ हजार ८९३ शेतकऱ्यांना ३७ कोटी ४५ लाख रुपये, पुणे जिल्ह्यातील ३ लाख २८ हजार ५४२ शेतकऱ्यांना १६४ कोटी २७ लाख रुपये, सांगली जिल्ह्यातील २ लाख ६ हजार ६०० शेतकऱ्यांना १०३ कोटी ३० लाख रुपये, सातारा जिल्ह्यातील ३ लाख १ हजार ४६७ शेतकऱ्यांना १५० कोटी ७३ लाख रुपये आणि सोलापूर जिल्ह्यातील ५ लाख ९४ हजार ८८४ शेतकऱ्यांना २९७ कोटी ४४ लाख रुपये वितरित करण्यात आले आहेत.

दिव्यांगांच्या १६ योजनांसाठी जिल्हा वार्षिक योजनेतील १ टक्का निधी

मुंबई/प्रतिनिधी- राज्य शासनाने जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत दिव्यांग व्यक्तींचे कल्याण, पुनर्वसन आणि सक्षमीकरणासाठी कमाल १ टक्का निधी राखीव ठेवून त्यातून १६ प्रकारच्या योजना राबविण्याची कार्यपद्धती निश्चित केली आहे. यामुळे राज्यातील ग्रामीण आणि नागरी भागांतील पात्र दिव्यांगांना ई-वाहन, ई-बाईक, ई-व्हीलचेअर, डिजिटल साधने, बालसंगोपन निधी, कौशल्य प्रशिक्षण आणि सुगम्य सुविधांसाठी अर्थसहाय्य मिळणार आहे. या निर्णयामुळे २०२६-२७ या आर्थिक वर्षात राज्यातील सर्व जिल्ह्यांमधून अंदाजे २१८ कोटी रुपये उपलब्ध होणार असल्याची माहिती दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे यांनी दिली. याबाबतचा शासन निर्णय जारी झाला आहे. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ आणि महाराष्ट्र राज्याचे दिव्यांग धोरण, २०१८ यांची प्रभावी अंमलबजावणी करून दिव्यांगांचे सामाजिक समावेशन वाढविण्यासाठी शासनाने निर्णय घेतला आहे. २०२५-२६ पासून जिल्हा वार्षिक योजनेतील नियमित योजनांसाठी असलेल्या निधीपैकी कमाल १ टक्का निधी राखीव ठेवण्यास यापूर्वीच मान्यता देण्यात आली आहे. हा निधी दिव्यांगांच्या आयुष्याच्या विविध टप्प्यांवर आवश्यक सेवा, साधने आणि हक्कांची सलग साखळी उपलब्ध करण्यासाठी वापरण्यात येणार आहे, असेही मंत्री सावे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष आता तालुकास्तरावरही

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा महत्वपूर्ण निर्णय

मुंबई/प्रतिनिधी- राज्यात दुष्काळी परिस्थितीत नागरिकांना मदतीचा हात देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष आता तालुकास्तरावरही स्थापन करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे या कक्षात स्वतंत्रपणे वैद्यकीय अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येणार आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्त तालुक्यातील नागरिकांसाठी आरोग्याविषयक सेवा प्रभावीपणे राबविता येणार आहेत. दुष्काळग्रस्त भागातील गरजू रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाची यंत्रणा आता थेट तालुका स्तरापर्यंत नेण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. सामान्य प्रशासन विभागाने ६ नोव्हेंबर २०२६ रोजी याबाबत शासन निर्णय जारी केला. यासोबत जिल्हा व तालुकास्तरावर आरोग्यविषयक समन्वय समित्याही स्थापन होणार आहेत. हा तालुकास्तरावरील कक्ष केवळ खरीप हंगाम २०२६ मध्ये ट्रिगर-१ मधील दुष्काळ जाहीर करण्यात आलेल्या सर्व तालुक्यांत स्थापन करण्यात येणार आहे. या तालुक्यांतील नागरिकांच्या आरोग्यविषयक गरजा लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. संबंधित तालुक्यातील पंचायत समिती कार्यालयात हा कक्ष सुरू होईल. जिल्हाधिकारी या कक्षात एका स्वतंत्र वैद्यकीय अधिकाऱ्याची कक्ष प्रमुख म्हणून नियुक्ती करतील. त्यांच्या मदतीला लिपिक व टंकलेखक असतील, तर आवश्यक सुविधा गटविकास अधिकाऱ्यांनी प्राधान्याने पुरवायच्या आहेत.

आधी शासकीय योजना, मग निधीतून मदत- रुग्णांना पात्रतेनुसार आधी आयुष्मान भारत, महात्मा फुले जन आरोग्य योजना, कामगार विभागाच्या योजना व धर्मादाय रुग्णालयांतून उपचार मिळवून दिले जातील. या योजनांसाठी अपात्र ठरणाऱ्या रुग्णांचे अर्ज संलग्न रुग्णालयांमार्फत ऑनलाइन प्रणालीवर मंजुरीसाठी पाठवले जातील. त्यासाठी कक्ष मार्गदर्शन करेल. कक्ष प्रमुखांनी उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे आणि आशा सेविकांमार्फत गरजू रुग्णांचा शोध घ्यायचा असून, कोणताही रुग्ण उपचारांपासून वंचित राहणार नाही याची जबाबदारी या कक्षावर असेल.

कार्ड अनिवार्य करण्याचा निर्णय १ जानेवारी २७ पर्यंत पुढे ढकलला

मुंबई/प्रतिनिधी- महिलांना एसटी प्रवासात मिळणाऱ्या सवलतींचा लाभ घेण्यासाठी एनसीएमसी स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्याच्या निर्णयाला १ जानेवारी २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे ७ नोव्हेंबरपासून ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत स्मार्ट कार्ड नसतानाही महिला लाभार्थ्यांना प्रवास सवलतींचा लाभ



घेता येणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. शासनाच्या निर्देशानुसार प्रवास सवलतींचा लाभ अधिक सुलभ आणि पारदर्शक करण्यासाठी एसटी महामंडळाने एनसीएमसी स्मार्ट कार्ड वितरणाची प्रक्रिया सुरू केली आहे. १ ऑक्टोबर २०२६ पासून हे कार्ड महिला व ज्येष्ठ नागरिकांना अनिवार्य करण्यात आले होते. आतापर्यंत सुमारे १ कोटी १० लाख कार्डांची नोंदणी व वितरण झाले आहे. मात्र, ग्रामीण भागातील अनेक महिलांची नोंदणी अद्याप अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले आहे.

ही बाब लक्षात घेऊन तसेच विविध सामाजिक संघटना, लोकप्रतिनिधी, राजकीय पक्षांचे नेते आणि मंत्री महोदयांकडून करण्यात आलेल्या विनंती व सुचनांचा सकारात्मक विचार करून महामंडळाने हा निर्णय घेतला आहे.

ग्रामपंचायत स्तरावर विशेष नोंदणी शिबिरे

राज्यातील सर्व पात्र लाभार्थ्यांपर्यंत स्मार्ट कार्ड पोहोचविण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर विशेष नोंदणी शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रवासी संघटना आणि ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने ही मोहीम राबविण्यात येईल. ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत सर्व महिला लाभार्थ्यांची १०० टक्के नोंदणी व कार्ड वितरण पूर्ण करण्याचे उद्दिष्ट महामंडळाने निश्चित केले आहे. या मुदतवाढीच्या कालावधीत सर्व महिलांनी एनसीएमसी स्मार्ट कार्डची नोंदणी पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन महामंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

मातोश्री शेत पाणंद रस्त्यांसाठी ११६ कोटी रुपयांचे पूरक कुशल अनुदान वितरित



दुष्काळ आणि दिवाळीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दिलासा

मुंबई/प्रतिनिधी- मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ते योजनेअंतर्गत झालेल्या कामांसाठी राज्य रोहयोचे पूरक कुशल अनुदान म्हणून ११६ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे. रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांच्या निर्देशानुसार ही कार्यवाही करण्यात आली असून, दुष्काळी परिस्थिती आणि दिवाळीच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना यामुळे दिलासा मिळणार आहे. शेतकऱ्यांच्या शेतीशी संबंधित अडचणी दूर करून ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांची कामे वेळेत पूर्ण व्हावीत, यासाठी संबंधित यंत्रणेला निधी वितरणाबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश मंत्री भरत गोगावले यांनी दिले होते. त्यानुसार मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ते योजनेअंतर्गत झालेल्या कामांसाठी हा निधी तातडीने उपलब्ध करून देण्यात आला आहे. शेतकऱ्यांना शेतापर्यंत जाण्यासाठी बारमाही रस्ते उपलब्ध व्हावेत तसेच शेतीची मशागत आणि शेतमालाची वाहतूक सुलभ व्हावी, या उद्देशाने राज्य शासनाकडून मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ते योजना राबविण्यात येत आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

जनतेचा रोष

अमेरिकेतील २०२६ मधील मध्यावधी निवडणुकीत प्रतिनिधिगृह (हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्ह) आणि सिनेट अशा दोन्ही सभागृहात राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाचा डेमोक्रॅट्स पक्षाकडून पुरता पराभव झाला आहे. दोन्ही सभागृहांत आता डेमोक्रेट्सने बहुमताचा आकडा गाठून नियंत्रण मिळवले आहे. पक्षाचा पराभव झाल्याने राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांना मोठा धक्का बसला आहे. या निवडणुकीचे वैशिष्ट्य म्हणजे टेक्सास, दक्षिण कॅरोलिना, कॅन्ससारख्या रिपब्लिकन पक्षाच्या प्रभाव क्षेत्रातही डेमोक्रॅट्सनी जोरदार मुसंडी मारली. ट्रम्प यांनी समर्थन दिलेल्या काही उमेदवारांचाही पराभव झाला आहे. निवडणुकीत विजय मिळवला असला, तरी नवीन सदस्य ३ जानेवारी रोजी पदभार स्वीकारतील. तोपर्यंत सध्याची काँग्रेसच कार्यरत राहील. अमेरिकेच्या राजकारणात रिपब्लिकन पक्षाचा पराभव ही केवळ एका पक्षाच्या राजकीय हासाची घडामोड नाही, तर डोनाल्ड ट्रम्प यांच्यासारख्या उथळ, सवंग, भंपक, युद्धखोर व स्वकेंद्री नेतृत्वाच्या विरोधातील रोष जनतेने या निवडणुकीच्या निकालाद्वारे दाखवून दिला आहे. जनतेच्या या मानसिकतेमागे महागाई, ट्रम्प सरकारचे चुकलेले रोजगार व स्थलांतर धोरणही कारणीभूत आहे. ट्रम्प प्रशासनाच्या इराणविषयक युद्धनीतीचा परिणाम जगाला वेठीस धरण्याबरोबरच अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेवरही झाला. त्यामुळे इंधनाच्या किमतींवर दबाव वाढला. वाहतूक आणि उत्पादन खर्च वाढला. युद्धाच्या दीर्घकालीन परिणामांबाबत मतदारांमध्ये प्रश्न निर्माण झाले. ट्रम्प यांच्या इस्त्रायलमागे फरफटत जाण्याच्या युद्धखोर धोरणामुळे अमेरिकेत आकाशाला भिडलेली महागाई आणि वाढता जीवनावश्यक खर्च, यांमुळे जनता मेटाकुटीला आली होती. पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढल्या. त्यांचा परिणाम अन्नधान्य आणि किराणासारख्या जीवनावश्यक वस्तूही महागल्या. त्याचा सामान्य अमेरिकन नागरिकांच्या क्रयशक्तीवर परिणाम झाला. महागाई कमी करण्याच्या आश्वासनांची पूर्तता झाली नसल्याची भावना मतदारांमध्ये निर्माण झाली. मतदानानंतरच्या सर्वेक्षणात जवळपास ९० टक्के मतदारांनी जीवनावश्यक वस्तूंच्या खर्चाला मतदानातील महत्त्वाचा मुद्दा मानल्याचे विविध सर्वेक्षणांत स्पष्ट झाले आहे. युद्धासाठी किती किंमत मोजावी लागणार, हा प्रश्न अमेरिकन मतदारांसाठी महत्त्वाचा ठरला. या निवडणुकीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे मतदारांनी स्थानिक उमेदवारांबरोबरच राष्ट्राध्यक्षांच्या कामगिरीचाही विचार केला. ट्रम्प यांची राजकीय शैली, निर्णय प्रक्रिया आणि प्रशासनाची प्राधान्यक्रम ठरवण्याची पद्धत यावर विरोधकांनी टीका केली. काही मतदारांनी या निवडणुकीचा उपयोग ट्रम्प प्रशासनाविषयी नाराजी व्यक्त करण्यासाठी केला, असे मतदानोत्तर विश्लेषणातून दिसते. रिपब्लिकन पक्षातील काही उमेदवारांची निवड ट्रम्प यांच्या पसंतीनुसार झाली. टेक्सास, दक्षिण कॅरोलिना आणि उत्तर कॅरोलिना येथील त्यांच्या लादलेल्या उमेदवारांना स्थानिक पातळीवर नाकारले गेले. त्यामुळे पक्षांतर्गत मतभेद आणि उमेदवारांच्या विश्वासार्हतेचे प्रश्न निवडणुकीत महत्त्वाचे ठरले. या उलट, डेमोक्रॅटिक पक्षाने केवळ पारंपरिक मतदारसंघांवर अवलंबून न राहता रिपब्लिकन पक्षाच्या बालेकिल्ल्यांमध्येही विश्वासार्ह उमेदवार उभे केले. स्वतंत्र मतदार, तरुण मतदार आणि बदलाची अपेक्षा असलेल्या नागरिकांना आकर्षित करण्यावर भर दिला. त्यामुळे अनेक राज्यांतील निवडणूक लढतींचं चित्र बदलले. या पराभवामुळे ट्रम्प यांच्या निर्णयांना विरोध वाढणार आहे. डेमोक्रॅटिक पक्षाचे दोन्ही सभागृहांवर नियंत्रण आल्यामुळे ट्रम्प प्रशासनाच्या धोरणांना संसदीय विरोध वाढू शकतो. सरकारी खर्च, युद्धनीती, व्यापार धोरण आणि प्रशासनातील निर्णयांची चौकशी होण्याची शक्यता आहे. युद्ध व इतर खर्चाच्या निर्णयांना दोन्ही सभागृहांत डेमोक्रॅटिक पक्षाकडून लगाम लावला जाण्याची शक्यता आहे. ट्रम्प यांनी दोन राष्ट्रांमधील संबंधांपेक्षा वैयक्तिक संबंध विकसित करण्यावर भर दिला. पाकिस्तानला दिलेले झुकते माप हे त्याचे एक उदाहरण आहे. क्रिप्टोमधील व्यवहारातून मिळणारा लाभ व इतर कौटुंबिक व्यावसायिक हितसंबंध, हे या मागचे कारण होते. आता या सर्व व्यवहारांच्या चौकशीची टांगती तलवार ट्रम्प यांच्यावर आहे. पुढील काळात ट्रम्प यांना त्यांच्या आर्थिक आणि राजकीय कार्यक्रमांची अंमलबजावणी करताना डेमोक्रॅटिक पक्षाशी तडजोड करावी लागू शकते. या निकालामुळे रिपब्लिकन पक्षात नेतृत्व, उमेदवार निवड आणि ट्रम्प यांच्या राजकीय प्रभावाबाबत चर्चा वाढण्याची शक्यता आहे. भारताच्या दृष्टीने या निवडणुकीचे काही महत्त्वाचे परिणाम विचारात घ्यावे लागतील. अमेरिकेच्या आयात शुल्क धोरणावर काँग्रेसमधील विरोधाचा दबाव वाढू शकतो. भारत-अमेरिका संरक्षण सहकार्य सुरू राहू शकते; मात्र काही निर्णयांवर राजकीय चर्चा वाढू शकते. भारताच्या रशियाशी असलेल्या तेलव्यवहारांवर अमेरिकेतील राजकीय दबावाचा प्रश्न कायम राहू शकतो. इराणविषयक अमेरिकेच्या धोरणावर संसदीय देखरेख वाढू शकते. चीनविषयक अमेरिकेच्या धोरणात पक्षीय मतभेद असले, तरी बळकट लोकशाही व वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून भारताचे सामरिक महत्त्व कायम राहण्याची शक्यता आहे. केवळ लोकप्रिय नेतृत्वाच्या जोरावर निवडणूक जिंकता येत नाही. विशेष महत्त्वाचा प्रश्न असा आहे, की रिपब्लिकन पक्ष या पराभवानंतर ट्रम्प यांच्या नेतृत्वाखालीच पुढे जाणार की पक्षाच्या धोरणांमध्ये आणि नेतृत्वामध्ये बदल करण्याचा प्रयत्न करणार, या प्रश्नाचे उत्तर औत्सुक्याचे ठरणारे आहे. अमेरिकेसारख्या देशातही निवडणुकीच्या निकालाची पार्श्वभूमी म्हणून आर्थिक परिस्थिती महत्त्वाची ठरते. महागाई आणि रोजगार हे मतदारांच्या निर्णयातील सर्वांत महत्त्वाचे मुद्दे असू शकतात. परराष्ट्र धोरण आणि युद्धाचे आर्थिक परिणाम देशांतर्गत राजकारणावर प्रभाव टाकतात. रिपब्लिकन पक्षाच्या या पराभवाकडे केवळ डेमोक्रॅटिक पक्षाच्या विजयाच्या दृष्टिकोनातून पाहणे पुरेसे नाही. हा निकाल अमेरिकेतील आर्थिक अस्वस्थता, युद्धविषयक चिंता आणि राष्ट्राध्यक्षांच्या कामगिरीबद्दलच्या मतदारांच्या नाराजीचे प्रतिबिंब आहे. या मागे उथळ व एककल्ली राजकीय नेतृत्वाने अकारण लादलेले युद्ध आहे. या युद्धामुळे आर्थिक धोरण पुरते फसल्याचे व महागाईत वाढ झाल्याचे मतदारांच्या लक्षात आले आहे. सत्ताधारी रिपब्लिकन पक्षाचा पराभव ही त्याचीच परिणती आहे, असे निश्चित म्हणता येईल

लुटीचे स्वातंत्र्य देणे अन्यायकारकच

कर्जाचे हप्ते थकल्यास वित्तीय कंपन्यांचे वसुली प्रतिनिधीही अनेकदा महिलांनाच धमकावतात, सार्वजनिक अपमान करतात, बदनामी करतात आणि नातेवाइकांमार्फत दबाव आणतात. शेतकरी तसेच महिलांचे असे अनेक पातळ्यांवर शोषण सुरू असते.

शेतकरी, श्रमिक आणि महिलांच्या आर्थिक अगतिकतेचा फायदा घेत मायक्रोफायनान्स कंपन्यांनी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. राष्ट्रीयीकृत बँका श्रमिक घटकांना पुरेसे कर्ज देत नसल्याने तातडीच्या गरजांसाठी त्यांना नाइलाजाने या कंपन्यांकडे वळावे लागते. सहज कर्जाच्या आश्वासनाने सुरू होणारा हा व्यवहार पुढे व्याज, वाढता कर्जबोजा आणि जाचक वसुलीमुळे कर्जदारांसाठी जीवघेणा ठरत आहे.

नांदेड जिल्ह्यातील माळकौठा येथील यासंदर्भातील घटना फायनान्स कंपन्यांचा लुटारू चेहरा उघड करणारी घटना आहे. या गावातील ४० वर्षीय शेतकरी चंद्रकांत शिंदे यांनी फायनान्स कंपनीकडून १० हजार रुपये कर्ज घेतले होते. अव्वाच्या सव्वा व्याज लावून ते ७० हजारांवर पोहोचले. या रकमेच्या वसुलीसाठी शिंदेला प्रचंड शारीरिक व मानसिक त्रास दिला गेला. त्यांना कंपनीच्या ऑफिसमध्ये नेण्यात आले. दिनांक २५ ऑक्टोबर २०२६ रोजी कंपनीच्या कार्यालयात त्यांचा मृतदेह आढळला आहे.

शिंदे यांनी तेथे आत्महत्या केली, की त्यांची हत्या झाली याबाबत आता चर्चा सुरू आहे. मात्र काहीही असले, तरी ही घटना कंपन्यांच्या अत्यंत क्रूर व रानटी कर्जवसुली प्रक्रियेचे ठळक उदाहरण म्हणून महाराष्ट्राच्या समोर आली आहे. ग्रामीण भागात कर्जवसुलीसाठी महिलांना धमकावणे, सार्वजनिक अपमान करणे, फोटो काढणे आणि नातेवाइकांना फोन करून बदनामी करणे नित्याचे झाले आहे. इतके होऊनही सरकार याबाबत हलणार नसेल तर असंतोष वाढणार हे नक्की!



व्याजदरांवर नियंत्रण कोणाचे?

मायक्रोफायनान्स कंपन्यांवर रिझर्व्ह बँकेचे नियंत्रण असले, तरी ते कर्जदारांचे शोषण रोखण्यासाठी अपुरे आहे. रिझर्व्ह बँकेच्या १४ मार्च २०२२ च्या नियमांनुसार, वार्षिक तीन लाख रुपयांपर्यंत कौटुंबिक उत्पन्न असलेल्या कुटुंबांना कंपन्यांनी दिलेल्या तारणविरहित कर्जाचे एकूण मासिक हप्ते कर्जदाराच्या उत्पन्नाच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक नसावेत. कर्ज देताना कर्जदाराची परतफेड क्षमता तपासणे, व्याज व शुल्कांची पूर्वकल्पना देणे आणि थकीत रकमेवरच दंड आकारणे बंधनकारक आहे.

दंडावर व्याज आणि मुदतपूर्व परतफेडीवर दंड आकारण्यासही यानुसार मनाई आहे. मात्र असे असले, तरी व्याजदर निश्चित करण्याचे 'स्वातंत्र्य' कंपन्यांच्या संचालक मंडळांना देण्यात आले आहे. हे एकप्रकारे कर्जदारांची 'लूट' करण्याचे स्वातंत्र्य आहे. निधी उभारणीचा खर्च, जोखीम आणि नफ्याचे मार्जिन यांच्या आधारे कंपन्या दर ठरवत असल्याचे सांगत असल्या, तरी काही कंपन्या वार्षिक ३६ टक्के किंवा त्याहून अधिक व्याज आकारत असल्याच्या तक्रारी आहेत. 'आरबीआय'ने एकसमान कमाल व्याजदर तसेच दंडाची कमाल मर्यादा निश्चित केलेली नाही. परिणामी आर्थिक अगतिकतेत अडकलेले शेतकरी आणि महिलांचे यातून भयंकर शोषण होत आहे.

महिलांचे बहुआयामी शोषण

ग्रामीण महिला शेती, पशुपालन, घरकाम, मुलांचे संगोपन आणि कुटुंबाची देखभाल अशी अनेक कामे करतात. मात्र त्यांच्या या बिनमोबदल्याच्या श्रमाचे आर्थिक मूल्य त्यांना मिळत नाही. त्यांना एकीकडे श्रमाचा हा मोबदला नाकारला जात असताना, दुसरीकडे मात्र कुटुंबाच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी त्यांना स्वतःच्या नावावर कर्ज घेण्यास भाग पाडले जाते. अनेकदा पैशांच्या वापराचे निर्णयस्वातंत्र्य महिलांना अन्यायकारक पद्धतीने नाकारले गेले असल्याने या कर्जाचा वापर पुरुष करतात. शेती, व्यवसाय किंवा घरखर्चासाठी तर कधी पुरुषांची व्यसने भागविण्यासाठी हे पैसे खर्च होतात. मात्र या पैशांच्या कर्जफेडीची जबाबदारी पुन्हा महिलांवरच मुख्यतः टाकली जाते.

कर्जाचे हप्ते थकल्यास वित्तीय कंपन्यांचे वसुली प्रतिनिधीही अनेकदा महिलांनाच धमकावतात, सार्वजनिक अपमान करतात, बदनामी करतात आणि नातेवाइकांमार्फत दबाव आणतात. महिलांचे असे अनेक पातळ्यांवर शोषण सुरू असते. २०२६ मधील दुष्काळी परिस्थितीत राज्य सरकारने कर्जवसुलीबाबत दिलासा देण्याचे निर्देश दिले आहेत. ३० सप्टेंबरच्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत बँकांनी शेतकऱ्यांच्या घरी जाऊन वसुली करू नये, असे सांगण्यात आले आहे. ३ ऑक्टोबरला जिल्हाधिकाऱ्यांना खासगी सावकार आणि वित्तीय संस्थांकडून होणाऱ्या त्रासावर कारवाई करण्यासही सांगण्यात आले आहे. तरीही कंपन्यांकडून वसुली सुरू असल्याच्या तक्रारी आहेत. सरकार यावर गप्प व निष्क्रिय आहे.

उपाय आणि मागण्या

कर्जवसुली व लुटीचा हा प्रश्न केवळ कंपन्यांना सूचना देऊन सुटणार नाही. केंद्र आणि राज्य सरकारने यासाठी पुढील उपाय तातडीने करण्याची आवश्यकता आहे.

सरकार आणि आरबीआयने मायक्रोफायनान्स कर्जावरील सर्वसमावेशक व्याजदराची कठोर 'कमाल मर्यादा' निश्चित केली पाहिजे. चक्रवाढ व्याज, छुपे शुल्क आणि सक्तीची विमा आकारणी रोखली पाहिजे.

प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली नियंत्रण व तक्रार निवारण समिती स्थापन करून त्यात शेतकरी, महिला, ग्राहक संघटनांचे प्रतिनिधी आणि सावकार आणि वित्तीय संस्थांकडून होणाऱ्या त्रासावर कारवाई करण्यासही सांगण्यात आले आहे. तरीही कंपन्यांकडून वसुली सुरू असल्याच्या तक्रारी आहेत. सरकार यावर गप्प व निष्क्रिय आहे.

महिलांच्या नावावर कर्ज देण्यापूर्वी त्यांची स्वतंत्र संमती बंधनकारक असली पाहिजे.

वसुली प्रतिनिधींची ओळखपत्रे, पोलिस पडताळणी आणि लेखी अधिकृतता बंधनकारक करून वसुलीसाठी धमकी, अपमान, बदनामी, जबरदस्तीने कार्यालयात नेणे आणि नातेवाइकांना त्रास देणे यावर कठोर कारवाई केली गेली पाहिजे.

दुष्काळ, अतिवृष्टी, पीकनुकसान आणि रोजगार संकटाच्या काळात सर्व वित्तीय संस्थांच्या वसुलीला स्थगिती दिली पाहिजे व कर्जाचे हप्ते व्याजमाफीसह पुनर्नियोजित केले पाहिजेत.

संकटग्रस्त कर्जदारांसाठी कर्ज पुनर्रचना यंत्रणा तयार करून अवाजवी व्याज आणि बेकायदेशीर शुल्कांची चौकशी करून अतिरिक्त वसुली परत मिळवून दिली गेली पाहिजे. गरज पडल्यास कर्जमाफीचाही विचार केला पाहिजे.

आरबीआयने महाराष्ट्रातील मायक्रोफायनान्स कंपन्यांचे विशेष लेखापरीक्षण केले पाहिजे. नियमभंग करणाऱ्यांवर दंड, नवीन कर्जवाटप बंदी आणि परवाना रद्द करण्याची कारवाई केली पाहिजे.

महिलांना आर्थिक साक्षरता, कायदेशीर मदत आणि स्वतःच्या कर्जाबाबत निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य मिळवून दिले पाहिजे. त्यांच्या नावावर कर्ज घेऊन परतफेड लादण्याच्या प्रकारांविरोधात जनजागृती झाली पाहिजे.

केंद्र सरकारने ही आरबीआयच्या माध्यमातून व्याजदर आणि वसुलीवर कठोर नियंत्रण आणले पाहिजे. मात्र अर्थातच केवळ इतके करून हा प्रश्न मुळातून सुटणार नाही. त्यासाठी शेतकरी, श्रमिक आणि महिलांना नाइलाजाने या कंपन्यांकडे जावे लागू नये, यासाठी ग्रामीण भागात सक्षम सार्वजनिक बँकिंग व्यवस्था, सुलभ आणि स्वस्त कर्ज उपलब्ध करून देणे, यासारखे मूलभूत उपाय आवश्यक आहेत. शेतीमालाला हमीभाव, नियमित रोजगार आणि कुटुंबांना पुरेसे उत्पन्न देणारी धोरणेही आवश्यक आहेत. छोट्या-छोट्या गरजांसाठी कर्ज घेण्याची वेळच येऊ नये अशी आर्थिक सुरक्षितता निर्माण करणे हाच या कर्जाच्या फासातून मुक्तीचा खरा मार्ग आहे. कर्ज देणे हा व्यवसाय असू शकतो; पण वसुलीसाठी माणसांचे जगणे उद्ध्वस्त करण्याचा अधिकार कोणालाही नाही. कर्जदारांचे संरक्षण हा दयेचा विषय नसून तो त्यांचा हक्क आहे. राज्यकर्त्यांनी हे समजून घेऊन या प्रश्नाकडे पाहणे आवश्यक आहे.

डॉ. अजित नवले
मो.९८२२९९४८९१
(लेखक अखिल भारतीय किसान सभेचे केंद्रीय सहसचिव आहेत.)

डोनाल्ड ट्रंप आणि बेंजामिन नेतान्याहू

डोनाल्ड ट्रंप आणि बेंजामिन नेतान्याहू यांची एका आठवड्याभराच्या अंतराने आपापल्या देशांमधली पीछेहाट ही सध्या जागतिक स्तरावरची गाजणारी बातमी आहे आणि महत्वाचे म्हणजे ती अपेक्षित होती. त्या देशांच्या धोरणांबद्दल वरंच काही लिहिता येईल. पण अशा हुकुमशाही प्रवृत्तीच्या नेत्यांना काही मानसिक आजार असतात. तसे या दोघांना प्रामुख्यानं तीन मानसिक विकार आहेत असं म्हणता येते.

एक म्हणजे दोघंही 'मॅलिग्नंट नार्सिसिस्टस' आहेत. दुसरे म्हणजे त्यांना सत्तेचा उन्माद चढलेला होता/आहे. अणुबॉंबनं जग बेचिराख करण्याची अनिर्बंध सत्ता त्यांच्या हातात होती/आहे आणि त्याबद्दल त्यांना यत्किंचितही तमा नाही. तिसरे म्हणजे दोघेही आपण देवत्वाला पोचलेले देवाचे प्रेषित आहोत असे मानतात आणि आपण केलेली कृत्य ही देवानंच दिलेली आज्ञा आहे असे ठणकावून सांगतात. या तीनही गोष्टी एकत्रित आल्यानं त्यांनी जगाला धोकादायक परिस्थितीत लोटले होते. दोघांनी जितके हिंसेचे समर्थन केले तितके नाझी अधिका-यांनंतर या जगात कोणीच केलेले नाही.

'मॅलिग्नंट नार्सिसिझम' ही संज्ञा एरिक फ्रॉम या मानसशास्त्रज्ञाने प्रथम १९६४ मध्ये हिटलरसाठी वापरली. त्यात 'इस जमी से आसमातक मैं ही मैं हूँ हा माज, सायकोपॅथीची लक्षणे, सर्वजण आपल्या विरोधात आहेत असा अवाजवी संशय आणि भीती – पॅरानॉईया आणि समाजविघातक व्यक्तिमत्व यांचा समुच्चय असतो. अशा स्वरुपाचा माणूस अहंकारी तर असतोच पण त्याला समवेदना जाणवण्याची क्षमताच नसते. त्याला अपराधी वगैरे कधीच वाटत नाही. आपल्याभोवतीचे सगळे शत्रु आहेत आणि त्यांना मारुन टाकल्याशिवाय आपली खैर नाही असे भ्रम त्यांना होत असतात. जॉन गार्टनर या मानसशास्त्रज्ञाने २०१७ मध्येच ट्रंपच्या 'मॅलिग्नंट नार्सिसिझम'बद्दल इशारा दिला होता.

सायकोपाथ माणसाकडे विवेकबुध्दिचा अभाव असतो. ट्रंपमधल्या सायकोपाथ वृत्तीबद्दल मानसशास्त्रातल्या चाचण्यांनुसार अनेक जणांनी हवाले दिले आहेत. अमेरिकेनं तेहरानवर केलेल्या आणि इस्त्राएलने गाझावर केलेल्या हल्ल्यांमध्ये ट्रंप आणि नेतान्याहूंना किंचितही दुःख वगैरे झालेले नाही. त्यांनी सतत आम्ही जास्तीत जास्त विध्वंस करु असाच पवित्रा घेतला होता.

तुलसी गब्बार्ड या ट्रंपच्या नॅशनल इंटेलिजन्सच्या संचालकाने इराणने न्यूक्लिअर वेपन्स तयार करत नसल्याचा निर्वाळा दिल्यावरही इराणकडून अण्वस्त्रांची भीती जगाला दाखवत इराणवर हल्ले सुरु ठेवले. सद्दाम हुसेन हा क्रूरकर्मा होता यात वाद नाही पण इराककडे रासायनिक अस्त्र आहेत असे जगाला भासवून इराकवर हल्ले केले. त्याबद्दलही अमेरिकेनंच ती शस्त्रं तिथे कशी पेरली याबद्दल लेख छापून आलेले आहेत.

ट्रंपच्या जोसेप केंट या स्वत:च्या एका अधिका-याने 'आम्ही इराणवरचे युध्द इस्त्राएलच्या दबावामुळे सुरु केले' असे मान्य करत राजीनामा दिला होता. आपल्याला धोका आहे अशा संशयग्रस्त समजाने – पॅरानॉईया - हे युध्द ट्रंप आणि नेतान्याहू यांनी जगावर लादले. आज तेलाचे भाव या एका विषयावर जग चिंतेत आहेत.

ट्रंप आणि नेतान्याहू यांनी वारंवार 'आपण प्रेषित आहोत, जगाला वाचवणारे देवाने धाडलेले दूत आहोत' याचा उच्चार केलेला आहे. आपण ऊप ण्दोह ध्हा आहोत असे ट्रंप २०२४ मध्ये म्हणाले होते. त्यांच्यावरच्या हल्ल्याचा प्रयत्न फसल्यावर 'मला मेक अमेरिका ग्रेट अगेन हे करण्यासाठी देवानंच वाचवलं' असे ते थेट म्हणाले.

नेतान्याहू यांनी गाझा आणि इराणवरच्या हल्ल्यांना 'वॉर ऑफ रिडेंप्शन' म्हणाले होते. बायबलमधल्या संदर्भानुसार इजिप्तमध्ये जे इस्त्रायली गुलाम होते त्यांना मुक्त करायला देवाने १० संकटे (प्लेग) निर्माण केले. त्यातला दहावा प्लेग-संकट म्हणजे - इजिप्तमधलं प्रत्येक नवजात बालक मृत होईल - असा होता. इजिप्तच्या फेरोचं नवजात मूलही त्यात मरण पावणार होतं.

यातें कारण काय? तर याहवेह हा ज्यूंच्या देवाला आपण ओळखत नाही असे फेरो म्हणाला होता. मग आपण देव आहोत हे फेरोला दाखवून देण्यासाठी याहवेहनं दहा प्लेग- संकट निर्माण केली. त्याप्रमाणे आत्ता 'गाझापट्टीत देखील प्रत्येक मूल मरायला हवे आणि मी देवाचा प्रेषित असल्याने ते होईल अशी कृत्यं करतो'



असा नेतान्याहूंचा 'वॉर ऑफ रिडेंप्शन'मागचा पवित्रा होता.

या दोघांमागेही स्तुतीपाठकांचा आणि समर्थकांचा ताफा होताच. त्यांच्यातर्फे या दोघांचा भ्रम, उन्माद पोसला जातो. ट्रंप, नेतान्याहू, हिटलर अशा लोकांसमोर असलेले जग खूप वेगळे असते. तेच जग त्यांना दिसेल अशी व्यवस्था त्यांचे भाट करत असतात. 'इराणला अश्मयुगात ढकलू' असे म्हणणारे ट्रंप केवळ इराणला नाही तर जगालाच अश्मयुगात लोटणार हे कोणाच्या लक्षात येत नाही हा खरा धोका आहे.

-नीलांबरी जोशी

अमेरिकेच्या मध्यावधी निवडणुकांचे निकाल

अमेरिकेच्या मध्यावधी निवडणुकांचे निकालाचे स्वागत करूया पण फार एक्साईट नको होऊया. हे निकाल नक्कीच खूप दिलासादायक निकाल आहेत! ज्याकडे अक्षरशः सारे जग श्वास रोखून वाट पाहत होते. पृथ्वीचा वेगाने उजवीकडे झुकणारा अक्ष, लगेच डावीकडे नाही वळणार. मान्य. तरी, त्या झुकण्याच्या वेगाच्या पायात बेड्या पडतील हे नक्की!

ट्रम्प एक व्यक्ती नाहीत, ते वंशवादी, स्वकेंद्री, खोल हृदयात इतरांप्रती तुच्छताभाव बाळगणाऱ्या, अमेरिकेत गेल्या २० वर्षात रुजलेल्या 'मागा' आंदोलनाने राष्ट्राध्यक्षपदी बसवलेले नेते आहेत. गेल्या २१ महिन्यात त्यांनी अमेरिकेत देशांतर्गत आणि सर्व जगात जो उच्छाद मांडला होता त्यासाठी त्यांचा पराभव होणे ही काळाची गरज होती.

फक्त पराभव होणे पुरेसे नव्हते तर निर्णायक, निसंदिग्ध पराभव होणे गरजेचे होते. डेमोक्रेट्सना निसटता विजय मिळाला असता काल जो पोलोटिकल मेसेज तयार झाला तसा झाला नसता. दुसरी गोष्ट डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवारांनी हिरीरीने निवडणूक लढवणे यात काही विशेष नाही. पण अमेरिकन सामान्य नागरिक मतदारांनी ट्रम्प यांना धडा शिकवण्याचे मनोमन ठरवले होते. मध्यावधी निवडणुकीतील हाय टर्न आउट हा त्याचा पुरावा आहे.

तिसरी गोष्ट भारतातासकट अनेक देशाना लागू होईल. भारतासकट, युरोप मधील अनेक देशात फासिस्ट, वंशवादी, अल्पसंख्यांक विरोधी राजकीय शक्ती जोम पकडत आहेत. मतदारांनी आम्ही 'आयडिया ऑफ सर्वसमावेशक अमेरिका' मानतो हे ठासून सांगितले आहे. अनेक कृष्णवर्णीय, बिगर ख्रिश्चन आणि महिला उमेदवार सिनेटमध्ये, गव्हर्नर म्हणून निवडून आले आहे. कालच्या निवडणुक निकालांनी हे सारे साध्य केले आहे. तांत्रिकदृष्ट्या बघितले तर कोणत्याही देशांतर्गत होणाऱ्या निवडणुका या त्या देशातील अंतर्गत बाब असते.. ट्रेनला इंजिन असते आणि अनेक डबे असतात. एखाद्या डब्यात काही बिघाड झाला तर त्या डब्यातील प्रवाशांना त्रास होतो. पण इंजिन? ते कसे धावते, कोणत्या दिशेला धावते, किती वेगाने धावते याचा पूर्ण ट्रेनवर परिणाम होत असतो.

अनेक देशांचे डबे जोडलेल्या एका जागतिक ट्रेनचे अमेरिका गेली अनेक दशके इंजिन राहिले आहे. ते कोणत्या दिशेने जाणार याचा परिणाम डबे कोणत्या दिशेने जाणार यावर होत असतो. त्यामुळे अमेरिकेतील राज्यकर्ते कोण असणार म्हणजे आपल्या गाडीच्या इंजिनचा ड्रायव्हर कोण असणार हा आपल्या सर्वांच्या जिव्हाळ्याचा विषय होता.

ट्रम्प यांच्या विरोधात रोखठोक भूमिका घेणाऱ्या डेमोक्रॅटिक पक्षाकडे काँग्रेस आणि सिनेट ही दोन्ही सभागृहे आली आहेत. या निवडणुकांचे परिणाम दोन वर्षांनी २०२८ मध्ये राष्ट्राध्यक्ष पदासाठीच्या निवडणुकांवर देखील होणार. नजीकच्या काळात डेमोक्रॅटिक पक्षाकडे अमेरिकेची सर्व महत्वाची सत्तास्थाने आल्यानंतर अमेरिके बाहेरच्या जगासाठी खूप पॉझिटिव्ह बदल होतील अशी आशा बाळगणे भाबडेपणाचे होईल. गेल्या पन्नास वर्षात अमेरिकेत २४ राष्ट्राध्यक्ष झाले आहेत. त्यातील अर्धा काळ रिपब्लिकन आणि अर्धा काळ डेमोक्रॅटिक पक्षाचे राष्ट्राध्यक्ष झाले. काँग्रेस/सिनेट मधील बहुमत आलटून पालटून या दोन पक्षाकडे राहिले. या दोन पक्षाच्या परिभाषेत, कशावर जोर द्यायचा कशावर नाही यामध्ये फरक आहे. पण अमेरिका महासत्ता म्हणून त्या देशाच्या अनेक धोरणात एक सातत्याचा, पक्ष निरपेक्ष, वाहता धागा राहिला आहे. हे भारतासकट सर्व जगासाठी नोंद घेण्याजोगे आहे. कालच्या निवडणूक निकालांचे खुल्या दिलाने स्वागत करतांना फार एक्साईट होण्याचे कारण नाही.

रिपब्लिकन/डेमोक्रॅटिक पक्षांमध्ये कमीजास्त एकमत असणारे काही मुद्दे, जरी त्यांच्या प्राधान्यक्रमात फरक असला तरी.. अमेरिकेतील तगड्या ज्यू लॉबीच्या प्रभावाखाली इस्त्रायलची पाठराखण आणि इस्त्रायला शस्त्रपुरवठा करणे; संरक्षण सामग्रीवर भरमसाट खर्च; पृथ्वीवरील २०० हुन अधिक लष्करी/नाविक तळ सुरु ठेवणे. दुसऱ्या सार्वभौम देशात वेळ पडलीच तर बळाचा वापर करून जगातील राजकीय आर्किटेक्चर आपल्या इच्छेनुसार बदलणे; अमेरिकन डॉलरची जागतिक पातळीवर प्रभुसत्ता कायम राखणे; दुसऱ्या आंतरराष्ट्रीय पर्यायी चलनाचे प्रयत्न हाणून पाडणे. युनायटेड नेशन्स, जागतिक व्यापार संघटना, नाणेनिधी आयएम जागतिक बँक अशा अनेक आंतरराष्ट्रीय संस्था आपल्या पुठ्ठ्याखाली ठेवणे.. यात अजून भर घालता येईल. (अमेरिकेच्या देशांतर्गत देखील कामगारांचे वेतन न वाढवणे, ट्रेड युनियन मोडून काढणे, मक्तेदारीला आळा न घालणे, वॉल स्ट्रीटला मोकळे रान देणे अशी आर्थिक धोरणे या दोन्हीही पक्षांनी राबवली आहेत.)

संजीव चांदोरकर

शनिवार, दि. ७ नोव्हेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

दुष्काळाने शेतकरी उद्ध्वस्त, सरकार मात्र गप्प! जबाबदारी कोण घेणार..

रोहित पवारांचा मुख्यमंत्री व पालकमंत्र्यांना सवाल.

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

उमरखेड, दि. ६ : जिल्ह्यात दुष्काळाचे संकट दिवसेंदिवस गडद होत असताना शेतकरी आणि शेतमजुरांच्या प्रश्नांवर सरकारकडून ठोस निर्णय का घेतले जात नाहीत? संकट शेतकऱ्यांवर, नुकसान शेतकऱ्यांचे आणि आर्थिक ओझेही त्यांच्याच माथी; मग या दुष्काळाची जबाबदारी नेमकी कोण घेणार? असा थेट सवाल राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी मुख्यमंत्री आणि पालकमंत्र्यांना केला.



उमरखेड येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात आयोजित 'काळी दिवाळी' कार्यक्रमात त्यांनी राज्य सरकारच्या शेतकरी धोरणांवर जोरदार टीका केली. यवतमाळ जिल्ह्यात यंदा पावसाचे प्रमाण सुमारे ४० टक्क्यांनी घटल्याचा दावा करत आगामी काळात अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली. अशा परिस्थितीत राजकारण बाजूला ठेवून मुख्यमंत्री आणि पालकमंत्र्यांनी शेतकरी, शेतमजूर व पाणीटंचाईच्या प्रश्नावर तातडीने चर्चा करावी, अशी मागणी त्यांनी केली. गेल्या वर्षी अतिवृष्टीने आणि यंदा दुष्काळाने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. सोयाबीन, कापूस आणि तुरीच्या उत्पादनात घट झाली असताना दुसरीकडे खते, कीटकनाशके, डिझेल आणि मजुरीचा खर्च वाढला आहे. उत्पादन घट आणि खर्च वाढ या दुहेरी संकटात शेतकरी अडकला असताना शासनाकडून जाहीर होणारी पाच हजार रुपयांची दिवाळी मदत म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे असल्याची टीका पवार यांनी केली. शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये, तर शेतमजुरांच्या कुटुंबांना २५ हजार रुपये आर्थिक मदत देण्याची मागणी त्यांनी केली. पीकविमा आणि कर्जमाफीच्या अंमलबजावणीवरही त्यांनी सरकारला धारेवर धरले. कर्जमाफी वेळेत न मिळाल्याने अनेक शेतकरी नव्या हंगामासाठी पीककर्जापासून वंचित राहिल्याचा दावा त्यांनी केला. मागील वर्षी पीकविम्याबाबत मोठ्या घोषणा करण्यात आल्या; मात्र प्रत्यक्षात किती शेतकऱ्यांना लाभ मिळाला, याचा हिशेब सरकारने जनतेसमोर मांडावा, असे आव्हान त्यांनी दिले. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आगामी पाणीटंचाईचा विचार करून जनावरांसाठी चारा व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आतापासूनच करावी, अशी मागणीही त्यांनी केली. शेतकरी आत्महत्यांबाबत चिंता व्यक्त करत आत्महत्या हा पर्याय नसून, अन्यायाविरोधात लोकशाही मार्गाने संघर्ष करण्याचे आवाहन त्यांनी केले. उमरखेड येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा प्रश्न विधानसभेत मांडण्याचे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले. दुष्काळ, अतिवृष्टी, घटते उत्पादन, वाढता उत्पादन खर्च आणि कर्जाचा विळखा अशा संकटांनी शेतकरी हतबल झाला असताना मदतीच्या घोषणांपेक्षा प्रत्यक्ष आर्थिक दिलासा महत्त्वाचा आहे. शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाखांची मदत आणि शेतमजुरांना २५ हजार रुपये देण्याची मागणी करत रोहित पवार यांनी सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. आता या मागण्यांवर शासन काय निर्णय घेते, याकडे शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष वर्षाताई निकम, प्रदीप देवसरकर, राजूभैय्या जयस्वाल, स्वप्निल कनवाळे, भास्करराव पंडागळे, सरोजताई देशमुख, ॲड. बळीराम मुटकुळे, सतीश नाईक, संदीप ठाकरे, राजू कवाने, गजेंद्र ठाकरे आदी उपस्थित होते.



खैरखेडा आश्रम शाळेच्या विद्यार्थिनींने बनविले आकाश दिवे,!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

पुसद, दि. ६ : दिवाळीनिमित्त शासकीय माध्यमिक आश्रम शाळा खैरखेडा येथील विद्यार्थिनींनी बनविलेले आकाश कंदील चे स्टॉल प्रकल्प कार्यालय पुसद येथे लावण्यात आले या ठिकाणी प्रकल्प अधिकारी अमोल मेतकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांना व्यवसायाभिमुख शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात आली. विद्यार्थ्यांनी तयार केलेली वस्तू तिला तयार करण्यासाठी आलेला खर्च आणि विक्री करून त्यांना झालेला नफा या गोष्टींची कल्पना त्यांना मिळाली त्याचबरोबर व्यवहार ज्ञान आणि त्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी ही संकल्पना आणि उपक्रम अतिशय मोलाचा ठरला. यामध्ये प्रकल्प अधिकारी अमोल मेतकर यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम प्रकल्प कार्यालय पुसद अंतर्गत राबवला आला आहे निश्चितच अतिशय महत्त्वपूर्ण आणि व्यवहार ज्ञान वाढवणारा उपक्रम ठरला यामुळे विद्यार्थिनींचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. सदरील कार्यक्रमासाठी प्रकल्प कार्यालयातील सर्व अधिकारी कर्मचारी व समाजातील सर्व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

थोडक्यात



सावित्रीच्या लेकींच्या आनंदातच दिवाळीचा प्रकाश!

पारधी समाजातील ६६ विद्यार्थिनींना पोशाख व मिठाईचे वाटप.

यवतमाळ : वंचित मुलींच्या शिक्षणाला आधार देण्यासोबतच त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणे, हीच सामाजिक बांधिलकीची खरी कसोटी आहे. सावित्रीच्या लेकींच्या चेहऱ्यावरील हास्य हीच दिवाळीची अनमोल भेट असल्याचे प्रतिपादन ॲड. दामिनी संजय राठोड यांनी केले. वाघाडी परिसरातील 'आम्ही साऱ्या सावित्रीच्या लेकी' या पारधी समाजातील मुलींच्या शैक्षणिक आश्रयालयात दिवाळीनिमित्त ६६ विद्यार्थिनींना नवीन पोशाख व मिठाईचे वाटप करण्यात आले. बांधकाम व्यावसायिक व सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब दौलतकार यांच्या पुढाकाराने आणि युवासेना जिल्हाप्रमुख प्रद्युम्न जवळेकर यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. २०१९-२० मध्ये अवघ्या आठ मुलींपासून सुरू झालेल्या या आश्रयालयात आज ६६ मुलींच्या शिक्षण व संगोपनाची जबाबदारी पपिता माळवे आणि त्यांचे पती इसू माळवे सांभाळत आहेत. त्यांच्या कार्याचा यावेळी सत्कार करण्यात आला. तसेच मुलींनी तयार केलेले सर्व आकाशकंदील शीतल वातिले यांनी खरेदी करून त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन दिले. वंचित मुलींच्या शिक्षणासाठी मदतीचा हात पुढे करण्याचा



रजनीकांत बोरेले यांचा वाढदिवस साजरा,विविध मान्यवरांची उपस्थिती.

पांढरकवडा : व्हिसलब्लोअर आणि जिंदल पुरस्कार विजेते रजनीकांत डालूरामजी बोरेले यांचा वाढदिवस ५ नोव्हेंबर रोजी पांढरकवडा येथे साजरा करण्यात आला. यानिमित्त व्यापारी, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, विविध सामाजिक संघटना, भजन मंडळे आणि मित्रपरिवाराने त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन शुभेच्छा दिल्या. सकाळपासूनच जगदंबा व चिंतामणी नगर येथील त्यांच्या निवासस्थानी शुभेच्छा देण्यासाठी नागरिकांची ये-जा सुरू होती. अनेकांनी केक, पुष्पगुच्छ आणि भेटवस्तू देऊन वाढदिवस साजरा केला. त्यांचे सुपुत्र सर्वम बोरेले याने वडिलांना टिळा लावून शुभेच्छा दिल्या. आई सुलोचना बोरेले व कुटुंबीयांनीही औक्षण करून गोडधोड भरविले. पत्रकार मित्रांनी एका कापड दुकानात गरजू दाम्पत्याला दिवाळीनिमित्त कपडे खरेदी करून देत असताना काजू कतली भरवून वाढदिवस साजरा केला. सिंघानिया कुटुंबीयांनीही दुकानात केक कापून शुभेच्छा दिल्या. रात्री उशिरापर्यंत शुभेच्छा देणाऱ्यांची गर्दी कायम होती. भ्रष्टाचाराविरुद्धचा कायदेशीर लढा आणि सामाजिक कार्यामुळे बोरेले यांच्याशी विविध क्षेत्रांतील नागरिकांचा संपर्क असल्याचे यावेळी दिसून आले. प्रत्यक्ष भेटींसह फोन, व्हॉट्सॲप आणि सोशल मीडियावरूनही त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

७ नोव्हेंबरला महाकाली मंदिरात भव्य रक्तदान शिबिर

झरी : ग्रामीण भागातील गरजू रुग्णांना आपत्कालीन परिस्थितीत रक्तासाठी दारोदारी भटकावे लागू नये, या सामाजिक जाणिवेतून जामणी येथे ७ नोव्हेंबर रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. प्रकाश मॅकलवार मित्र परिवार व बहुउद्देशीय विकास संस्था सत्यापल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने महाकाली मंदिरात हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. आदिवासीबहुल झरी तालुक्यात आरोग्य सुविधांसोबतच रक्ताची उपलब्धता हा महत्त्वाचा प्रश्न आहे. अशा परिस्थितीत रक्तदानातून गरजूचे प्राण वाचविण्याचा हा प्रयत्न निश्चितच महत्त्वपूर्ण ठरणार आहे. समाजसेवक तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती प्रकाश मॅकलवार हे नवरात्रोत्सवाच्या माध्यमातून धार्मिक कार्यक्रमांसोबत सामाजिक उपक्रमांनाही प्राधान्य देत आहेत. केवळ उत्सव साजरे न करता समाजोपयोगी कार्यातून सामाजिक बांधिलकी जपण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. या शिबिरात युवक व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

उमेद तर्फे बचत गटाचे दिवाळी महोत्सवाचे उद्घाटन

बचत गटांच्या उत्पादनांचे प्रदर्शन व विक्री

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

पुसद, दि. ६ : महिला बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळावी आणि महिलांच्या हाताला रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, या उद्देशाने उमेद अभियानांतर्गत पुसद येथे दिवाळी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. जुन्या पंचायत समिती परिसरात ४ नोव्हेंबर रोजी या महोत्सवाचे उत्साहात उद्घाटन झाले.



पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अमोलकुमार आंदेलवाड यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी नगराध्यक्षा मोहिनीताई इंद्रनील नाईक, जिल्हा व्यवस्थापक प्रितम हस्ते, सागर वानखेडे, गौरव कांबळे, विलास राठोड, अर्शद अहमद यांच्यासह प्रभाग समन्वयक आणि एफपीओ संचालिका सविता राठोड उपस्थित होत्या. महोत्सवात महिला बचत गटांनी तयार केलेले दिवाळी फराळ, हस्तकला साहित्य, गृहउद्योगातील विविध उत्पादने आणि अन्य वस्तू विक्रीसाठी मांडण्यात आल्या आहेत. केवळ प्रशिक्षण आणि बचतपुरते महिलांचे सक्षमीकरण मर्यादित न राहता त्यांच्या उत्पादनांना थेट ग्राहकांपर्यंत पोहोचविण्याची संधी अशा उपक्रमांतून निर्माण होत आहे. महिलांनी उद्योग-व्यवसायातून आर्थिक स्वावलंबन साधावे, असे आवाहन मान्यवरांनी केले. मात्र, अशा महोत्सवांची खरी फलश्रुती महिलांना वर्षभर हक्काची बाजारपेठ आणि उत्पादनांना योग्य मोबदला मिळण्यातच आहे. आयोजनासाठी उमेद अभियानाच्या तालुका व्यवस्थापन कक्षासह सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि बचत गटांच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

अधरपुस प्रकल्पाचे पाणी नेमके कोणासाठी? रब्बी पिके आणि पशुधन तहानलेले!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

महागाव, दि. ६ : अधरपुस प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील शेतकरी पाण्याअभावी संकटात सापडले असताना प्रकल्पातून रब्बी हंगामासाठी अद्याप पाणी मिळण्याची प्रतीक्षा कायम आहे. हरभरा व इतर पिकांची पेरणी झाल्यानंतर पाण्याची गरज निर्माण झाली असून, पिके वाचविण्यासाठी किमान दोन पाणी आवर्तने तातडीने सोडावीत. तसेच तहानलेल्या पशुधनासाठीही पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.



यासंदर्भात ६ नोव्हेंबर रोजी तहसीलदार, महागाव यांच्यामार्फत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. वेणी, वाकोडी, सवना, वाडी, अंबोडा, खडका, ईजणी, पोहंडूळ यासह परिसरातील अनेक गावांमध्ये पाणीटंचाई तीव्र झाली आहे. नदी, नाले, ओढे कोरडे पडले असून विहिरी आणि बोअरवेलची पाणीपातळीही खालावली आहे. त्यामुळे शेतीसह पशुधनाच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. रब्बी पिकांना वेळेत पाणी न मिळाल्यास शेतकऱ्यांच्या हाती आलेले पीक वाया जाण्याची भीती आहे. जनावरांसाठी चारा म्हणून उभा असलेला ऊसही पाण्याअभावी वाळण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत अधरपुस प्रकल्पाच्या पाण्याचे नियोजन तातडीने होणे आवश्यक असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. निवेदनातून दोन पाणी आवर्तने, पशुधनासाठी पुरेसे पाणी, लाभक्षेत्रातील गावांना प्राधान्य, पाणी सोडण्याचे वेळापत्रक जाहीर करणे आणि अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. पाणी नियोजनाचा निर्णय आणखी किती दिवस प्रलंबित राहणार? असा सवाल उपस्थित करीत शेतकऱ्यांनी प्रशासनाने केवळ निवेदन स्वीकारण्यापुरती भूमिका न ठेवता प्रत्यक्ष पाणी सोडण्याची कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. या निवेदनावर गोविंदराव देशमुख (सवनेकर), माजी जिल्हा परिषद सदस्य शिवाजीराव देशमुख आणि माजी पंचायत समिती सदस्य संदीप पाटील ठाकरे यांच्या स्वाक्षऱ्या असून, लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या वतीने ही मागणी करण्यात आली आहे.

डोंगरे कुटुंबाच्या पाठीशी उभे राहून आ. रोहित पवारांनी पाळला शब्द!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

फुलसावंगी, दि. ६ : फुलसावंगी येथील शेतकरी जगजीवन डोंगरे यांच्या आत्महत्येने एका कुटुंबाचा आधार हिरावला असतानाच, त्यांच्या कुटुंबाच्या पाठीशी ठामपणे उभे राहून आमदार रोहित पवार यांनी दिलेला शब्द प्रत्यक्ष कृतीत उतरविला आहे. डोंगरे यांच्या दिव्यांग कन्येच्या उपचारांची संपूर्ण जबाबदारी स्वीकारण्याची ग्वाही देतानाच मुलींच्या शिक्षणासाठी भविष्यातही मदतीचा हात देण्याचे आश्वासन त्यांनी दिले.



एका बाजूला शासकीय मदतीच्या प्रतीक्षेत असलेले शेतकरी कुटुंब आणि दुसऱ्या बाजूला लोकप्रतिनिधींने पुढाकार घेऊन दिलेला आधार, यामुळे शासनाच्या संवेदनहीन कारभारावर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सततची नापिकी, शेतीमालाला मिळणारा कवडीमोल भाव आणि वाढत्या कर्जाच्या ओझ्याने खचलेल्या अल्पभूधारक जगजीवन डोंगरे यांनी २७ ऑक्टोबर रोजी विहिरीत उडी घेऊन जीवन संपविले. या घटनेनंतर महागाव आणि उमरखेड तालुक्याच्या दौऱ्यावर आलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी डोंगरे कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले. मात्र, केवळ सहानुभूती व्यक्त न करता त्यांनी डोंगरे यांच्या दिव्यांग मुलगी अश्विनी हिच्यावर पुणे अथवा मुंबईतील नामांकित रुग्णालयात मोफत उपचार करण्याची जबाबदारी स्वीकारली. मुलींच्या शिक्षणासाठीही आयुष्यभर मदतीचा शब्द दिला. दरम्यान, स्थानिक शेतकऱ्यांनी यावेळी आपल्या व्यथा आणि संताप आमदारांसमोर मांडला. २०२५-२६ च्या पीकविम्याची प्रतीक्षा कायम असून शासनाने जाहीर केलेली पाच हजार रुपयांची मदतही अनेक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेली नसल्याचा आरोप करण्यात आला. दिवाळीसारख्या सणाच्या काळातही शेतकऱ्यांच्या घरात आर्थिक अंधार कायम असल्याने सरकारच्या मदतीच्या घोषणांचे वास्तव समोर आले. जिल्ह्यात २००१ ते २०२६ या कालावधीत साडेसहा हजारांहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची भयावह पार्श्वभूमी असताना आत्महत्यांचे सत्र रोखण्यासाठी ठोस उपाययोजना कुठे आहेत, हा प्रश्न अनुत्तरित आहे. याच निषेधार्थ शेतकऱ्यांनी 'काळी दिवाळी' साजरी करून शासनाच्या धोरणांविरोधात आवाज उठविला. डोंगरे कुटुंबाला मिळालेला आधार निश्चितच दिलासादायक असला, तरी प्रत्येक आत्महत्याग्रस्त कुटुंबाला अशा वैयक्तिक मदतीची वाट पाहावी लागणार का? पीकविमा, नुकसानभरपाई आणि आर्थिक पुनर्वसनाची जबाबदारी शासन कधी पार पाडणार? रोहित पवारांनी पाळलेला शब्द माणुसकीचा प्रत्यय देणारा ठरला; मात्र शासनानेही शेतकऱ्यांच्या अश्रूंना उत्तर देण्याची वेळ आता टाळू नये.

मारहाण, धमक्या व मानसिक छळामुळे हजारो कर्मचाऱ्यांच्या रोजगारावर टांगती तलवार..!

संघटनेची जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. ६ : शेतकरी कर्जाच्या प्रश्नावरून निर्माण होणाऱ्या संघर्षाची झळ आता फायनान्स कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांना बसत असल्याचा गंभीर आरोप समस्त फायनान्स कर्मचारी संघटनेने केला आहे. कर्जवसुलीसाठी क्षेत्रात उतरणाऱ्या कर्मचाऱ्यांना मारहाण, जीवे मारण्याच्या धमक्या आणि मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत असल्याने त्यांच्या सुरक्षिततेसह रोजगाराचाही प्रश्न ऐरणीवर आला आहे.



या पार्श्वभूमीवर संघटनेने जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देत शासनाकडे विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. फायनान्स क्षेत्रात काम करणारे हजारो कर्मचारी सामान्य तसेच शेतकरी कुटुंबांतील असून त्यांच्या वेतनावर अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. मात्र, काही राजकीय नेत्यांच्या वक्तव्यांमुळे फायनान्स कर्मचाऱ्यांविषयी गैरसमज निर्माण होत असून त्यांना थेट लक्ष्य केले जात असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. शेतकरी आणि कर्मचारी यांच्यात संघर्ष उभा करण्याऐवजी दोघांच्या अडचणी समजून घेण्याची गरज असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना कर्जहप्त्यांत सवलत किंवा स्थगिती देण्याबाबत शासनाने स्पष्ट व समान निकष निश्चित करावेत. आरबीआयमार्फत फायनान्स कंपन्यांना वसुली स्थगितीबाबत निर्देश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली. त्याचबरोबर कर्मचाऱ्यांवरील हल्ले, धमक्या आणि वसुलीतील अडथळ्यांच्या घटनांची निष्पक्ष चौकशी करून पोलीस संरक्षण व कायदेशीर सहकार्य द्यावे, अशीही मागणी आहे. सचिन आगलावे, अमोल ढोणे, उमेश चव्हाण, विनोद राठोड, नितीन त्रिवेदी यांच्यासह अनेक पदाधिकारी व कर्मचाऱ्यांनी निवेदन दिले. शेतकऱ्यांना दिलासा देताना कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी कोण घेणार? हा सवाल उपस्थित करीत शासनाने तातडीने धोरणात्मक निर्णय घ्यावा,अशी मागणी संघटनेने केली आहे.

वर्षभर प्रसिद्धी हवी, दिवाळीत जाहिरातीला मात्र पाठ!

नेते-कार्यकर्त्यांच्या बातम्यांना पत्रकारांनी दिले व्यासपीठ, जाहिरातीच्या वेळी मात्र आर्थिक अडचणींचा पाढा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

पांढरकवडा, दि. ६ : दुष्काळाच्या झळा सर्वसामान्यांसोबतच स्थानिक पत्रकारितेलाही बसत असताना यंदा पत्रकारांची दिवाळी जाहिरातींच्या प्रतीक्षेतच जात असल्याचे चित्र आहे. वर्षभर नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या आंदोलनांपासून वाढदिवस, सत्कार आणि सामाजिक कार्यक्रमांपर्यंत प्रत्येक घडामोडीला प्रसिद्धी देणाऱ्या पत्रकारांना दिवाळीच्या जाहिराती मागताना मात्र निराशेचा सामना करावा लागत आहे. आपला फोटो छापून यावा, बातमीला प्रसिद्धी मिळावी, राजकीय प्रतिमा उजळावी यासाठी वर्षभर पत्रकारांची आठवण ठेवणारे अनेकजण दिवाळीच्या जाहिरातींचा विषय निघताच संपर्काबाहेर जात असल्याची खंत पत्रकार व्यक्त करीत आहेत. कुणाचा फोन लागत नाही, तर कुणाकडून 'नंतर बोलू', 'परिस्थिती ठीक नाही', 'काम बंद आहे' अशी कारणे पुढे केली जातात. प्रसिद्धीच्या वेळी पत्रकार हवेत, मग त्यांच्या वृत्तपत्राच्या जाहिरातीची वेळ आली की पाठ का फिरवली जाते? हा केवळ जाहिरातींचा नव्हे, तर पत्रकारांच्या श्रमांचा सन्मान करण्याचाही प्रश्न आहे. पत्रकारांनी वर्षभर समाजाचे प्रश्न मांडायचे, लोकप्रतिनिधींना प्रसिद्धी द्यायची आणि सणासुदीला जाहिरातींसाठी विनवण्या करायच्या, ही विसंगती थांबणार कधी? दुष्काळाच्या काळात पत्रकारितेचा आर्थिक आधारही डळमळीत होत असताना प्रसिद्धी घेणाऱ्यांनी किमान सामाजिक बांधिलकी जपून स्थानिक वृत्तपत्रांना सहकार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

दुष्काळाच्या संकटात पाच हजारांची तुटपुंजी मदत..!

प्रत्येकी पाच हजारांचे अग्रिम अनुदान वितरित,उर्वरित शेतकरी प्रतीक्षेत

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. ६ : दुष्काळाच्या तीव्र झळांनी होरपळणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने जाहीर केलेल्या प्रत्येकी पाच हजार रुपयांच्या अग्रिम मदतीचे वितरण जिल्ह्यात सुरू आहे. आतापर्यंत २ लाख २८ हजार १ शेतकऱ्यांच्या खात्यात ११४ कोटी रुपये जमा करण्यात आल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.



जिल्ह्यातील १६ तालुक्यांमध्ये ही मदत वितरित करण्यात आली आहे. पुसद तालुक्यात सर्वाधिक ३१ हजार ६७६, तर आर्णी तालुक्यात २५ हजार ८६१ शेतकऱ्यांना लाभ मिळाला आहे. राळेगाव मध्ये २० हजार १९०, नेरमध्ये १८ हजार ६६९ आणि महागाव मध्ये १६ हजार ३५८ शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा झाली आहे. मात्र, दुष्काळामुळे पिकांचे झालेले नुकसान, उत्पादनातील घट आणि वाढता शेतीखर्च पाहता पाच हजार रुपयांची मदत कितपत पुरेशी ठरणार, हा प्रश्न कायम आहे. उर्वरित पात्र शेतकऱ्यांनाही मदत वितरित करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. दिवाळीपूर्वी मदतीचा शब्द पाळल्याचे सांगत पालकमंत्री संजय राठोड यांनी सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचा दावा केला आहे. मात्र, शेतकऱ्यांना केवळ अग्रिम नव्हे, तर नुकसानीच्या तुलनेत भरीव मदतीची प्रतीक्षा आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

संक्षिप्त

३० नोव्हेंबरपर्यंत जात वैधता प्रमाणपत्र अर्ज सादर करण्याचे आवाहन

अमरावती- अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावतीच्या कार्यक्षेत्रांतर्गत येणाऱ्या अमरावती, अकोला व बुलढाणा जिल्ह्यांमध्ये सध्या 'सेवा संकल्प अभियानांतर्गत' व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी आवश्यक असणारे जात वैधता प्रमाणपत्र मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांनी ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत ऑनलाइन पद्धतीने अर्ज भरणे अनिवार्य असल्याने मुदतीत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीचे सहआयुक्त तथा उपाध्यक्ष सुदर्शन नगरे यांनी केले आहे. इयत्ता १०वी पास, तसेच सध्या ११वी व १२वी मध्ये शिकत असलेल्या आणि शैक्षणिक सत्र २०२७-२८ मध्ये नीट,सीईटी,जेईई आदी प्रवेश परीक्षांद्वारे व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे प्रमाणपत्र अत्यंत महत्त्वाचे असून विद्यार्थ्यांनी आपला जात वैधता प्रमाणपत्र अर्ज trti-maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ३० नोव्हेंबरपर्यंत ऑनलाइन भरणे आवश्यक आहे.ऑनलाइन अर्ज भरल्यानंतर, अर्जाची मूळ प्रत सर्व आवश्यक कागदपत्रांसह अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, (सहआयुक्त तथा उपाध्यक्ष कार्यालय),राज्य माहिती आयोग कार्यालयाच्या समोर, सना बिल्डिंग, चपराशीपुरा, अमरावती, पिन- ४४४६०२ या पत्त्यावर सादर करणे अनिवार्य आहे असून अधिक माहितीसाठी कार्यालयाच्या ०७२१-२५५०९९५ दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे.व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रस्ताव मुदतीत सादर व्हावेत, यासाठी संबंधित सर्व शाळा व महाविद्यालयांनी १० डिसेंबर २०१९ च्या शासन निर्णयाचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन सहआयुक्त तथा उपाध्यक्ष सुदर्शन नगरे यांनी केले आहे.

पारधी समाजातील सुशिक्षित बेरोजगारांसाठी प्रशिक्षण

अमरावती- एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी अंतर्गत पारधी समाजाच्या विकासासाठी सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील मंजूर योजनेनुसार, पारधी समाजातील बेरोजगार विद्यार्थ्यांना इलेक्ट्रिक व वाईंडिंगचे प्रशिक्षण देण्यासाठी नवीन पात्र आणि नामांकित संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.प्रशिक्षणासाठी पूर्वी एका संस्थेची निवड करण्यात आली होती. मात्र, आदेश देऊनही संबंधित संस्थेने दिलेल्या मुदतीत हा प्रशिक्षण कार्यक्रम प्रत्यक्षात राबविला नसल्याने प्रशिक्षण तात्काळ सुरू करण्याच्या उद्देशाने पूर्वीची प्रक्रिया रद्द करून, आता कामाचा अनुभव असलेल्या नवीन इच्छुक व पात्र संस्थांकडून नव्याने प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.या योजनेच्या अटी व शर्तींबाबतची सविस्तर माहिती एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे. तसेच विहित नमुन्यातील अर्ज कार्यालयातून घ्यावे लागतील. कार्यालयातून अर्ज मिळण्याची आणि सादर करण्याची मुदत शासकीय सुट्टींचे दिवस वगळता १२ ते २० नोव्हेंबर २०२६ पर्यंत राहील. अधिक माहितीसाठी इच्छुक संस्थांनी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, धारणी येथे संपर्क साधावा, असे आवाहन सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ शुक्ला यांनी केले आहे.

थकीत मालमत्ता करापोटी कोटारी टर्मिनलला मनपाकडून सील

अमरावती- अमरावती महानगरपालिकेच्या पूर्व झोन क्रमांक ३ अंतर्गत दस्तूरनगर येथील वॉर्ड C-2 मधील कोटारी टर्मिनल, चैतन्य कॉलनी येथील मालमत्ता क्रमांक ३९६२-१७, ३९६२-९ व ३९६२-१० या मालमत्तांवर तब्बल १ लाख ७७ हजार २३० रुपये मालमत्ता कर थकीत असल्याने महानगरपालिका प्रशासनाने जप्तीनाम्यानुसार ५ नोव्हेंबर रोजी संबंधित मालमत्तांना सील करण्यात आले.थकीत मालमत्ता कराची वसुली करण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाकडून ही कारवाई करण्यात आली. पूर्व झोन क्रमांक ३ चे सहाय्यक आयुक्त नितीन बोबडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक क्षेत्रीय अधिकारी प्रवीण ठाकरे,अजय चव्हाण, आकाश चौधरी आणि आनंद बुंदिले यांच्या उपस्थितीत ही कारवाई पार पडली.महानगरपालिकेच्या थकीत कर वसुली मोहिमेंतर्गत थकबाकीदार मालमत्तांवर नियमानुसार कारवाई सुरू असून, नागरिकांनी आपल्याकडील थकीत मालमत्ता कराचा भरणा करून महानगरपालिका प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

विद्यापीठातील संस्कृत विभाग सक्षम करा

विद्यापीठ विकास मंच व संस्कृत भारतीची मागणी

अमरावती/का.प्र.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील संस्कृत विभागाचा शैक्षणिक, संशोधनात्मक आणि आर्थिक विकास साधण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात याव्या, अशी मागणी विद्यापीठ विकास मंच व संस्कृत भारतीच्या शिष्टमंडळाने कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्याकडे निवेदनातून केली.

भारतीय ज्ञानपरंपरेचा वारसा जपणाऱ्या संस्कृत विभागाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करून त्याच्या कार्याचा विस्तार विद्यापीठासह संलग्न महाविद्यालयांपर्यंत करण्यावर निवेदनात भर देण्यात आला. यावेळी सदर विभागात पूर्णवेळ विभागप्रमुखांची नियुक्ती करण्यासाठी विविध पर्यायांवर सखोल चर्चा झाली. विभागाला आवश्यक निधीसाठी वेगवेगळ्या स्तरावर प्रयत्न करणे, त्यासाठीचे प्रस्ताव तयार करणे व शासनस्तरावर पाठपुरावा करण्यावर बैठकीत एकमत झाले. संस्कृत विभागाच्या वतीने २८ फेब्रुवारी २०२५ रोजी इंडियन नॉलेज सिस्टिम संदर्भातील प्रकल्पाचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. या प्रस्तावाची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास भारत सरकारच्या संबंधित योजनांमधून अंदाजे ११० ते १२० लाख रुपयांचा निधी उपलब्ध होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या प्रस्तावाला प्रशासकीय सहकार्य देऊन प्राधान्याने कार्यवाही करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. शिवाय संस्कृत विभागामार्फत राबविण्यात येणारे मूल्यवर्धित अभ्यासक्रम विद्यापीठातील सर्व विभागांसह संलग्न महाविद्यालयांमध्ये सुरू



करावे,निवेदनातून सूचविण्यात आले. यावेळी उल्हास बपोरीकर, आमदार प्रताप अडसड, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव अविनाश असनारे, विद्यापीठ विकास मंचाचे संयोजक व सिनेट सदस्य राजेंद्रप्रसाद पांडे, संस्कृत भारतीच्या उपाध्यक्ष प्रा. डॉ. संयोगिता देशमुख, प्रा. श्रीकांत काळीकर, सुनील तिप्पट, गिरीश शेरेकर, उज्ज्वल बजाज उपस्थित होते.

दिवाळीनिमित्त नागपूर-मुंबई दरम्यान अतिरिक्त विशेष गाड्या

अमरावती- दिवाळीसाठी प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी मध्य रेल्वेने शुक्रवार, ६ नोव्हेंबरपासून नागपूर आणि मुंबई दरम्यान विशेष रेल्वे गाड्यांचे नियोजन केले आहे. १३ नोव्हेंबरपर्यंत विशेष गाड्या एलटीटी दादरपर्यंत धावतील. त्यामुळेच अमरावती, कर्नाही आणि बडनेरा येथील लोक आपल्या गावी परत येत आहेत. नागपूर-लोकमान्य टिळक टर्मिनस-नागपूर विशेष वाहन ८ फेऱ्या मारेल.ट्रेन क्रमांक ०११०८३ लोकमान्य टिळक टर्मिनस-नागपूर विशेष ट्रेन ६, ८, ११ आणि १३ नोव्हेंबर रोजी लोकमान्य टिळक टर्मिनसवरून सायंकाळी ५.०५ वाजता नागपूरला पोहोचेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ७ वाजता नागपूरला पोहोचेल. ही विशेष ट्रेन पहाटे ४ वाजता बडनेरा स्टेशनवर पोहोचेल.



दिव्यांग बांधव व ज्येष्ठ नागरिकांसाठी साहित्य वाटप व नोंदणी शिबीर

मोर्शी/वार्ताहर

मोर्शी नगरपरिषद व ALIMCOed, कानपूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग बांधव तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी राष्ट्रीय वयोश्री योजनेंतर्गत साहित्य वाटप व नोंदणी शिबिराचे आयोजन नगरपरिषद सभागृह, मोर्शी येथे करण्यात आले होते. हे शिबिर उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

शिबिराला राज्यसभेचे खासदार अनिल बोंडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी नगरपरिषद अध्यक्ष सौ. प्रतीक्षा रविंद्र गुल्हाने, उपाध्यक्ष डॉ. प्रदीपजी कुऱ्हाडे व मुख्याधिकारी पराग वानखडे उपस्थित होते. शिबिराला मोर्शी शहरातील दिव्यांग बांधव व ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



मिळाला. या उपक्रमांतर्गत एकूण १३६ लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली. दिव्यांग बांधवांना आवश्यक सहाय्यक उपकरणे तसेच ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना दैनंदिन जीवनात उपयोगी पडणारी सहाय्यक साधने उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक प्रक्रिया राबविण्यात आली. दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी जीवन जगता यावे, ज्येष्ठ नागरिकांचे दैनंदिन जीवन अधिक सुलभ व्हावे आणि त्यांना समाजात सन्मानाने जगण्याची संधी मिळावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. यावेळी नगरसेवक रविंद्र रामकृष्ण गुल्हाने, रवी परतेती, नईमभाई, पिंटू महल्ले, नगरसेविका सुनीता कोहळे तसेच विनोद ढवळे, विशाल बडोदकर, मनोज खंडारे, राजेश ठाकरे व इतर मान्यवर उपस्थित होते.

मनपा शिक्षकांच्या खात्यात वेतन आयोग थकबाकीकरिता १.५ करोड जमा

शिक्षक संघटनांची मनपा प्रशासनासोबतची बैठक यशस्वी

अमरावती/का.प्र.

अमरावती महानगरपालिका शिक्षकांच्या प्रलंबित समस्या बाबत शिक्षक संघटनांकडून वारंवार होत असलेली मागणी बघता मनपा आयुक्त श्री मंगेश गोंदावले यांनी संघटनासोबत बैठक घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना आर्थिक समस्या दिवाळी पुर्वी निकाल काढण्याचे सूचित केले. या बैठकीस अमरावती महानगरपालिका लेखाधिकारी शिल्पा पवार मुख्य लेखापरीक्षक शामसुंदर देव , उपायुक्त श्री नरेंद्र वानखडे, शिक्षणअधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम, संघटनांचे पदाधिकारी योगेश पखाले, सुधीर धोत्रे, अब्दुल तफज्जुल, अजहर खान, मुख्तार अहमद, ऐफाजउल्ला खान, अतहर अहमद, विजया खुळे, प्रफुल्ल अनिलकर, अनुप



भारंबे, सचिन सराड, विजया खुळे, कृष्णा ठाकूर हे उपस्थित होते. यावेळी शिक्षकांना सातवा वेतन आयोग थकबाकीचा तिसरा टप्पा दिवाळीपूर्वी जमा करण्याची तसेच सहावा वेतन आयोग थकबाकी लवकरात लवकर देण्याचे मनपा आयुक्त यांनी आश्वासित केले होते.त्याअनुषंगाने नुकतेच शिक्षकांच्या खात्यात सातवा वेतन आयोग थकबाकी तिसरा टप्पा करिता ९० लक्ष रुपये, तसेच सहावा वेतन आयोग थकबाकी करिता २९ लक्ष आणि दिवाळी अग्रीम करिता २३ लक्ष अशी एकूण १ करोड ४२ लक्ष रुपयाचे रक्कम शिक्षकांच्या खात्यात जमा करण्यात आलेली आहे.शिक्षकांच्या मागण्या मान्य करून प्रलंबित समस्या तत्परतेने सोडविल्याबद्दल शिक्षकांच्या वतीने तसेच संघटनांनी मनपा प्रशासनाचे तसेच महानगरपालिका कर्मचारी महासंघचे सचिव श्री आकाश तीरथकर यांचे आभार मानले आहे. तसेच दिवाळी पुर्वी आर्थिक समस्या सोडविल्याबद्दल शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

जि.प. शाळा गोविंदपूरमध्ये दिवाळीचा आनंदोत्सव

विद्यार्थ्यांनी विविध कलाकृतींतून फुलविला सर्जनशीलतेचा रंग

अंजनगाव बारी/वार्ताहर

दिवाळी सणाचे औचित्य साधून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गोविंदपूर येथे विद्यार्थ्यांसाठी विविध आनंददायी व सर्जनशील उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात शाळेतील सुमारे ५० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवित आपल्या कलागुणांना वाव दिला.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी आकर्षक आकाशकंदील तयार करणे, दिवाळीनिमित्त रंगभरण स्पर्धा, मातीच्या पणत्या रंगविणे तसेच रंगीबेरंगी कागदांपासून आकर्षक दिवे तयार करण्याचा आनंद घेतला. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कल्पकतेतून विविध कलाकृती साकारत शाळेचा परिसर रंगीबेरंगी सजावटीने उजळून टाकला. यावेळी विद्यार्थ्यांना दिवाळीचा फराळ तसेच चविष्ट पाणीपुरी देण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आनंदात आणखी भर पडली.या उपक्रमाचे आयोजन संध्या थोटांगे व जयश्री गुल्हाने यांनी केले. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणे, सण-उत्सवांची माहिती देणे आणि कृतीतून शिक्षणाचा आनंद मिळवून देणे हा या उपक्रमामागील उद्देश होता.अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, आत्मविश्वास, कलात्मकता आणि सामूहिक सहभागाची भावना विकसित होण्यास निश्चितच मदत होते. शाळेतील दिवाळीचा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी आनंददायी व अविस्मरणीय ठरला.



वैद्यकीय अधिकाऱ्यांविना उपकेंद्रांवर सलाईन, इंजेक्शन व डे केअर सुविधा कशा?

ग्रामीण आरोग्य केंद्रांतील उपचारांच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह

टाकरखेडा संभू/वार्ताहर

ग्रामीण भागातील आरोग्य यंत्रणा बळकट करण्यासाठी शासनाकडून प्रत्येक आरोग्य उपकेंद्रावर बाह्यरुग्ण सेवा (ओपीडी), सलाईन, इंजेक्शन आणि डे केअर सुविधा सुरू करण्याची घोषणा करण्यात आली आहे. या निर्णयाचे स्वागत होत असतानाच, वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती नसलेल्या उपकेंद्रांमध्ये या सुविधा प्रत्यक्षात कशा राबविणार, असा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे. केवळ आरोग्य कर्मचाऱ्यांच्या भरवशावर रुग्णांना सलाईन आणि इंजेक्शन देणे कितपत सुरक्षित आहे, याबाबत ग्रामीण भागातून चिंता व्यक्त केली जात आहे.गंभीर रिअॅक्शन आल्यास जबाबदार कोण?

सध्या अनेक आरोग्य उपकेंद्रांवर बीएस्सी नर्सिंग, परिचारिका आणि इतर आरोग्य कर्मचारी कार्यरत आहेत. मात्र, स्वतंत्र वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसताना रुग्णांना सलाईन किंवा इंजेक्शन दिल्यानंतर औषधाची तीव्र ॲलर्जी अथवा प्रतिकूल प्रतिक्रिया (ॲडव्हर्स ड्रग रिॲक्शन) आल्यास परिस्थिती कशी हाताळणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. अशा वेळी तातडीने वैद्यकीय उपचार उपलब्ध झाले नाहीत आणि रुग्णाच्या जीवाला धोका निर्माण झाला, तर त्याची जबाबदारी कोणाची राहणार, असा सवाल गावकरी करीत आहेत.

ऑनलाइन सल्ला, पण नेटवर्कचा अडथळा

शासनाकडून उपकेंद्रांवरील आरोग्य कर्मचाऱ्यांनी ई-संजीवनीच्या माध्यमातून ऑनलाइन वैद्यकीय अधिकाऱ्यांचा सल्ला घ्यावा, अशी अपेक्षा आहे. मात्र, ग्रामीण आणि दुर्गम भागातील अनेक गावांमध्ये अद्याप मोबाईल नेटवर्कची समस्या कायम आहे.

आपत्कालीन परिस्थितीत नेटवर्क उपलब्ध नसल्यास किंवा ऑनलाइन संपर्क होऊ न शकल्यास रुग्णांना तातडीचे वैद्यकीय मार्गदर्शन कसे मिळणार, हा प्रश्नही उपस्थित होत आहे.वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याची मागणी

प्रत्येक आरोग्य उपकेंद्रावर कायमस्वरूपी वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी. तसेच, आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांवर तातडीने उपचार करता यावेत, यासाठी ऑक्सिजन सिलिंडर, आपत्कालीन औषधे आणि आवश्यक वैद्यकीय उपकरणांची उपलब्धता सुनिश्चित करावी. पुरेशी मनुष्यबळ व्यवस्था आणि आपत्कालीन उपचारांची तयारी केल्यानंतरच डे केअर व ओपीडी सुविधा प्रभावीपणे सुरू कराव्यात, अशी मागणी ग्रामीण भागातील नागरिकांकडून होत आहे.घोषणांपेक्षा ग्रामीण रुग्णांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देऊन आरोग्य उपकेंद्रांमध्ये आवश्यक वैद्यकीय सुविधा आणि मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

चव्हाण यांच्या काव्यसंग्रहाला पुरस्कार

अमरावती/का.प्र.

साहित्याच्या क्षेत्रात अतिशय महत्त्वाचा समजला जाणारा, बोलीभाषा साहित्य संस्था, अकोलातर्फे सुप्रसिद्ध वऱ्हाडी कवी का. रा. चव्हाण यांच्या 'वऱ्हाड मातीतील कविता' या कवितासंग्रहाला स्व. शंकर बढे वऱ्हाडी बोली सेवाव्रती काव्य गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे.



पुरस्कार वितरण सोहळा अमरावती येथील संत गाडगेबाबा सभागृहात होऊ घातलेल्या पहिल्या बोलीभाषा साहित्य संमेलनात २२ नोव्हेंबर रोजी संमेलनाध्यक्ष आबासाहेब कडू, उद्घाटक डॉ. शोभा रोकडे, स्वागताध्यक्ष प्रमोद काकडे, कार्याध्यक्ष संजय देशमुख यांचे हस्ते रोख रक्कम तसेच काव्यसंग्रहाला स्वर्गीय शंकर बढे सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ देऊन का. रा. चव्हाण यांच्या वऱ्हाड मातीतील कविता या काव्यसंग्रहाचा गौरव करण्यात येणार असल्याची माहिती बोली साहित्य संस्था अकोलाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. महादेव लुल्ले यांनी सांगितले.

चव्हाण यांनी वऱ्हाडी बोलीच्या माध्यमातूनच 'हुरमय' कथासंग्रह, 'बांगळीपाया' आदिवासी कादंबरी, 'एकटं एकटं बिऱ्हाड' आदिवासी कथासंग्रह, 'डफावर थाप जागराची' हे लोकगीत व पथनाट्य संग्रह प्रकाशित करून वऱ्हाडी साहित्य गंगेत मोलाची भर टाकली आहे. पुरस्कार मिळाल्याबद्दल का. रा. चव्हाण यांचे सर्वस्तरातून स्वागत होत आहे.

वृद्धाश्रमात फुलविले हास्य

विश्वमांगल्य सभेने साजरी केली दिवाळी



अमरावती/का.प्र.

दिवाळी म्हणजे फक्त आपल्या घरात दिवे लावण्याचा सण नाही, तर कुणाच्या तरी अंधारलेल्या आयुष्यात उजेड बनण्याचा सण आहे. याच भावनेतून विश्वमांगल्य सभा, अमरावती यांनी यंदाची दिवाळी जेवडनगर येथील 'सुख-शांती वृद्धाश्रम' मधील वृद्ध मातांसोबत साजरी केली.

विश्वमांगल्य सभा ही मातृशक्तीला केंद्रस्थानी ठेवून कार्य करीत आहे. दीपावलीच्या पहिल्या दिवसाच्या पर्वावर, वात्सल्याचे प्रतीक असलेल्या 'वसुबारस'या दिवशी वृद्धाश्रमात दिवाळी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विश्वमांगल्य सभेच्या अध्यक्षा लता कोल्हे यांनी विश्वमांगल्य सभेचे कार्य विशद केले. विदर्भ प्रांत संयोजिका पुजा चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले व भजनाचा आनंद दिला. वृद्धाश्रमातील मातृशक्तीने स्वतः भजन म्हटले. कार्यकारिणीतील माधुरी जोशी यांनी सुद्धा भजन गात दीपावलीचा आनंद द्विगुणीत केला.परिचयानंतर सर्वांना लाडवाचे वाटप आणि आवश्यक ती सामग्री देण्यात आली.

वृद्धाश्रमाच्या व्यवस्थापिका रेखा यांनी वृद्धाश्रमाच्या कामकाजाची माहिती दिली. वृद्धाश्रमातील मातृभगिनींनी फुलझड्या उजळून आनंद व्यक्त केला.छानसा सहवास आणि वृद्धाश्रमातील माता-भगिनींच्या मुखावरचे फुललेले हास्य बघून आजचा दिवस नेहमीच लक्षात राहण्यासारखा ठरला. या कार्यक्रमाला विश्वमांगल्य सभा अमरावती कार्यकारिणी व सुमन रेखाते, ज्योती रेखाते आदी उपस्थित होत्या.

उत्तमसरा शाळेत 'एक दिवा कन्येसाठी' उपक्रम

अमरावती/का.प्र.

मुलगी म्हणजे ओझे नव्हे, तर उद्याच्या उज्ज्वल भविष्याची आशा आहे, हा सामाजिक संदेश देत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उत्तमसरा पं.स.भातकुली येथे दीपावलीच्या शुभपर्वावर 'एक दिवा कन्येसाठी' हा अभिनव उपक्रम उत्साहात राबविण्यात आला.

कन्येच्या जन्माचा सन्मान, मुलींचे शिक्षण, सुरक्षितता, स्वाभिमान आणि समानता यांविषयी समाजात जनजागृती निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.यावेळी प्रज्वलित करण्यात आलेला



प्रत्येक दिवा हा केवळ एका घराचा नव्हे, तर मुलींच्या उज्ज्वल भविष्याचा आणि सक्षम भारताच्या निर्मितीचा संदेश देणारा ठरला.उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कल्पकतेतून आकर्षक आकाशकंदील आणि सुंदर शुभेच्छापत्रे तयार केली होती. या साहित्याचे आकर्षक प्रदर्शनही भरविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासोबतच त्यांच्यामध्ये स्त्री-सन्मान आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.यावेळी शाळेतील शिक्षकांनतर्फे सर्व विद्यार्थ्यांना दिवाळी अभ्यास पुस्तिका व फराळ वाटप करण्यात आला.

आजच्या आधुनिक युगात मुलींनी शिक्षण, विज्ञान, क्रीडा, साहित्य, कला, प्रशासन आणि संरक्षण अशा विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे. कल्पना चावला यांच्यासारख्या प्रेरणादायी महिलांचा आदर्श समोर ठेवून प्रत्येक मुलीला शिक्षणाची आणि स्वप्नपूर्तीची समान संधी मिळाली पाहिजे, असा संदेश यावेळी देण्यात आला.समाजपरिवर्तनाची सुरुवात विचारपरिवर्तनातून होते. मुलींच्या जन्माचे स्वागत करणे,त्यांच्या शिक्षणाला प्राधान्य देणे आणि त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी प्रोत्साहन देणे ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी आहे. मुलगी शिकली तर कुटुंब सुशिक्षित होते आणि ती सक्षम झाली तर संपूर्ण समाज सक्षम होतो, हा विचार या उपक्रमातून अधोरेखित करण्यात आला.

गणोरी केंद्राच्या केंद्रप्रमुख नीता सोमवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम संपन्न झाला. यावेळी मुख्याध्यापिका मिनाक्षी इंगळे, शिक्षक राजेश सावरकर, गजानन येलोने, प्रमोद कांबळे, संगीता कराळे आणि सौ. अर्पणा झाडे यांनी उपक्रमाच्या यशस्वितेसाठी सहकार्य केले.या उपक्रमाचे गावाती नागरीक,पालक यांनी कौतुक केले.'एक दिवा कन्येसाठी' हा उपक्रम केवळ दीपप्रज्वलनापुरता मर्यादित न राहता समाजमनातील भेदभावाचा अंधकार दूर करून मुलींच्या सन्मानाचा, शिक्षणाचा आणि समानतेचा प्रकाश पसरविणारा प्रेरणादायी उपक्रम ठरला.

सावधान!... दिवाळीनंतर महाराष्ट्र जागेवरच थांबणार!!!

दिवाळीचे दिवस जवळ आले आहेत, पण या दिवाळीनंतर एक काळाकुट्ट अंधार दाटून येतोय. ही दिवाळी आपण आनंदात साजरी करू, पण त्यानंतरचा प्रत्येक दिवस संकटाचा आणि अडचणीचा असणार आहे,हे लक्षात ठेवा. दिवाळीनंतर महाराष्ट्राची चाके थांबणार आहेत. मी तुम्हाला घाबरवत नाहीये, तर जागे करतोय. कारण अल निनोच्या कोरड्या दुष्काळाचे हे संकट छोटे नाही, ते अफाट आहे. आणि आपल्या लोकांच्या हे अजूनही लक्षात येत नाही, हेच आपले दुर्दैव आहे. दुष्काळाची शिदोरी बांधण्याऐवजी,घरात धान्य-किराणा साठा भरण्याऐवजी आपण सण-उत्सवात,चैनीच्या वस्तू, वायफळ खर्च, फटाके खरेदी आणि डीजे,साऊंड, लेझर लाईटच्या धांगडधिंग्यात रमलो आहोत. किती वाईट आणि लाजिरवाणे हे जगणे आहे.अल निनोच्या महाभयंकर संकटाला तुम्ही हलक्यात घेत आहात, हेच दुर्दैव आहे. म्हणून आज मी थेट, रोखठोक आणि काळजाला घरं पाडणारे सत्य मांडत आहे.

ज्यांनी १९७२ चा दुष्काळ पाहिला आहे,त्यांच्या अंगावर आजही काटा येतो.आईने पोटच्या गोळ्याला विकल्याच्या, पाण्यासाठी माणसांनी वणवण भटकल्याच्या,जनावरांनी तडफडून प्राण सोडल्याच्या कहाण्या आपण ऐकल्या. पण मित्रांनो,यंदाचा दुष्काळ त्या १९७२ पेक्षाही कितीतरी पटीने भयंकर असणार आहे.

१९७२ ला निदान पाऊस अधून-मधून हजेरी लावत होता.यावेळी परिस्थिती वेगळी आहे.पावसाळ्याच्या चारही महिन्यांनी आपल्याला धोका दिला.हा ओला दुष्काळ नाही,हा निखळ कोरडा दुष्काळ आहे. नक्षत्रं कोरडी गेली.पेरण्या झाल्या,पण बियाणे मातीतच जळून गेले.जमिनीत ओलावा नाही.विहिरींनी तळ गाठला आहे, बोअरवेल कोरड्या ठाक पडल्या आहेत आणि मोठमोठ्या धरणात केवळ गाळ आणि भेगा उरल्या आहेत. हे निसर्गाचे चक्र नाही, हा अल निनोचा थेट घाला आहे.प्रशांत महासागरात वाढलेल्या तापमानाने आपला मान्सूनच पळवून नेला आहे.हवामान तज्ज्ञ ओरडून सांगत होते,पण आपण सण-उत्सवात मश्गुल होतो.

आता या दुष्काळाची साखळी कशी एकमेकांना विळखा घालणार आहे, ते समजून घ्या.

१. पाणी टंचाईचा पहिला तडाखा : राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील धरणे आता पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षित करण्यात आली आहेत. गावागावात शासनाने पाणी पुरवठ्यात कपात केली आहे. अनेक ठिकाणी आजपासूनच टँकरने पाणीपुरवठा सुरु झाला आहे. दिवाळीनंतर हेच चित्र शहरात दिसणार आहे. नळाला थेंबही येणार नाही. एका हंडाभर पाण्यासाठी महिला भगिनींना रात्र-रात्र जागून काढावी लागेल. पाण्यावरून वाद, भांडणे आणि हाणामाऱ्या होतील. कारण पाणी म्हणजे जीवन, आणि तेच जीवन आपल्या हातातून निसटत चालले आहे.

२. रोजगारावर दुसरा घाला : अल निनोच्या दुष्काळाने रोजगारावर घाला घातला आहे. शेतात पीकच नाही, तर शेतमजुराला काम कोण देणार? शेतात मजूर नाहीत तर शेतमजूर जाणार कुठे? लाखो हात बेरोजगार होणार आहेत.



अल निनोचा विळखा, १९७२ पेक्षा भयंकर दुष्काळ दारात ही चेतावणी नाही, तर काळाची हाक आहे.

रोजंदारीवर पोट भरणारा वर्ग उघड्यावर येणार आहे. शहरात पाणी नसल्याने बांधकामे बंद पडतील. कंपन्यांचे उत्पादन घटेल. गावात काम नाही म्हणून तरुण शहरात धाव घेतील आणि शहरातही काम मिळणार नाही. ही अशी दुहेरी कोंडी आहे, जी संपूर्ण पिढीला नैराश्याच्या खाईत लोटेल.

३. अन्न टंचाई आणि महागाईचा तिसरा महास्फोट : दुष्काळामुळे अन्न टंचाई आणि महागाई अगडबंब वाढणार हे स्पष्ट आहे. आजच डाळी व कडधान्याचे भाव वाढले आहेत. शेतात धान्य नाही, तर बाजारात येणार कोठून?अन्न-धान्याची मागणी तेवढीच, पण पुरवठा शून्य. याचा सरळ अर्थ आहे महागाईचा स्फोट.जी तूरडाळ आज १५० ते २०० रुपयांना आहे, ती उद्या ३५० रुपये होईल. तेल, साखर, भाजीपाला सामान्यांच्या आवाक्याबाहेर जाईल. अशी वेळ येईल की खिशात पैसा असेल, पण दुकानात धान्य नसेल. लक्षात ठेवा, दुष्काळात पैशाची किंमत शून्य असते, किंमत असते ती फक्त भाकरीला.म्हणूनच हात जोडून विनंती - चैन थांबवा,बचत करा

म्हणूनच मी तुम्हाला कळकळीने सांगतो,दिवाळीत वायफळ खर्चाला पूर्ण लगाम घाला.सण साजरा करा, पण दिखावा नको. यावर्षी चैनीच्या वस्तू- महागडा मोबाईल,मोठा टीव्ही,नवीन फ्रीज,कुलर घेण्याची अजिबात गरज नाही. नवीन कपड्यांची हौस बाजूला ठेवा, आहे त्याच कपड्यात दिवाळी साजरी होते. घराची रंगरंगोटी यंदा नाही केली तरी चालेल. तीर्थयात्रा, सहल, हॉटेलमधील पार्ट्या, बाहेरचे महागडे जेवण यावर अंकुश लावा. वाचवलेला प्रत्येक रुपया हा पुढचे आठ महिने तुमच्या कुटुंबाचा प्राण वाचवेल.

प्रत्येक कुटुंबप्रमुखाने आजच एक निर्णय घ्या-पुढचे आठ महिने पुरेल एवढा किराणा आणि धान्य घरात भरून ठेवा.गहू,ज्वारी,तांदूळ,डाळ,तेल, मीठ,साखर. जे टिकाऊ आहे ते आजच घेऊन ठेवा. हे मी तुम्हाला घाबरवण्यासाठी नाही,तर काळाची पावले ओळखून सांगतो आहे.आज बाजारात वस्तू आहेत, उद्या पैसा असूनही मिळणार नाहीत.आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे,या काळात माणूस होऊन जगू या..

आपल्या अवतीभवती असे अनेक बांधव आहेत ज्यांच्याकडे साठवणूक करायलाही पैसे नाहीत. गोरगरीब, वयोवृद्ध आई-बाप, निराधार महिला, दिव्यांग बांधव. त्यांच्याकडे कोण पाहणार? शासनाची मदत येईल तेव्हा येईल,पण तोवर आपणच एकमेकांचा आधार होऊया.तुमच्या घरात चार भाकरी असतील तर दोन भुकेल्या मुखाला द्या. तुमच्या घागरीत पाणी असेल तर तहानलेल्याला पाणी पाजा. तुम्ही पाजलेल्या पाण्यातून आणि भरवलेल्या घासातून मिळणारे आशीर्वादच आपल्याला या भयंकर दुष्काळातून वाचवतील. लक्षात ठेवा, दुष्काळ हा केवळ पावसाचा नसतो, तो माणुसकीचा सुद्धा असतो, तो आपण पडू देऊ नका.

या भयंकर दिवसात दानशूर व्यक्ती, व्यापारी, उद्योगपती, राजकीय नेते आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन आपल्या गावात,धर्मादाय संस्था सभागृहात, ग्रामपंचायत सभागृहात,स्थानिक श्री हनुमान मंदिर,श्री जगदंबा मंदिर किंवा संत गजानन महाराज मंदिरात दुष्काळाचे दिवस निघून जाईपर्यंत सात-आठ महिने दररोज सदावर्त अन्नछत्र सुरु करून आपल्या गावातील गोरगरीब, मजूर, शेतमजूर, वयोवृद्ध, दिव्यांग, निराधारांची दोन वेळच्या जेवणाची व्यवस्था करावी. ठिकठिकाणी पिण्याच्या पाण्यासाठी पाणपोई, गुरे-ढोरे जनावरांसाठी पाण्याचे हौद बांधावेत. आजारी व्यक्तीसाठी मोफत उपचाराची व्यवस्था करावी.

मित्रांनो, घाबरायचे नाही, पण डोळे झाकूनही चालणार नाही. ही वेळ रडत बसण्याची नाही,तर लढण्याची आहे.दिवाळीचा आनंद घ्या,पण उद्याच्या कठीण दिवसाची तयारी आजच करा.सावध व्हा... सतर्क रहा... बचत करा... आणि माणुसकी जपा...!पाणी वाचवा...

(साभार व्हॉट्स)

अति लाडावलेली आणि हट्टी मुले हाताळणे हे पालकांसाठी एक मोठे आव्हान असते. मागण्या पूर्ण केल्यामुळे किंवा बऱ्याचदा मुलांच्या सर्व त्यांना प्रत्येक गोष्टीची सवय लावल्यामुळे मुले हट्टी बनतात.

मुलांचा हट्टीपणा अन् आपण

लहान मुलांचा हट्टीपणा ही एक सामान्य गोष्ट आहे, कारण मूल जेव्हा स्वतःचे स्वतंत्र विचार आणि गरजा व्यक्त करायला शिकते, तेव्हा ती स्वतःचे मत मांडण्याचा प्रयत्न करते. मुले उपजतच हट्टी किंवा बंडखोर नसतात, तर त्यांच्या वाढत्या वयातील शारीरिक व मानसिक बदल आणि सभोवतालचे वातावरण यामुळे त्यांच्या वागण्यात हे बदल होत असतात. मुलं हट्टी का होतात? याचा बारकाईने विचार केला तर काही गोष्टी आवर्जून सांगाव्याशा वाटतात. पालक अनेकदा मुलांचे अवाजवी लाड किंवा हट्ट पूर्ण करतात. जेव्हा पालकांकडून मुलांच्या प्रत्येक मागणीला 'हो' म्हटले जाते किंवा त्यांनी रडल्यावर, चिडल्यावर लगेच ती गोष्ट दिली जाते, तेव्हा मुलांची अशी समजूत होते की हट्ट केल्यानेच आपल्या गोष्टी पूर्ण होतात. मुलांवर अनेकदा जास्त बंधने आणि कठोर नियम लादले जातात. मुलांवर सतत बारीक लक्ष ठेवणे, त्यांच्या प्रत्येक गोष्टीवर नियंत्रण ठेवणे किंवा अत्यंत कडक नियम लावल्यामुळे मुले गुदमरतात. आपले स्वातंत्र्य आणि स्वतःची ओळख जपण्यासाठी ते



बंडखोर बनतात.

कुटुंबात जेव्हा संवादाचा अभाव असतो; नकारात्मक भाषा वारंवार वापरली जाते तेव्हा मुलांची आक्रमकता वाढते. मुलांच्या भावना किंवा त्यांचे मत ऐकून न घेणे आणि 'मी सांगितले म्हणून हे करायचे' अशी हुकूमशाही भाषा वापरल्याने मुले पालकांपासून दूर जातात. तसेच त्यांच्याशी शांतपणे बोलण्याऐवजी सतत ओरडणे किंवा मारझोड केल्याने मुले जास्त बंडखोर होतात. पालकांच्या वागण्याचे मुले सतत अनुकरण करत असतात. मुले जे ऐकतात त्यापेक्षा जे पाहतात त्यातून जास्त शिकतात. जर घरात मोठी माणसे एकमेकांशी हट्टीपणाने किंवा आक्रमकतेने वागत असतील, तर मुलेही नकळत तेच वर्तन आत्मसात करतात.

अनेकदा मुलं लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न करतात तेव्हाही ती हट्टाने हवे तसे वागतात. आजकालच्या व्यस्त जीवनशैलीत पालकांकडून मुलांना पुरेसा वेळ मिळत नाही. अशा वेळी पालकांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेण्यासाठी मुले मुद्दाम चिडचिड करतात किंवा ऐकण्याचे नाकारतात. काही वेळा शाळेतील दडपण, मित्रांमधील वाद, भीती किंवा असुरक्षिततेची भावना यामुळे मुले अंतर्गत तणावाखाली असतात. हा अंतर्गत राग बाहेर काढण्यासाठी ते बचावात्मक म्हणून बंडखोर वर्तन करतात. अति लाडावलेली आणि हट्टी मुलं हाताळणे हे पालकांसाठी एक मोठे आव्हान असते. बऱ्याचदा मुलांच्या सर्व मागण्या पूर्ण केल्यामुळे किंवा त्यांना प्रत्येक गोष्टीची सवय लावल्यामुळे मुलं हट्टी बनतात. अशा मुलांचा हट्टीपणा कमी करण्यासाठी पालकांनी काही गोष्टी आवर्जून टाळल्या पाहिजेत.

सतत उपदेश नको

मुलांवर ओरडू नये किंवा त्यांच्यावर हात टाकू नये. मूल हट्ट करत असताना जर तुम्ही त्यांच्यावर चिडलात, ओरडलात किंवा त्यांना मारले, तर मुलांच्या मनात राग आणि आक्रमकता वाढते. ते पालकांचे वर्तन पाहून तेच शिकतात. मुलांना सतत उपदेशसुद्धा करू नये. त्यांना सततचे उपदेश आवडत नाहीत. ते उपदेश झिडकारून देतात. मनाला येईल तसेच वागतात. एक आई तिच्या मुलाला सारखं म्हणते परीक्षा आली अभ्यास कर. सारखं सारखं तेच तेच ऐकून ते मूल वैतागून जाते. तेव्हा ते काय म्हणते...

आई म्हणते आली परीक्षा
सारखा टीव्ही पाहू नको
पुरे झाली आता भटकंती
मित्रांसोबत राहू नको
अरबट चरबट खाऊन काही
आजारी तू पडू नको
खेळबिळ कर सारे बंद
त्यासाठी आता रडू नको
पाठांतरावर जोर द्यायचा
परीक्षेत तू अडू नको
अभ्यासाचे नाव घेताच
कुठेतरी आता दडू नको
कंटाळा बघ नाही चालणार
सांगून ठेवते आज तुला
परीक्षेच्या अभ्यासाला
आता तरी तू लाग मुला
माझ्यापेक्षा आईलाच
परीक्षेची काळजी जास्त
येता जाता उठता बसता
अभ्यास कर बोलते फक्त
आईची बडबड ऐकून
डोके लागते उठायला
आई जे नको म्हणते,
तेच मी जातो करायला

यातून मला एकच सांगायचे आहे, मुले उपदेशातून नाही तर अनुकरणातून शिकतात. मुलांचा हट्टीपणा, त्यांची चिडचिड वाढण्यामागे आपले वागणे, जगणे कारणीभूत नाही ना, याचाही पालकांनी अंतर्मुख होऊन विचार केला पाहिजे.

एकनाथ आव्हाड
मो.९८२१७७७९६८
(लेखक साहित्य अकादमी बालसाहित्य पुरस्कारप्राप्त आहेत.)

तब्बू 'रुक रुक गर्ल'

आमच्या बॉलीवूड मध्ये हिरॉईनला अमुक अमुक गर्ल म्हणून लाडाची नावं ठेवण्याचा प्रघात आहे.जशी माधुरी 'धकधक गर्ल', हेलनजी 'गोल्डन गर्ल' तशी तब्बू 'रुक रुक गर्ल'. खरं म्हणजे 'विजयपथ'च्या त्याच नाही तर इतर गाण्यातही उंच, लंबू तब्बू नाच करताना ऑकवर्ड वाटते.'मुझे रंग दे' या 'तक्षक' मधल्या गाण्यातही ती उघडी पडते तरीही आमच्या सारख्या फॅन्स ना काही फरक पडत नाही कारण आम्हाला माहीत आहे आमची तबस्सूम हाश्मी त्या ही पलीकडे जाऊन, एक उत्कृष्ट अष्टपैलू अभिनेत्री आहे.



देव साहब ने तब्बूला लाँच केलेले. हे आठवण्यापेक्षा विसरलेलं बरं इतकी ती छोटी भूमिका वाईट आहे 'हम नौजवान' मधली.तद्नंतर तब्बूची मोठी बहीण फराह सिनेमात आली आणि गाजू लागली. या दोन मुली- बहिणी मात्र अजिबात वाटत नाही.दोघींचे स्वभाव सुद्धा टोकाचे विरुद्ध. फराह बिनधास्त, फटकळ तर तबस्सूम शांत,लाजाळू, भित्री.तब्बूचा 'प्रेम' हा बोनी कपूर आणि सतीश कौशिकच्या लाडात 'रूप की रानी' सारखाच अडकलेला एक चित्रपट,हीच तिच्या नायिका म्हणून बॉलिवूड मधल्या एंट्रीची दुर्दैवी ओळख. पण त्यातही तिच्या त्या धबधब्यातल्या नागाबरोबर नजरबंदीच्या प्रसंगात बाळीचे पाय पाळण्यात दिसले होते.

तब्बू हैदराबादची. दाक्षिणात्य फिल्म जगात तिचा वेगळा रुतबा आहे, वेगळी पहचान आहे.राजीव मेननच्या कंडूकोंडाईन कंडूकोंडाईन मध्ये तिची भूमिका सुरेख आहे आणि ऐश्वर्या रायची मोठी बहिण शोभते सुद्धा. शोभते या साठी म्हटलं की तब्बू ही ऐश्वर्या सारखी अचूक सौंदर्य असलेली मुलगी नाही. ती आपल्या आजूबाजूला असलेल्या सामान्य मुलींमध्ये थोडी उठून दिसणारी आहे असं वाटतं. त्यातही मध्यमवर्गातल्या उंच मुली, थोडा गंड बाळगून मागे मागे राहणाऱ्या असतात तशी भिडस्त.

पण जस जसा वक्त अपनी करवट बदलता रहा,आमच्या या थोराड, अवघडलेल्या तबस्सूमचे रूपांतर एका ultimate सेक्सी आणि desirable अशा मदनिकेत होऊ लागले. आधीचा उफाड्याचा बांधा आता सुडौल आणि ज्याला आपण voluptuous म्हणतो अशा भारतीय पुरुषांना प्रचंड आवडणाऱ्या फिगर मध्ये तब्दील होऊ लागला. जोडीला जातीवंत अभिनयाची आणि दाट मधाळ आवाजाची जोड आहेच.तब्बूचे चित्रपट मी इथे काउन्ट नाही करणार.गरज नाही.पण तिला जास्तकरून गंभीर आणि डार्क भूमिकांत हल्ली बघितले जाते म्हणून आवर्जून सांगेन तिची लाचखोर इन्स्पेक्टर किरण पाटकर फ्रॉम कोहराम धमाल आहे... अमिताभ, नानाच्या टकरीत तब्बू आपला कलीजा खलास करते.

एक गमतीदार वैयक्तिक अनुभव म्हणजे माझ्या बाईलेच्या ऑफिसशेजारी असलेल्या हेल्थ क्लिनिक मध्ये अनेक सेलेब्ज येत असत. एकदा मात्र ती ऑफिसमधून आल्यानंतर अगदी अत्यानंदाने म्हणाली.. तब्बू आली होती... तब्बूला पाहून माझी बाईल वेडीच झाली होती इतकी आकर्षक, (आमच्या मुंबईच्या भाषेत रावस) दिसत होती... मी मनात म्हटले या खुदा तो मर्द लोग का क्या होयेन्गा मॅन?

आमच्यानंतरची एक पिढी सुद्धा तब्बूची फॅन आहे आणि उसासून लिहिते हे पाहिलं की तब्बू बद्दल छान काहीतरी वाटून येते. कदाचित तिला वैयक्तिक आयुष्यात इतकं प्रेम मिळाले नसेल इतके बाहेरची लोक करतात (including इंडस्ट्रीमधले तालेवार दिग्दर्शक) हा पोएटिक जस्टीस असेल...अशी आमची बहुभाषिक (मराठी येतं बरं तिला okay type) आणि खरोखर सुस्वभावी पद्मश्री तबस्सूम हाश्मी!

ती खूप कर्मी वेळा दिलखुलास हसताना दिसते पण हसली की सेम तिच्या लेजेन्ड्री मावशी सारखी शबानासारखी सुंदर दिसते...तब्बू आणि स्कॉच जितकी मुरते,तितकी चढते!

-गुरुदत्त वसंत सोनसूरकर



'गरुडझेप' इतिहासजमा!

एका खेळाडूची निवृत्ती नाही,तर एका सुवर्णयुगाचा भावस्पर्शी अस्त! काही माणस जन्माला येतात ती आयुष्य जगण्यासाठी,काही स्वतःचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी, तर काही इतिहासाच्या पानांवर स्वतःचा ठसा उमटवण्यासाठी!ख्रिस्तियानो रोनाल्डो हे शेवटच्या वर्गवारीतले एक असामान्य व्यक्तिमत्त्व! फुटबॉलच्या मैदानावर चेंडूला दिलेली दिशा,हवेत घेतलेली गरुडझेप,प्रतिस्पर्ध्यांच्या बचावफळीला भेदणारी विजेच्या वेगाची धाव आणि गोलजाळ्याला भेदल्यानंतर दोन्ही हात पसरून केलेला तो विजयी आविष्कार...हे केवळ एका खेळाडूचे खेळातील कौशल्य नव्हते, तर त्याच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब होते.पोर्तुगालच्या राष्ट्रीय संघातून त्याने निवृत्ती जाहीर केली आणि फुटबॉलच्या एका सुवर्णयुगावर पडदा पडल्याची भावना जगभरातील चाहत्यांच्या मनात निर्माण झाली.

रोनाल्डोचा खेळ समजून घ्यायचा असेल तर त्याच्या व्यक्तिमत्त्वातील पैलू समजून घ्यावे लागतील. मैदानावरचा त्याचा वेग त्याच्या महत्त्वाकांक्षेची साक्ष देतो.प्रतिस्पर्ध्याला मागे टाकण्याची त्याची धडपड त्याच्यातील स्पर्धात्मक वृत्ती दाखवते.आकाशात उंच झेप घेऊन चेंडूला डोक्याने गोलजाळ्यात धाडण्याची त्याची क्षमता संकटांच्या कितीही उंच भिंती असल्या तरी त्यापलीकडे झेप घेण्याची मानसिकता अधोरेखित करते.त्याचे फ्री-किक असोत,पेनल्टी असोत किंवा निर्णायक क्षणी केलेले गोल असोत, प्रत्येक ठिकाणी एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते,ती म्हणजे स्वतःवरचा अढळ विश्वास! रोनाल्डो हा केवळ संधीची वाट पाहणारा खेळाडू नव्हता, तर संधी निर्माण करण्यासाठी परिस्थितीवर मात करणारा योद्धा होता.

त्याच्या खेळात आक्रमकता आहे; पण ती बेभान नाही. त्याच्या हालचालींमध्ये चपळता आहे; पण ती केवळ शारीरिक नाही, तर प्रतिस्पर्ध्याच्या पुढचा विचार करण्याची बुद्धिमत्ताही आहे. त्याच्या चेहऱ्यावर आत्मविश्वास आहे; कधी तो अहंकार वाटतो, तर कधी आत्मभानाचा परमोच्च बिंदू भासतो. गोल करण्याची भूक, पराभव स्वीकारण्याची अनिच्छा आणि प्रत्येक सामन्यानंतर स्वतःला अधिक सक्षम करण्याची धडपड ही त्याच्या स्वभावाची खरी ओळख आहे.५ फेब्रुवारी १९८५ रोजी पोर्तुगालमधील मदेइरा बेटावर एका सामान्य कुटुंबात जन्मलेल्या या मुलाचा प्रवास आज जगाच्या सर्वोच्च क्रीडाशिखरापर्यंत पोहोचला आहे. वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षी फुटबॉलचे प्रशिक्षण घेण्यासाठी रोनाल्डोला घर सोडावे लागले. लहान वयात कुटुंबापासून दूर राहण्याचा एकाकीपणा,घरची आठवण आणि स्वतःला सिद्ध करण्यासाठी करावा लागलेला संघर्ष या सगळ्यांनी त्याला आतून घडवले. आज त्याच्या पायातील वेग जगाला दिसतो; पण त्या वेगामागे बालपणीच्या संघर्षाचा इतिहास आहे.

त्याच्या आयुष्यातील सर्वांत मोठी वेदना म्हणजे वडिलांचे अकाली निधन. २००५ मध्ये वडिलांनी जगाचा निरोप घेतला. पुढे मुलगा जगातील महान फुटबॉलपटूंपैकी एक झाला, त्याने असंख्य विक्रम केले, संपत्ती आणि प्रसिद्धी मिळवली; पण या यशाचा आनंद वडिलांना अनुभवता आला नाही, ही खंत त्याच्या मनात कायम राहिली. आयुष्याच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचलेल्या माणसाच्या मनातही अशी एक हळवी जागा असते,जी कोणत्याही संपत्तीने भरून निघत नाही.आईशी असलेले त्याचे नातेही त्याच्या आयुष्याचा महत्त्वाचा आधार आहे.जगभरात प्रसिद्धी मिळाली,पण ज्या आईने संघर्षाच्या दिवसांत त्याला आधार दिला,तिच्याप्रती असलेली कृतज्ञता त्याने कायम जपली.त्याच्या आयुष्यात प्रेम, संसार आणि पितृत्वालाही तितकेच महत्त्व आहे. जॉर्जिना रॉड्रिग्जसोबतचे त्याचे नाते आणि मुलांबद्दलचे प्रेम हे त्याच्या मैदानाबाहेरील आयुष्याचे महत्त्वाचे पैलू आहेत.पाच मुलांचा पिता असलेल्या रोनाल्डोने २०२२ मध्ये जुळ्या मुलांच्या जन्मावेळी मुलाला गमावण्याचे असह्य दुःख अनुभवले. जगाला आनंद देणाऱ्या या महानायकाच्या आयुष्यातही असे दुःखाचे क्षण आले, ज्यांच्यापुढे कीर्ती, पैसा आणि प्रसिद्धीही निष्प्रभ ठरतात. मैदानावर लाखो प्रेक्षकांसमोर निर्भयपणे उभा राहणारा हा खेळाडू आयुष्यातील अशा प्रसंगांसमोर मात्र एक संवेदनशील पिता म्हणून उभा होता.

पोर्तुगालसाठी त्याने २३४ आंतरराष्ट्रीय सामने खेळले आणि १४६ गोल केले. सहा विश्वचषक स्पर्धांमध्ये गोल करण्याचा ऐतिहासिक पराक्रम त्याच्या नावावर आहे. २०१६ मध्ये पोर्तुगालला युरोपियन अजिंक्यपद मिळवून देण्यात त्याचे नेतृत्व ऐतिहासिक ठरले. २०१९ आणि २०२५ मधील नेशन्स लीगचे विजेतेपदही त्याच्या कारकिर्दीतील महत्त्वाचे टप्पे ठरले.त्याच्या प्रवासात टीका झाली, पराभव झाले, दुखापती झाल्या, तुलना झाली; पण त्याने प्रत्येक वेळी स्वतःला सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. लिओनेल मेस्सी आणि रोनाल्डो यांच्यातील श्रेष्ठत्वाची चर्चा अनेक वर्षे रंगली. मात्र या दोघांनी फुटबॉलला दिलेलं योगदान हे कोणत्याही तुलनेच्या पलीकडचं आहे. एका पिढीला त्यांनी खेळाचे वेड लावले आणि जगभरातील असंख्य मुलांना मैदानावर स्वप्न पाहण्याची प्रेरणा दिली.

आज पोर्तुगालच्या जर्सीतील सात क्रमांक मैदानातून निरोप घेत आहे; पण लक्षात ठेवा, जर्सी बदलतात, खेळाडू बदलतात, विक्रम मोडले जातात, काळ पुढे सरकतो; मात्र काही नावं काळाच्या पलीकडे जातात. रोनाल्डो हे असेच एक नाव आहे!

सलाम महानायका! तुझी गरुडझेप संपलेली नाही, ती आता इतिहासाच्या आकाशात अजरामर झाली आहे!

धनंजय देशमुख
मो.९२८४३८२१०२

■ शनिवार, ७ नोव्हेंबर २०२६
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

अकोला
जिल्हा विशेष

शिलोडा, भोड येथील प्रकल्पांची सावरकर, धोत्रे यांच्याकडून पाहणी

पाणीटंचाईवर मात करण्यासाठी प्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापर

प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू ठेवण्याचे निर्देश

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहराला कचरामुक्त करण्यासोबतच आगामी उन्हाळ्यातील संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्याच्या दृष्टीने अकोला महानगरपालिकेच्या शिलोडा येथील मलजल शुद्धीकरण केंद्र आणि भोड येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाची शुक्रवारी पाहणी करण्यात आली. विधानसभेचे मुख्य प्रतोद तथा अकोला पूर्वचे आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, महापौर शारदा खेडकर आणि स्थायी समितीचे सभापती विजय अग्रवाल यांनी या दोन्ही प्रकल्पांच्या कामकाजाचा आढावा घेतला.



अकोला जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित झाल्याच्या पार्श्वभूमीवर आगामी उन्हाळ्यात पाणीटंचाईची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे शहरातील नवीन बांधकामांसाठी नळाचे पाणी, बोअरवेल आणि विहिरींचे पाणी वापरण्यावर बंदी घालण्यात आली आहे. मात्र, पाण्याअभावी बांधकामे ठप्प होऊ नयेत, यासाठी महापालिकेच्या शिलोडा येथील मलजल शुद्धीकरण केंद्रातून प्रक्रिया केलेले पाणी उपलब्ध करून देण्याची पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर शिलोडा येथील प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू ठेवण्याचे निर्देश संबंधित विभागप्रमुखांना देण्यात आले. प्रक्रिया केलेल्या पाण्याचा बांधकामांसाठी प्रभावी वापर व्हावा आणि पिण्याच्या पाण्यावरील अतिरिक्त ताण कमी व्हावा, यावर यावेळी भर देण्यात आला.

दरम्यान, भोड येथील घनकचरा व्यवस्थापन केंद्राचीही पाहणी करून तेथील कामकाजाचा आढावा घेण्यात आला. अकोला शहर पूर्णपणे कचरामुक्त करण्याच्या उद्दिष्टाने घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. शहरातील कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन आणि प्रकल्पाच्या नियमित कार्यक्षमतेवर लक्ष केंद्रित करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.ष्यावेळी भाजपचे शहराध्यक्ष जयंत मसने, मनपा सभागृहनेते पवन महल्ले, कार्यकारी अभियंता अजय गुजर, पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल डोईफोडे, उपअभियंता श्रीकांत माणिकराव, कनिष्ठ अभियंता शैलेश चोपडे, संदीप चिमनकर, केदार ठाकरे, चैतन्य शंकरपुरे आदी उपस्थित होते.

सराफा दुकानातून ७० हजारांचा सोन्याचा कॉईन लंपास; १२ तासांत महिलेला अटक

सिटी कोतवाली पोलिसांची कारवाई; चोरीचा संपूर्ण मुद्देमाल हस्तगत

■ प्रतिनिधी | अकोला ■



दिवाळीनिमित्त सराफा बाजारात ग्राहकांची गर्दी असतानाच खरेदीचा बहाणा करून खंडेलवाल अलंकार केंद्रातून पाच ग्रॅम वजनाचा सोन्याचा कॉईन चोरणाऱ्या महिलेला सिटी कोतवाली पोलिसांच्या डी.बी. पथकाने अवघ्या १२ तासांत ताब्यात घेतले. पोलिसांनी तिच्याकडून चोरीस गेलेला ७० हजार रुपये किमतीचा सोन्याचा कॉईनही हस्तगत केला आहे.

याप्रकरणी खंडेलवाल अलंकार केंद्राचे व्यवस्थापक सागर प्रविणचंद्र दोशी (वय ५२, रा. प्राची विहार क्र. २, मलकापूर चौक, अकोला) यांनी ५ नोव्हेंबर रोजी सिटी कोतवाली पोलिसांत तक्रार दाखल केली. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर दुकानात ग्राहकांची गर्दी असताना एक अनोळखी महिला सोन्याची खरेदी करण्याच्या बहाण्याने दुकानात आली. गर्दीचा फायदा घेत तिने हातचलाखीने पाच ग्रॅम वजनाचा, अंदाजे ७० हजार रुपये किमतीचा सोन्याचा कॉईन चोरून नेला.

या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा क्रमांक ३७५/२०२६, भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(३) अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. दुकानातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी रेणुका ज्ञानबा राऊत (वय ७१, रा. तेलगोटे किराणा जवळ, न्यू भीमनगर, कृषीनगर, अकोला) हिला या चोरीप्रकरणी निष्पन्न केले. तिच्याकडून चोरीचा संपूर्ण सोन्याचा कॉईन हस्तगत करण्यात आला.

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक निलेश पांडे आणि शहर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संजय गवई यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली. डी.बी. पथकातील पोलीस हवालदार अजय भटकर, ख्वाजा शेख, किशोर येउल, पोलीस कर्मचारी शैलेश घुगे, आकाश जामोदे आणि गणेश डुमपल्लू यांनी कारवाईत सहभाग घेतला. पुढील तपास पोलीस हवालदार अजय भटकर करीत आहेत.

प्रदूषणमुक्त दिवाळीसाठी 'ग्रीन फटाक्यां'चा वापर करा!

लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांच्या आरोग्याची काळजी घेण्याचे महापौर खेडकर यांचे आवाहन

■ प्रतिनिधी | अकोला ■



प्रकाश आणि आनंदाचा सण असलेल्या दीपावलीत पर्यावरणाचे रक्षण करण्यासोबतच शहरातील हवा व ध्वनी प्रदूषण रोखण्यासाठी नागरिकांनी पर्यावरणपूरक आणि सुरक्षित दिवाळी साजरी करावी, असे आवाहन महापौर शारदा रणजित खेडकर यांनी केले आहे. कमी आवाजाचे आणि कमी धूर निर्माण करणारे ग्रीन फटाके वापरून अकोला शहर प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी महानगरपालिकेला सहकार्य करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

दिवाळी हा आनंदाचा आणि प्रकाशाचा उत्सव आहे. मात्र, सणाच्या उत्साहात पर्यावरणाकडे दुर्लक्ष होता कामा नये. वाढते हवा आणि ध्वनी प्रदूषण लक्षात घेता प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने सण साजरा करणे आवश्यक आहे. फटाक्यांच्या अतिवापरामुळे निर्माण होणारा धूर आणि कर्णकर्कश आवाज याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होतो. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि विविध आजारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांना याचा अधिक त्रास सहन करावा लागतो, याकडे महापौरांनी लक्ष वेधले. फटाके फोडताना आवश्यक सुरक्षा नियमांचे पालन करावे. निष्काळजीपणामुळे कोणतीही दुर्घटना घडणार नाही, याची खबरदारी घ्यावी. लहान मुले आणि वृद्धांच्या आरोग्याची विशेष काळजी घेण्याबरोबरच आपल्या परिसरातील स्वच्छताही कायम ठेवावी, असेही त्यांनी सांगितले. अकोला शहर स्वच्छ, सुंदर, हरित आणि प्रदूषणमुक्त ठेवण्याची जबाबदारी केवळ महानगरपालिकेची नसून प्रत्येक नागरिकाची आहे. त्यामुळे नागरिकांनी पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करून शहराच्या पर्यावरण संवर्धनासाठी हातभार लावावा, असे आवाहन महापौर शारदा खेडकर यांनी केले. यावेळी त्यांनी समस्त अकोलेकरांना दीपावलीच्या शुभेच्छाही दिल्या.

असंसर्गजन्य आजारांच्या निदान-उपचारांसाठी विशेष मोहीम

अकोला : सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे अकोला जिल्ह्यात 'तीस वर्षांचा पल्ला – तपासणी अन् सल्ला' हे १०० दिवसांचे विशेष अभियान राबविण्यात येत आहे. 'माझं गाव आरोग्य संपन्न गाव अभियान' अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या या मोहिमेचा कालावधी १ सप्टेंबर ते १० डिसेंबर असा आहे.

या अभियानांतर्गत ३० वर्षे व त्यावरील महिला व पुरुषांची उच्च रक्तदाब, मधुमेह तसेच तोंडाचा, स्तनाचा आणि गर्भाशय मुखाचा कर्करोग यांसारख्या असंसर्गजन्य आजारांची प्राथमिक तपासणी करण्यात येत आहे. आजारांचे लवकर निदान, उपचार, संदर्भ सेवा आणि पाठपुरावा सुनिश्चित करणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे.

अस्वच्छतेचे गंभीर प्रकार; दुर्गा गृह उद्योगाचा अन्न परवाना निलंबित

मिक्स शेव आणि भेळ नमकिनचे नमुने तपासणीसाठी रवाना ; अन्न सुरक्षा विभागाची कारवाई

■ प्रतिनिधी | अकोला ■



अन्नपदार्थांच्या निर्मिती व हाताळणीदरम्यान स्वच्छतेच्या नियमांना हरताळ फासल्याचे आढळून आल्याने अन्न व औषध प्रशासनाने कैलाश टेकडीजवळील मे. दुर्गा गृह उद्योग या आस्थापनेचा अन्न व्यवसाय परवाना तत्काळ प्रभावाने निलंबित केला आहे. ५ नोव्हेंबर रोजी करण्यात आलेल्या तपासणीत अनेक गंभीर त्रुटी आढळून आल्याने प्रशासनाने ही कारवाई केली.

अन्न सुरक्षा अधिकारी कि. ह. बोरचाटे यांनी संबंधित आस्थापनेची तपासणी केली. यावेळी मिक्स शेव नमकिन आणि भेळ नमकीन या दोन अन्नपदार्थांचे नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. तपासणीदरम्यान आस्थापनेतील भिंती व छत काळवंडलेल्या अवस्थेत असल्याचे, अन्नपदार्थ थेट फरशीवर ठेवले जात असल्याचे तसेच परिसरात अस्वच्छता असल्याचे निदर्शनास आले.

याशिवाय पिण्याच्या पाण्याचा विश्लेषण अहवाल, कामगारांची वैद्यकीय प्रमाणपत्रे, फोस्टॅक (इदएऊ) प्रशिक्षणाचा अहवाल आणि कीड नियंत्रणाची नोंद उपलब्ध नव्हती. खिडक्यांना कीटक प्रतिबंधक जाळ्याही लावण्यात आलेल्या नव्हत्या. अशा प्रकारे अन्न सुरक्षा व मानके कायद्यातील अनुसूची चारमधील अनेक महत्त्वाच्या तरतुदींचे उल्लंघन होत असल्याचे तपासणीत स्पष्ट झाले.

अन्नपदार्थांच्या निर्मितीच्या ठिकाणी स्वच्छता आणि सुरक्षिततेच्या मूलभूत नियमांचे पालन करणे बंधनकारक असताना त्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचे या कारवाईतून समोर आले आहे. त्यामुळे ग्राहकांच्या आरोग्याच्या दृष्टीने खबरदारीचा उपाय म्हणून संबंधित आस्थापनेचा परवाना तत्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आला.

ही कारवाई मुंबईचे आयुक्त तुकाराम मुंढे, अमरावतीचे सहआयुक्त (अन्न) स. द. केदारे आणि अकोल्याचे सहाय्यक आयुक्त (अन्न) दे. गो. वीर यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी कि. ह. बोरचाटे यांनी केली.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर भाजपचे शहरात महास्वच्छता अभियान

चार दिवसांत मुख्य रस्ते, बाजारपेठा आणि सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता



■ प्रतिनिधी | अकोला ■

दिवाळी आणि सणासुदीच्या पार्श्वभूमीवर अकोला शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्याच्या उद्देशाने भारतीय जनता पक्षाच्या वतीने २ ते ५ नोव्हेंबरदरम्यान शहरात महास्वच्छता अभियान राबविण्यात आले. शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठा, सार्वजनिक ठिकाणे तसेच विविध प्रभागांमध्ये हे अभियान राबवून स्वच्छता करण्यात आली. विधानसभेचे मुख्य प्रतोद तथा अकोला पूर्वचे आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, महापौर शारदा रणजीत खेडकर, स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल आणि भाजपचे शहराध्यक्ष जयंत मसने यांच्या नेतृत्वात हे अभियान पार पडले. या अभियानांतर्गत प्रभागनिहाय स्वच्छतेचे नियोजन करण्यात आले होते. काही ठिकाणी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत, तर काही भागांत सायंकाळी ६ ते मध्यरात्री १२ वाजेपर्यंत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. शहरातील मुख्य रस्ते, बाजारपेठा आणि वर्दळीच्या सार्वजनिक ठिकाणांवरील स्वच्छतेवर विशेष भर देण्यात आला.

या मोहिमेत संबंधित प्रभागांतील नगरसेवक, नगरसेविका, मंडळ अधिकारी, भाजपचे पदाधिकारी, महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी यांच्यासह स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. सणासुदीच्या काळात शहरातील स्वच्छता राखण्यासाठी राबविण्यात आलेल्या या अभियानामुळे स्वच्छतेचा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

पेन्शनर्सना हयातीचा दाखला सादर करणे अधिक सुलभ; वित्त विभागातर्फे डिजीटल सुविधा

अकोला : राज्य शासनाच्या निवृत्तीवेतनधारकांनी तसेच कुटुंब निवृत्तीवेतनधारकांनी दि. ३० नोव्हेंबरपर्यंत वार्षिक डिजिटल लाइफ सर्टिफिकेट (हयातीचा दाखला) सादर करावे, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी माधव ब. झुंजारे यांनी केले आहे.

कोषागार कार्यालयामार्फत दरवर्षी निवृत्तीवेतनधारकांना हयातीचा दाखला सादर करण्याबाबत सूचित करण्यात येते. यावर्षी १ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत प्रचलित पद्धतीनुसार बँकेत हयातीच्या पुस्तकावर सही करून दाखला देण्याऐवजी केंद्र शासनाच्या 'डीएलसी कॅम्पेन ५' अंतर्गत डिजिटल स्वरूपात हयातीचा दाखला सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यासाठी नोव्हेंबर महिनाभर देशव्यापी अभियान चालणार आहे.

त्यामुळे निवृत्तीवेतनधारकांनी आपला वार्षिक हयातीचा दाखला प्रत्यक्ष कागदपत्रांच्या स्वरूपात सादर न करता डिजिटल लाइफ सर्टिफिकेट स्वरूपात सादर करावा. यामुळे प्रमाणपत्र सादर करण्याची प्रक्रिया अधिक सुलभ होणार आहे.तरी अकोला जिल्ह्यातील सर्व राज्य शासकीय निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांनी विहित कालावधीत डिजिटल स्वरूपात हयातीचा दाखला सादर करून सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी माधव झुंजारे यांनी केले आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३२४
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

जाहीर नोटीस

विधमान न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय क्र ०१, अकोट.

कि फौ अर्ज क्रमांक २७४/२०२६ चौता २६/११/२०२६

अर्जदार :- अब्दुल शहीद अ वहाब, रा. मोहाळा ता. अकोट जि. अकोला

विरुध्द

गैरअर्जदार : सचिव ग्राम पंचायत, मोहाळा ता. अकोट, जि. अकोला

ज्या अर्थी अर्जदार अब्दुल शहीद अ वहाब यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला की, अर्जदाराचे स्वत: नामे अब्दुल शहीद अ. वहाब यांचा जन्म दिनांक १९/०२/१९४४ रोजी मोहाळा ता. अकोट जि. अकोला येथे झाला आहे.

कलम १३(३) जन्म/मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ अन्वये सदर जन्म / मृत्युची नोंद होणेबाबत आदेश करण्याची मागणी सदर अर्जात केली आहे. तरी या नोटीसव्दारे कळविण्यात येते की सदर नोंद घेण्यास कोणचाही आक्षेप किंवा हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रकाशीत झाल्यापासुन १५ दिवसाचे आत सदर न्यायालयात स्वत: अथवा वकीलामार्फत हजर राहुन आक्षेप नोंदवावा मुदती हजर न राहील्यास मागणी नुसार नोंद घेण्याबाबतचा आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. करीता अजा दिनांक ०६/११/२०२६ रोजी माझे सहिने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
प्र - सहाय्यक अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय
(कोर्ट क्र ०१ अकोट), अकोट

Change In Name

(Old passport No L8599215) I Have Change My Mother Name In My Passport From
BHAVINI SAMIR SHAH -TO-
BHAVINI SAMEER SHAH
My Residential Address is Navrang Society, Near M B School, New Radha Kishan Plot, Akola, Maharshtra , 444001

Change In Name

(Old passport No L8599215) I Have Change My Name In My Passport From
DHRITI SAMIR SHAH -TO-
DHRITI SAMEER SHAH
My Residential Address is9 - Navrang Society, Akola, Maharshtra , 444001

जाहीर नोटीस

वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १८४७/२०२६ प्रोसेस नं.१३८८७/२०२६
चौ.ता. १८/१२/२०२६ दिनांक : २९/१०/२०२६

अर्जदार : १. दिनेश रामशंकर शुक्ला २. उमेश रामशंकर शुक्ला दोघेही रा. हनुमान मंदिर जवळ, छोटी उमरी, अकोला. ता. जि. अकोला. ३. सुधा दुर्गाप्रसाद तिवारी रा. पंचशिल नगर, खरप रोड, अकोला. ता. जि. अकोला. ४. नरेश रामशंकर शुक्ला (मयत) ४अ. श्रीमती. मंदा नरेश शुक्ला ४ ब. जय नरेश शुक्ला मो. क्र. ९८३४०५००२३, ४ क. रोहित नरेश शुक्ला क्र. ४अ ते ४क. रा. हनुमान मंदिर जवळ, छोटी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : निल.

मयताचा पत्ता :- मयत : १. रामशंकर रघुवरप्रसाद शुक्ला २. रामकिशोरी रामशंकर शुक्ला

पत्ता :- रा. हनुमान मंदिर जवळ, छोटी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रामशंकर रघुवरप्रसाद शुक्ला यांचे दि. १६/०५/२०१९ रोजी व मयत रामकिशोरी रामशंकर शुक्ला यांचे दि. १६/०६/२०२१ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १८/१२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

वि.०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १८६७/२०२६ प्रोसेस नं.१४१७७/२०२६
चौ.ता. १४/१२/२०२६ दिनांक : ०५/११/२०२६

अर्जदार : १. सुनील श्रीराम गावंडे २. अनील श्रीराम गावंडे दोन्ही रा. एस. बी. आय. कॉलनी नं ५, लहान उमरी, अकोला, ता. जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : कोणीही नाही.

मयताचा पत्ता :- मयत : १. श्रीराम महादेव गावंडे

पत्ता :- रा. एस. बी. आय. कॉलनी नं ५, लहान उमरी, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, श्रीराम महादेव गावंडे यांचे दि. ०५/१०/२०२६ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १४/१२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/११/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १७८७/२०२६ प्रोसेस नं.१४१४६/२०२६
चौ.ता. ०५/१२/२०२६ दिनांक : ०४/०९/२०२६

अर्जदार : १. रुखमा विनायकराव नवलकार रा. दहीगाव गावंडे, ता. जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : कोणीही नाही.

मयताचा पत्ता :- मयत : १. विनायक हरिभाउ नवलकार

पत्ता :- रा. दहीगाव गावंडे, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, विनायक हरिभाउ नवलकार यांचे दि. २५/०१/२०२६ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०५/१२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०४/११/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

Change In Name

(Old passport No L8599215) I Have Change My Father Name In My Passport From
SAMIR SHAH -TO-
SAMEER RAJENDRA SHAH
My Residential Address is Raghuveer 9A, Navrang Society, Near M B Vidhayalay, New Radha Kishan Plot, Akola, Maharshtra - 444001

जाहीर नोटीस

वि.०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १८८०/२०२६ प्रोसेस नं.१४१७९/२०२६
चौ.ता. १५/१२/२०२६ दिनांक : ०५/११/२०२६

अर्जदार : १. शशिकला मारतंडराव देशमुख रा. उगवा, ता. जि. अकोला २. सौ. छाया सुधीर चव्हान रा. साई सदन चॉल रूम नं १ एम जी रोड, चारकोप गाव, मोरेश्वर हाउस, कांडीवली वेस्ट, मुंबई ३. सौ. जया राम देशमुख रा. पनज ता. अकोट जि. अकोला ४. सुनील मारतंडराव देशमुख ५. अनिल मारतंडराव देशमुख ६. अमोल मारतंडराव देशमुख क.४ ते ६ रा. उगवा देशमुख पुरा, ता. जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : कोणीही नाही.

मयताचा पत्ता :- मयत : मारतंडराव महादेवराव देशमुख

पत्ता :- रा. देशमुखपुरा उगवा, ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मारतंडराव महादेवराव देशमुख यांचे दि. २३/०६/२०२५ रोजी गव्हरमेंट मेडिकल कॉलेज अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १५/१२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/११/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

अकोला महानगरपालिका, अकोला
विद्युत विभाग

निविदा सुचना क्र. ०१, (सन २०२६-२७)

अकोला महानगरपालिकेच्या विद्युत विभागा मार्फत म.न.पा निधी (२०२६-२७) अंतर्गत एक काम पूर्ण करण्या करिता सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) महाराष्ट्र शासन यांचे कडे नोंदणीकृत कंत्राटदार यांचे कडून निविदा मागविण्यात येत आहे. संबंधीत इच्छुकांनी विस्तृत माहीती करीता खालील नमुद संकेत स्थळावर भेट द्याव

Portal https://amcakola.in

शहर अभियंता
अकोला महानगर पालिका, अकोला

जा.क्र./ अमपा/विद्युत/१२/२०२६,
विद्युत विभाग
अकोला महानगरपालिका, अकोला
दिनांक : ०६/११/२०२६

पाटबंधारे कार्यालयात अधिकारी-कर्मचाऱ्यांची 'दांडी'; शेतकऱ्यांनी दाद मागायची कुणाकडे

२६ कर्मचाऱ्यांच्या कार्यालयात अवघे पाचच हजर,तलावाची माहिती मागताच कर्मचाऱ्यांचे हात वर

आष्टी (शहीद)/जनमाध्यम

शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी मिळावे,सिंचनाच्या समस्या सुटाव्यात आणि जलसाठ्याची वस्तुस्थिती समजावी,यासाठी उभारलेल्या पाटबंधारे विभागाच्या कार्यालयातच अधिकारी-कर्मचाऱ्यांचा ठावठिकाणा नसल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. तब्बल २६ कर्मचाऱ्यांची नियुक्ती असलेल्या कार्यालयात शुक्रवारी अवघे पाच कर्मचारी उपस्थित होते. उपविभागीय अधिकारीही कार्यालयात नव्हते. विशेष म्हणजे, शेतकऱ्याने तलावासंदर्भात माहिती मागितली असता कर्मचाऱ्यांनी माहिती देण्याऐवजी हात वर केले. त्यामुळे पाटबंधारे विभागाचा कारभार नेमका कोणाच्या भरवशावर सुरू आहे,असा प्रश्न उपस्थित होत आहे.

आष्टी,देहेगाव गोंडी आणि आर्वी या तीन शाखांचा कारभार



आर्वी येथील उपविभागीय पाटबंधारे कार्यालयातून चालतो. तीन शाखांशी संबंधित सिंचन आणि जलसंपत्तीचे प्रश्न सोडविण्याची जबाबदारी असलेल्या या कार्यालयाची अवस्था मात्र दयनीय असल्याचे शुक्रवारी उघड झाले.प्रदीप पाथरे यांनी कार्यालयाला भेट दिली असता, मंजूर २६ कर्मचाऱ्यांपैकी केवळ पाच कर्मचारी उपस्थित असल्याचे निदर्शनास आले.

कार्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ एक कर्मचारी, दुसऱ्या खोलीत कामात व्यस्त असलेला कर्मचारी,तर अन्य खोलीत दुपारी १२ वाजताच्या सुमारास जेवण करणारे कर्मचारी दिसून आले.मात्र,ज्या अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली संपूर्ण कार्यालयाचा कारभार चालतो, ते उपविभागीय अधिकारीच कार्यालयात उपस्थित नव्हते.ते कुठे गेले,याची विचारणा केली असता कर्मचाऱ्यांकडेही ठोस उत्तर नव्हते. दिवाळीच्या निमित्ताने काही कर्मचारी कामावर आले नसल्याची माहिती समोर आली.

दिवाळीच्या सुट्ट्यांचा बहाणा की कर्तव्यालाच सुट्टी

शासकीय कार्यालयात नागरिकांची कामे वेळेत व्हावीत, यासाठी शासनाकडून वेतन आणि सुविधा दिल्या जातात. मात्र, कार्यालयातच कर्मचारी उपस्थित नसतील तर शेतकऱ्यांनी आपल्या समस्या मांडायच्या कुणाकडे असा प्रश्न उपस्थित होत आहे.

शेतकऱ्यांसाठी कार्यालय की केवळ पगारासाठी खुर्च्या

एकीकडे शेतकऱ्यांना सिंचन, तलावातील पाणीसाठा आणि शेतीच्या पाण्याच्या नियोजनासाठी सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात. दुसरीकडे संबंधित कार्यालयात अधिकारीच उपलब्ध नसतील आणि कर्मचारी माहिती देण्यास असमर्थ असतील, तर ही शेतकऱ्यांची थट्टाच म्हणावी लागेल. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकाराची तातडीने चौकशी करून अनुपस्थित अधिकारी-कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी. कार्यालयातील उपस्थितीची तपासणी करून शेतकऱ्यांना आवश्यक माहिती आणि सेवा वेळेत मिळतील, याची व्यवस्था करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

अधिकाऱ्यांची माहिती देण्यास टाळाटाळ

या प्रकरणासंदर्भात उपविभागीय अधिकारी टाळाटुले आणि आष्टीचे शाखा अभियंता कुबडे यांच्याशी आमच्या प्रतिनिधीने दूरध्वनीवरून संपर्क साधून माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, दोन्ही अधिकाऱ्यांनी प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे या कार्यालयातील कारभाराबाबत अधिकाऱ्यांची भूमिका स्पष्ट होऊ शकली नाही.

प्रदीप पाथरे यांना आष्टी येथील तलावासंदर्भात महत्त्वाची माहिती हवी होती. त्यांनी कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडे विचारणा केली. मात्र, संबंधित कर्मचाऱ्यांनी माहिती नसल्याचे सांगत जबाबदारी झटकली. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत एवढी अनास्था असेल तर या कार्यालयाच्या अस्तित्वाचा उपयोग तरी काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

आकोलीतून चारचाकी वाहनाने दोन शेळ्या लंपास

मध्यरात्री चोरट्यांचा धुमाकूळ; १८ हजारांचे नुकसान, वाहनाचा क्रमांक पोलिसांना दिला

आकोली/जनमाध्यम

गावात मध्यरात्रीच्या सुमारास चारचाकी वाहनातून आलेल्या दोघांनी गोठ्यासमोर बांधलेल्या दोन शेळ्या चोरून नेल्याची घटना आकोली येथे घडली. काळ्या आणि लालसर रंगाच्या या दोन शेळ्यांची किंमत १८ हजार रुपये असून, चोरट्यांनी वाहनातून पळ काढला. याप्रकरणी देवजी गोविंदा सोनवणे यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.

तक्रारीनुसार, गोविंदा कवडूजी सोनवणे हे आकोली येथे कुटुंबासह राहतात. ते रोजमजुरी करून उदरनिर्वाह करतात. त्यांच्याकडे शेळ्या असून, त्यांचे लहान भाऊ गजानन सोनवणे यांच्याकडेही चार ते पाच शेळ्या आहेत. दोन्ही भावांच्या शेळ्या घरासमोरील एकाच जागेत बांधण्यात येत होत्या.

४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी शेळ्या चारून आणल्यानंतर त्यांना नेहमीप्रमाणे बांधण्यात आले होते. त्यानंतर ५ नोव्हेंबरच्या रात्री सुमारे १.३० वाजताच्या सुमारास गजानन यांना घराबाहेर चारचाकी वाहन उभे असल्याचे दिसले.

यावेळी दोन व्यक्ती शेळ्यांच्या दिशेने जाताना दिसल्या. गजानन यांची चाहूल लागताच दोघांनी शेळ्या घेऊन वाहनात बसत विजयगोपाल रस्त्याच्या दिशेने पळ काढला.

या घटनेची माहिती गजानन यांनी तातडीने मोठे भाऊ गोविंदा यांना फोनवरून दिली. त्यानंतर गोविंदा यांनी विजयगोपाल येथील मित्र किशोर टाटू यांना संपर्क करून संशयित वाहन अडविण्यास सांगितले. किशोर यांनी रस्त्यावर ट्रॅक्टर आडवा लावून वाहन रोखण्याचा प्रयत्न केला.

मात्र, संशयितांनी ट्रॅक्टरच्या बाजूने वाहन काढून शिरपूर रस्त्याने पळ काढला.

यावेळी किशोर यांनी वाहनाचा क्रमांक पाहिला असता तो एमएच २७ एच ९६५४ असल्याचे समोर आले. चोरट्यांनी काळ्या रंगाची सुमारे पाच वर्षांची दहा हजार रुपये किमतीची आणि लालसर रंगाची सुमारे चार वर्षांची आठ हजार रुपये किमतीची अशा दोन शेळ्या चोरून नेल्या.

विशेष म्हणजे, यापूर्वी ऑगस्ट महिन्यातही त्यांच्या शेळ्या चोरीला गेल्याचे तक्रारीत नमूद आहे. याप्रकरणी पुलगाव पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अन्वये अज्ञात वाहनचालक आणि त्याच्या साथीदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वाहन क्रमांकाच्या आधारे पोलिसांकडून तपास सुरू आहे.

पुलगावात अवैध रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर पकडला

सहा लाख दहा हजारांचा मुद्देमाल जप्त

पुलगाव/जनमाध्यम

पुलगाव शहर परिसरात अवैध रेती वाहतुकीविरोधात पोलिसांनी कारवाई करत रेतीने भरलेला ट्रॅक्टर-ट्रॉली जप्त केली. या कारवाईत ट्रॅक्टर, ट्रॉली आणि एक ब्रास रेती असा एकूण सहा लाख दहा हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला. ही कारवाई ६ नोव्हेंबर रोजी माउली पार्क परिसरात करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुलगाव पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी संदीप बोरबन आणि पोलीस उपनिरीक्षक शहाजी घोडके हे पोलीस पथकासह परिसरात गस्तीवर असताना त्यांना गोपनीय माहिती मिळाली. अमरावती-पुलगाव महामार्गावरून माउली पार्कच्या दिशेने लाल रंगाचा ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये रेती भरून येत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी पंचांना सोबत घेत घटनास्थळी धाव घेतली.

यावेळी संशयित ट्रॅक्टर अडवून चालकाची चौकशी केली असता त्याने आपले नाव कैलास विठ्ठलराव फुडे (वय ४२, रा. पुलगाव) असे सांगितले. पोलिसांनी ट्रॅक्टरची कागदपत्रे आणि रेती वाहतुकीचा परवाना मागितला असता त्याच्याकडे कोणतीही कागदपत्रे अथवा रेती वाहतुकीचा परवाना नसल्याचे समोर आले.

तपासणीदरम्यान महिंद्रा कंपनीचा लाल रंगाचा ५८५ डीआय ट्रॅक्टर (एमएच ३२ एएच ९२९७) आणि त्याला जोडलेली ट्रॉली आढळून आली. ट्रॉलीमध्ये अंदाजे एक ब्रास काळी रेती भरलेली होती. पोलिसांनी पंचांसमक्ष कारवाई करून पाच लाख रुपये किमतीचा ट्रॅक्टर, एक लाख रुपये किमतीची ट्रॉली आणि दहा हजार रुपये किमतीची रेती असा एकूण सहा लाख दहा हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.याप्रकरणी कैलास फुडे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता, सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम, महाराष्ट्र गौण खनिज अधिनियम तसेच मोटार वाहन कायद्यान्वये पुलगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

माणिकवाड्यात ५५ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू

आष्टी-तालुक्यातील माणिकवाडा येथील सुरेश रामभाऊ चोरे (५५) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची नोंद आष्टी पोलिसांत करण्यात आली आहे.पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, १६ ऑक्टोबर रोजी रात्री ९ वाजताच्या सुमारास सुरेश चोरे यांना राहत्या घरी अचानक छातीत दुखू लागले. त्यांची प्रकृती गंभीर झाल्याने नातेवाइकांनी त्यांना प्रथम कारंजा येथील रुग्णालयात दाखल केले. या प्रकरणी संजय रामाजी हिरोडे (४८, रा. मानकापूर, नागपूर) यांनी दिलेल्या तक्रारीवरून आष्टी पोलिसांनी मर्ग दाखल केला आहे. घटनेच्या मृत्यूविषयक कागदपत्रांच्या आधारे पोलिसांकडून पुढील चौकशी करण्यात येत आहे.

हिवाळ्यातच उन्हाचे चटके; वर्धा जिल्ह्यात दुष्काळाच्या झळा तीव्र

पाणीटंचाई,रोजगाराचा अभाव आणि चाऱ्याचे संकट; शेतकरी व सर्वसामान्यांचे आर्थिक गणित कोलमडले

वर्धा/जनमाध्यम

हिवाळ्याची चाहूल लागली असतानाच जिल्ह्यात उन्हाचे तीव्र चटके जाणवू लागले आहेत. यंदाच्या अत्यल्प पावसामुळे निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीची तीव्रता आता वाढू लागली आहे.पाण्याची टंचाई,हाताला काम नाही,जनावरांसाठी चारा उपलब्ध नाही आणि दुसरीकडे अन्नधान्याच्या वाढत्या किमती,अशा दुहेरी संकटात शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिक सापडले आहेत.त्यामुळे उदरनिर्वाहाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. यंदा पावसाने पाठ फिरवल्याने खरीप हंगामाला मोठा फटका बसला.अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांचे नुकसान झाले असून कोरडवाहू शेतीचे उत्पादन घटले आहे.रब्बी हंगामासाठीही पुरेसा ओलावा नसल्याने पेरणी आणि उत्पादनाबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. परिणामी शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचे स्रोत आटले असून ग्रामीण भागातून रोजगारासाठी स्थलांतर वाढण्याची शक्यता आहे.

वर्धा जिल्ह्यातील आठही तालुक्यांचा दुष्काळी परिस्थितीत



समावेश करण्यात आला आहे. उपलब्ध प्रशासकीय आकडेवारीनुसार सुमारे २.६९ लाख हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून लाखो शेतकऱ्यांना दुष्काळाचा फटका बसला आहे. सात तालुक्यांतील प्राथमिक अहवालानुसार सुमारे २.१३ लाख शेतकरी आणि २.४१ लाख हेक्टर क्षेत्र प्रभावित झाले होते. देवळी तालुक्यातील १५० आणि कारंजा तालुक्यातील १२० गावांची पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी नोंदविण्यात आली होती. त्यामुळे जिल्ह्यातील ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील संकटाची तीव्रता स्पष्ट होते. दुष्काळामुळे पिण्याच्या पाण्याची समस्या गंभीर होत आहे. काही भागांत पाणी विक्रेत्यांकडून वाढीव दर आकारले जात असल्याने नागरिकांच्या खिशाला कात्री लागत आहे.त्यातच अन्नधान्य आणि जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतींमुळे घरगुती बजेट पूर्णतः कोलमडले आहे. जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही गंभीर बनत असून पशुपालकांसमोर जनावरे जगविण्याचे आव्हान उभे राहिले आहे.

दुष्काळग्रस्त शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी शासनाने तातडीने रोजगाराची कामे सुरू करावीत. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था,जनावरांसाठी चारा डेपो,नुकसानभरपाई आणि दुष्काळी मदतीचे वितरण यांना प्राधान्य देण्याची गरज आहे. लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था आणि स्वयंसेवी संघटनांनीही पुढाकार घेऊन संकटग्रस्तांना मदतीचा हात द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

तुकडोजी मैदानावर चाकू घेऊन फिरणारा तरुण जेरबंद

रामनगर पोलिसांची गुप्त माहितीवर कारवाई

वर्धा/जनमाध्यम

शहरातील तुकडोजी मैदान परिसरात कमरेला धारदार लोखंडी चाकू लपवून संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या तरुणाला रामनगर पोलिसांनी ताब्यात घेतले. शारुख हुसेन खा.पठाण (वय ३०, रा. इंदिरानगर, आर्वी नाका, वर्धा) असे आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून सुमारे २०० रुपये किमतीचा १५.५ इंच लांबीचा लोखंडी चाकू जप्त करण्यात आला.५ नोव्हेंबर रोजी दुपारी ही कारवाई करण्यात आली.

रामनगर पोलीस ठाण्याचे पथक परिसरात पेट्रोलिंग करीत असताना तुकडोजी मैदानावर एक व्यक्ती कमरेला लोखंडी चाकू बाळगून संशयास्पदरीत्या फिरत असल्याची माहिती गुप्त बातमीदारामार्फत मिळाली. या माहितीची खातरजमा करून पोलिसांनी पंचांना सोबत घेत घटनास्थळी धाव घेतली.

पोलिसांचे पथक मैदानावर पोहोचले असता संबंधित तरुण येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांना धाक दाखवत मोठमोठ्याने ओरडत असल्याचे दिसून आले.या चाकूची एकूण लांबी १५.५ इंच, पात्याची लांबी १० इंच, तर मध्यभागी रुंदी दोन इंच असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. पोलिसांनी चाकू जप्त करून आरोपीला पोलीस ठाण्यात आणले.या प्रकरणी शारुख पठाण याच्याविरुद्ध शस्त्र अधिनियम १९५९ च्या कलम ४ व २५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस कर्मचारी गजानन मस्के यांच्या फिर्यादीवरून ही कारवाई करण्यात आली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दिनेश कांबळे करीत आहेत.

४८ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू

आर्वी - तालुक्यातील टाकळखेडा येथे एका ४८ वर्षीय व्यक्तीचा हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाल्याची घटना ४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी घडली. प्रफुल्ल दीपकराव चौधरी (४८, रा. टाकळखेडा, ता. आर्वी) असे मृताचे नाव आहे.प्राप्त माहितीनुसार, ४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास प्रफुल्ल यांची प्रकृती अचानक बिघडली. त्यांना हृदयाविकाराचा झटका आल्यासारखी लक्षणे दिसून आली. हात-पाय आखडून ते बेशुद्ध पडल्याने नातेवाइकांनी त्यांना तातडीने आर्वी येथील खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र, प्रकृती गंभीर असल्याने डॉक्टरांनी त्यांना उपजिल्हा रुग्णालयात हलविण्याचा सल्ला दिला. तेथे तपासणीअंती डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.याप्रकरणी काशिनाथ पवार (५०, रा. पिंपळखुटा, जि. यवतमाळ) यांनी आर्वी पोलिसांत तोंडी तक्रार दिली. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी मर्ग दाखल केला आहे.

भरधाव कारच्या धडकेत दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू

दोघे जखमी,उपचारादरम्यान नागपुरात तोडला प्राण

आष्टी (शहीद)/जनमाध्यम



आष्टी-वर्धा मार्गावरील सावळपूर गावाजवळ भरधाव चारचाकी वाहनाने दुचाकीला समोरून जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवरील दुर्गेश लक्ष्मण गोयते (वय २६, रा. सावळी बुद्रुक, ता. कारंजा घाडगे) याचा मृत्यू झाला. या अपघातात त्याच्यासोबत असलेले बादल बाबाराव ढाले (वय २६, रा. येणगाव) आणि अश्विनी सुधाकर डोंगरे (वय १९, रा. बोरगाव ढोले) हे दोघेही जखमी झाले. उपचारादरम्यान दुर्गेशचा मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

पोलिसांत दाखल तक्रारीनुसार, दुर्गेश हा पुणे येथे हॉटेलमध्ये काम करीत होता. २६ ऑक्टोबर रोजी तो गावाला आला होता. २८ ऑक्टोबर रोजी सकाळी तो घरातून बाहेर पडला. दरम्यान, दुर्गेश हा मित्र बादल ढाले आणि अश्विनी डोंगरे यांच्यासह एमएच ३२ एटी ५८४५ क्रमांकाच्या दुचाकीने आर्वीकडे जात होता.

सावळपूर गावाजवळ आष्टी-वर्धा मार्गावर समोरून येणाऱ्या एमपी ०९ डीएन ३६७६ क्रमांकाच्या मारुती सुझुकी स्विफ्ट कारच्या चालकाने दुचाकीला जोरदार धडक दिली.या धडकेत तिघेही गंभीर जखमी झाले.जखमींना आर्वी येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. दुर्गेशच्या उजव्या पायाला तसेच शरीराच्या इतर भागांना गंभीर दुखापत झाली होती. प्रकृती चिंताजनक असल्याने त्याला पुढील उपचारासाठी नागपूर येथील मेडिकल रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

मुलाच्या मृत्यूनंतर वडील लक्ष्मण डोमाजी गोयते यांनी ५ नोव्हेंबर रोजी आष्टी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.त्यावरून स्विफ्ट कारचालकाविरुद्ध अपघातासंबंधी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक सतीश डेहनकर करीत आहेत.

लाडक्या बहिणीं फडणवीस सरकारवर नाराज

सात तास राबणाऱ्या महिलांच्या हातावर अवघे ८१ रुपये, मंत्रिमंडळ बैठकीत ज्येष्ठ मंत्र्यानेच दाखवला धोक्याचा इशारा

वर्धा/जनमाध्यम

ज्या लाडक्या बहिणींच्या मतांच्या बळावर महायुती सत्तेच्या खुर्चीवर विराजमान झाली, त्याच बहिणी आता सरकारच्या कारभारावर नाराजी व्यक्त करू लागल्या आहेत. निवडणुकीच्या काळात लाडक्या बहिणींवर योजनांचा वर्षाव करणाऱ्या सरकारने सत्तेत आल्यानंतर मात्र त्याच योजनांना कात्री लावण्याचा सपाटा सुरू केला आहे. तब्बल सात तास राबून शालेय पोषण आहार तयार करणाऱ्या महिलांच्या हातावर अवघे ८१ रुपये पडत असल्याची संतापजनक बाब समोर आली आहे. महिलांच्या या वाढत्या नाराजीचा उद्रेक झाला, तर सरकारला राजकीय किंमत मोजावी लागू शकते, असा स्पष्ट इशाराच राष्ट्रवादीच्या एका ज्येष्ठ मंत्र्याने मंत्रिमंडळ बैठकीत दिल्याने सरकारच्या गोटात खळबळ उडाली आहे.

सह्याद्री अतिथीगृहात पार पडलेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या साप्ताहिक बैठकीत राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेतला जात असताना महिलांच्या प्रश्नाने राजकीय वळण घेतले. राष्ट्रवादीच्या एका ज्येष्ठ मंत्र्याने लाडक्या बहिणींची व्यथा थेट मंत्रिमंडळासमोर मांडली. राज्याच्या तिजोरीवरील आर्थिक भार कमी करण्याच्या नावाखाली सरकारकडून सर्वसामान्यांसाठीच्या योजनांवर कात्री चालवली जात आहे. त्याचा सर्वाधिक फटका महिलांना बसत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

९० लाख बहिणी योजनेबाहेर

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना महायुती सरकारसाठी सत्तेचा राजकीय आधार ठरली. सुरुवातीला सुमारे दोन कोटी ४७ लाख महिलांना या योजनेचा लाभ दिला जात होता. मात्र, विविध आक्षेप आणि पडताळणीच्या नावाखाली तब्बल ९० लाख महिलांना योजनेतून वगळण्यात आल्याचा मुद्दा मंत्र्यांनी उपस्थित केला. ज्या महिलांना निवडणुकीपूर्वी लाडक्या बहिणी म्हणून सन्मान दिला, त्याच महिलांना आता लाभापासून दूर केले जात असल्याने सरकारविषयी असंतोष वाढत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आनंदाचा शिधा गायब, जीवनावश्यक वस्तूंचाही तुटवडा

केवळ लाडकी बहीण योजनेपुरतीच महिलांची नाराजी मर्यादित नाही. आनंदाचा शिधा बंद करण्यात आला आहे. दिवाळीसारख्या सणासुदीच्या काळातही केरोसिन मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत. सरकारकडून स्वस्त दरात उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या १४ जीवनावश्यक वस्तूंचाही नियमित पुरवठा होत नसल्याचा मुद्दा बैठकीत मांडण्यात आला.

सात तास काम, मोबदला फक्त ८१ रुपये

महिलांच्या शोषणाचा सर्वाधिक गंभीर प्रकार शालेय पोषण आहार योजनेत असल्याचे मंत्र्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांसाठी पोषण आहार तयार करण्याचे काम करणाऱ्या महिलांना तब्बल सात तास राबावे लागते. मात्र, त्याबदल्यात त्यांना केवळ ८१ रुपये मेहनताना मिळतो. या तुटपुंज्या मोबदल्यात वाढ करण्याची मागणी महिला संघटनांकडून सातत्याने होत आहे. काही महिला संघटनांच्या शिष्टमंडळानेही आपली व्यथा संबंधित मंत्र्यांकडे मांडली आहे.

महिलांच्या प्रश्नांकडे असेच दुर्लक्ष सुरू राहिले, तर आजवर महायुतीला भरभरून मतदान करणाऱ्या याच महिला उद्या सरकारविरोधात उभ्या ठाकू शकतात. नाराजीचा हा असंतोष वेळीच दूर केला नाही, तर त्याचे राजकीय परिणाम भोगावे लागतील, असा सूचक इशारा या ज्येष्ठ मंत्र्याने दिला.

वर्धेत २ लाख ८५ हजार लाडक्या बहिणी

लाडकी बहीण योजनेला मोठा प्रतिसाद मिळाला होता. जिल्ह्यातून ३ लाख २० हजार ४९१ महिलांनी अर्ज केले होते. त्यापैकी २ लाख ८५ हजार १११ महिलांचे अर्ज पात्र ठरले होते. या महिलांना दरमहा प्रत्येकी १ हजार ५०० रुपयांचा लाभ दिला जात होता. विशेष म्हणजे, जिल्ह्यातील ४३६ महिलांनी स्वेच्छेने योजनेतून माघार घेतली आहे. त्यामुळे राज्यभरातील लाभार्थी कपातीच्या पार्श्वभूमीवर वर्ध्यातील लाडक्या बहिणींच्या प्रश्नालाही महत्त्व प्राप्त झाले आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ३४०
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

खोट्या भरतीवर विश्वास ठेवू नये कृषी विभागाची बनावट भरती

अमरावती/प्रतिनिधीः- महाराष्ट्र शासन, कृषी विभाग, विभागीय कृषी सहसंचालक, अमरावती विभाग यांच्या नावाने समाज माध्यमांवर आणि इंटरनेटवर एक बोगस (बनावट) भरती जाहिरात क्र. ३४१२, ८ ऑक्टोबर २०२६ फिरत असल्याचे समोर आले आहे. या जाहिरातीमध्ये 'क्लार्क वर्ग-३ (गट-क)' या संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी ऑफलाइन पद्धतीने १० नोव्हेंबर २०२६ पर्यंत अर्ज मागविण्यात आल्याचे दर्शविले आहे. विभागीय कृषी सहसंचालक, अमरावती कार्यालयाव्दारे स्पष्ट करण्यात आले आहे की, अशी कोणतीही अधिकृत भरती प्रक्रिया सध्या सुरू करण्यात आलेली नसुन हे पत्र पूर्णपणे बनावट, खोटे आणि दिशाभूल करणारे आहे. सदर जाहिरातीशी या कार्यालयाचा कोणताही अधिकृत संबंध नाही.

घरगुती स्वयंपाकासाठी उत्साही व कल्पक व्यक्ती पाहिजेत

Personal Cook / Home Chef पाहिजे.

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ७वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२२५०/२०२६
Sachin Sharadrao Kanikar **-वि- निरंक**
पुढील ता.२०.११.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार ः 1. Sachin Sharadrao Kanikar
Age 44 Yrs. Occu.: Pvt.Job
R/o 101, Silver Heights Apartment Near Amar Colony, Meghdoot Colony, Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Sharad Keshavrao Kanikar हे दिनांक 26.08.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. व मयत Jyoti Sharad Kanikar हे दिनांक 22.12.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Sachin Sharadrao Kanikar -Vs- Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Sachin Sharadrao Kanikar -Vs- Nil वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२९.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

कार्यालय नगर परिषद, अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती
ई-निविदा सूचना

निविदा सूचना जा.क्र.बांध/२७७०/२०२६ दि.०६.११.२०२६

नगर परिषद अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती यांच्या वतीने नगर परिषद अंजनगांव सुर्जी हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे योजने अंतर्गत घेण्यात आलेल्या कामाची निविदा सिलबंद लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत असून निविदेतील अटी व शर्तीची पुर्तता करु शकत असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे योग्य त्या वर्गात पंजीबध्द कंत्राटदारांकडून निविदा दिनांक ०७.११.२०२६ पासून दिनांक ३०.११.२०२६, १७.०० वाजेपर्यंत मागविण्यात येत आहे. निविदेची विस्तृत माहिती नमुना https://www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पहावयास उपलब्ध आहे.

(अविनाश गायगोले)
अध्यक्ष
नगर परिषद,
अंजनगांव सुर्जी

(सौ.प्रियंकाताई मालठाणे)
उपाध्यक्ष
नगर परिषद,
अंजनगांव सुर्जी

(इब्राहीम बेग हसन बेग)
बांधकाम सभापती
नगर परिषद,
अंजनगांव सुर्जी

(विजय लोहकरे)
मुख्याधिकारी
नगर परिषद,
अंजनगांव सुर्जी

नगर परिषद नेर-नबाबपूर, जि.यवतमाळ
सूचना

नेर नबाबपूर शहराची विकास योजना (सुधारित) शासन नगर विकास विभाग अधिसूचना क्र.टीपीएस-२७१८/१३९३/प्र.क्र.११७/२०१८/नवि-३०, दि.०५.०८.२०१९ अन्वये मंजुर झालेली असून सदर विकास योजना दिनांक ०४.०९.२०१९ पासून अंमलात आलेली आहे.

नगर परिषद नेर-नबाबपूर कार्यालयास अर्जदार श्री.अंकित नरेश अग्रवाल, रा.नेर, जि.यवतमाळ यांनी त्यांच्या मालकीचे मौजा नेर ता.नेर नगर परिषद हद्दीमधील गट क्र.२३८, २३९ मधील १.२० हे.आर जमीन **म्युनिसिपल पर्पज** या आरक्षणातून वगळून रहिवास क्षेत्रात समाविष्ट करणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे.

त्यानुसार नगर परिषद नेर-नबाबपूर शहराची वाढती लोकसंख्या व नि वासी वापराची वाढती गरज व उपलब्ध खुली जागा लक्षात घेता सदर फेरबदल करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदलाचा ठराव नगर परिषद सर्वसाधारण सभा दि.२५.०६.२०२६ ठराव क्र.८ अन्वये मंजूर करण्यात आला असून त्याबाबतचा फेरबदलाचा तपशील खालीलप्रमाणे -

अ. क्र.	मौजा	भूमापन व उपविभाग	क्षेत्रफळ.	विकास योजनेतील अनुज्ञेय वापर	प्रस्तावित नियोजित वापर
१.	नेर	२३८, २३९	१.२० हे.आर.	**म्युनिसिपल पर्पज**	रहिवास वापर (रेसिडेंशियल झोन)

उपरोक्त फेरबदल दर्शविणारा नकाशा व त्यासंबंधी माहिती अहवाल नगर परिषद नेर-नबाबपूर कार्यालयात कार्यालयीन वेळी अवलोकनार्थ उपलब्ध आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये सुचित करण्यात येते की, नियोजित फेरबदलासंबंधी कोणाला काही आक्षेप अथवा सूचना असतील तर त्यांनी ही अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या मुदती आत (३० दिवसात) मुख्याधिकारी नगर परिषद नेर-नबाबपूर यांच्याकडे लेखी सादर करावे. जेणेकरुन फेरबदलाचा प्रस्ताव (कोणत्याही सुधारणा असल्यास त्यासह) मंजुरीसाठी राज्य शासनाकडे सादर करता येईल. विहीत मुदतीत कोणताही आक्षेप अथवा सूचना प्राप्त न झाल्यास पुढील कार्यवाही करीता सदर प्रस्ताव सभेसमोर अंतिम मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येईल.

स्वा/-
(पल्लवी सु.सोटे)
मुख्याधिकारी,
नगर परिषद, नेर-नबाबपूर

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती
दरपत्रक सूचना

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती क्र.०७२१-२६६२५४२ हे खालील प्रमाणे काम करण्यासाठी दर मागवित आहेत. दरपत्रके आपल्या प्रतिष्ठानचे लेटरहेडवर मोहरबंद लिफाफ्यात कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती यांचे कार्यालयात दिनांक २०.११.२०२६ ठिक १६.०० वाजेपर्यंत पोहचतील अशा बेताने पाठविण्यात यावेत.

अ.क्र.	साहित्याचे वर्णन	दरपत्रक सादर करण्याचा कालावधी
०१.	मोर्शी येथे मत्स्य विज्ञान महाविद्यालयाचे बांधकाम करणे या कामामध्ये येणारी झाडे तोडून उचल करणे बाबत.	१२.११.२०१६ ते २०.११.२०२६ ठीक १६.०० वाजेपर्यंत

टीप - साहित्याचे विनिर्देश संख्या तसेच इतर अटी व शर्ती कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती यांना विनंती केल्यास कार्यालयीन कामकाजाचे वेळेत (सुटीचे दिवस वगळून) विनामूल्य देण्यात येतील.

(वि.मा.का./अम/जाही/६१२/२०२६-२०२७)

कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१६२०/२०२६
विलास अधिक दोन -वि- निरंक
पुढील ता.२१.११.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार ः
1. Vilas Panjabrao Tale, Age 57 Yrs. Occu.: Pvt.Job
R/o Sushil Nagar, Sai Nagar, Po.Amravati. Tq. Dist. Amravati.
2. Anita Sheshrao Nerkar, Age 59 Yrs. Occu.: Service
R/o Gayatri Nagar, Kaulkhed Road, Akola.
3. Seema Manoj Nandekar, Age 54 Yrs. Occu.: Household
R/o Near Bus Stop, Borgaon Manju, Dist.Akola

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **प्रभावती पंजाबराव टाले** हे दिनांक 24.04.2026 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. तसेच मयत **विलास अधिक दोन विरुध्द निरंक** हे दिनांक 19.06.2020 रोजी **बडनेरा, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Rajendraprasad Gayaprasad Jain + 4 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **विलास अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०३.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.आर.आर.खामतकर, ३रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२३०५/२०२६
राजेंद्रप्रसाद अधिक चार -वि- निरंक
पुढील ता.०४.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार ः
1. Rajendraprasad Gayaprasad Jain, Age 80 Yrs. Occu.: Business
R/o Haridas Peth, New Town, Badnera, Amdapur, Amravati.
2. Satish Gayaprasad Jain, Aged 73 Yrs. Occu.: Business
R/o Subhash Chowk, Navi Vasti, Amdapur, Amravati.
3. Subhash Gayaprasad Jain, Age 69 Yrs. Occu.: Business
R/o New Town Vardhaman Traders, Weekly Market, Amdapur, Amravati
4. Atish Gayaprasad Jain, Age 66 Yrs. Occu.: Business
R/o Haridas Peth, New Town, Badnera, Amdapur, Amravati.
5. Dinesh Gayaprasad Jain, Aged 63 Yrs. Occu.: Business
R/o New Town Vardhaman Traders, Weekly Market, Amdapur, Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Gayaprasad Sundarlal Jain हे दिनांक 16.06.1997 रोजी **बडनेरा, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. तसेच मयत Khilonabai Gayaprasad Jain हे दिनांक 19.06.2020 रोजी **बडनेरा, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Rajendraprasad Gayaprasad Jain + 4 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Rajendraprasad Gayaprasad Jain + 4 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०३.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील
किरकोळ (R.M.J.C.) क्र.१५८/२०२६ ने.ता.०९.१२.२०२६

अर्जदार ः १. श्री.विठ्ठ लक्ष्मणराव काळे
रा.शेलुगूंड, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः १. श्री.राजेंद्र लक्ष्मणराव काळे,
२. श्री.तुळशीदास लक्ष्मणराव काळे
३. श्री.किशोर लक्ष्मणराव काळे
रा.शेलुगूंड, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती

ज्याअर्थी मयत **कमलाबाई लक्ष्मणराव काळे** यांचा मृत्यू दि.**०३.०३.२०२६** रोजी शेलुगूंड, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती येथे झाला असून ते तेथीलच मूळ रहिवासी होते. अर्जदार व गैरअर्जदार नं.१ ते ३ ही त्यांची मुले आहेत. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **०५.११.२०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
जन्माच्या नोंदीचा आदेश होण्याकरीता दाखल केलेल्या प्रकरणाचा जाहीरनामा

ईतर कि.फौ.अर्ज क्र.६६/२०२६ ने.ता.२३.११.२०२६

अर्जदार ः आबीद खान फाजल खान
वय ६७ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.अलहिलाल कॉलनी, अमरावती, ता.जि. जि.अमरावती

---- विरुध्द ---

गैरअर्जदार सचिव तथा जन्म मृत्यू अधिकारी
ग्रामपंचायत नांदसावंगी, जि.अमरावती

ज्याअर्थी अर्जदार नामे **आबीद खान फाजल खान** यांचा जन्म दि.**१०.०८.१९६१** रोजी मौजा नांदसावंगी ,ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. अर्जदार नामे आबीद खान फाजल खान यांच्या जन्माची नोंद, जन्म मृत्यू नोंदवहीमध्ये करण्यात आली नाही. करीता उपरोक्त अर्जदाराने त्यांची जन्माची नोंद जन्म मृत्यू अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये त्यांच्या जन्माच्या नोंदीचा आदेश नगरपंचायत कार्यालय नांदगाव खंडेश्वर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे होण्याकरीता वि.न्यायालयात दिनांक ५.१०.२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी दिनांक २३.११.२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०२.११.२०२६० रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील
किरकोळ (R.M.J.C.) क्र.३०१/२०२६ ने.ता.०२.१२.२०२६

अर्जदार ः
१. ललीता किसनराव बावनगडे
२. विनोद किसन बावनगडे, दोन्ही रा.बेलोरा (धामक) ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती
३. प्रमोद किसनराव बावनगडे (मयत मुलगा)
३अ) सुरेखा प्रमोद बावनगडे, रा.बेलोरा (धामक) ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती
३ब) निकिता चंदन घुटके, रा.पो.तरोडा, ता.आर्णी, जि.यवतमाळ
४. ताराबाई प्रदीप मंडपे (मयत मुलगी)
४अ) रोषण प्रदीप मंडपे
४ब) राहुल प्रदीप मंडपे, दोन्ही रा.बेलपुरा, रुक्मिणीनगर, अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः निरंक

ज्याअर्थी मयत **किसन पुंडलिक बावनगडे** यांचा मृत्यू दि.**१८.०१.२०२६** रोजी बेलोरा (धामक) ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती येथे झाला. मयताचे अर्जदार नं.१ ही पत्नी असून अर्जदार नं.२ हा मुलगा आहे. अर्जदार नं.३अ ही सून व ३ब ही नात आहे. अर्जदार नं.४ अ आणि ४ब हे नातू आहेत. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **३१ ऑक्टोबर २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 750/22/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **प्रयास चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती एफ-३८९२**
बाबत अर्जदार - **श्री.अविनाश कृष्णसा सावजी**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
(अ) जंगम मिळकत - निरंक
(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - अमरावती शहर मौजा राजापेठ स.क.२२ व ५९/१ मधील प्लॉट नं.७६, ७७-अ व ७७/ब मधील ७२१.७७ स्क्वे.मि. जागेवरील बांधकाम या जागेवरील ईमारतीचे बाधकाम महानगरपालिका यांच्या दि.१४.१०.२०१३ च्या परवानगी आदेश नं.००५६ व दि.१५.०१.२०१४ पत्र क.१४५ नुसार तसेच सहायक संचालक नगर रचना मनपा अमरावती यांनी मंजूर केलेल्या बांधकाम नकाशानुसार ७११.०३ स्क्वे.मि.क्षेत्रफळाच्या पाच मजली ईमारतीचे बांधकाम अंदाजे किंमत १,६१,५४,३१८/- आहे. सदर नोंद घेण्यात यावी.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२७.१०.२०२६** रोजी दिली.

शिक्का

अधीक्षक,(न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 749/22/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **प्रयास चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती एफ-३८९२**
बाबत अर्जदार - **श्री.अविनाश कृष्णसा सावजी**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
(अ) जंगम मिळकत - निरंक
(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - मौजा अनकवाडी, प्रगणे कुऱ्हा, ता.तिवसा, जि.अमरावती सर्व्हे नं.२०४, हे.आर. १.१८ भो.वर्ग-१, याची चतुःसिमा खालीलप्रमाणे--
पुर्वेस - नाला
पश्चिमेस - आज रोजी समर्पण संस्था यांना विकी करत असलेली जमीन
उत्तरेस - काळे यांचे शेत
दक्षिणेस- - तलाव

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२७.१०.२०२६** रोजी दिली.

शिक्का

अधीक्षक,(न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील
किरकोळ (R.M.J.C.) क्र.२९९/२०२६ ने.ता.०२.१२.२०२६

अर्जदार ः
१. देविदास अजाबराव झाडे, रा.अकोली रोड, पार्वती नगर, अमरावती
२. अशोक अजाबदार झाडे, रा.विठ्ठलवाडी नं.३, यवतमाळ
३. अरुण अजाबराव झाडे, रा.सूर्यादय नगर, वाघापूर, यवतमाळ
४. वसुंधरा मारोतराव दहातोंडे, रा.अंबा विहार, अकोली रोड, उकळी, अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः निरंक

ज्याअर्थी मयत **अजाबराव उत्तमराव झाडे** यांचा मृत्यू दि.**२०.०२.२०२०** रोजी पार्वती नगर, ता. जि.अमरावती येथे झाला. मयताची पत्नी नामे मंजुळाबाई अजाबराव झाडे यांचा मृत्यू दि.३०.०९.२०१६ मध्ये धामक, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती येथे झाला. मयताचे अर्जदार नं.१ ते ३ ही मुले असून अर्जदार नं.४ ही मुलगी आहे. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **३१ ऑक्टोबर २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.आर.आर.खामतकर, ३रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२३७५/२०२६
कमलाबाई अधिक चार -वि- निरंक
पुढील ता.१४.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार ः
1. Kamalabai Vasantrao Desai, Age about 75 Yrs. Occu.: Household
R/o Behind Cotton Market, Lakshmi Nagar, Amravati.
2. Sunita Dipak Desai, Age about 54 Yrs. Occu.: Household
R/o Lakshmi Nagar, Cotton Market, Amravati.
3. Nikita Yogesh Umekar, Age about 32 Yrs. Occu.: Household
R/o Plot No.44-A, Kathora Road, Sakshi Residency, VMV, Amravati
4. Aniket Dipakrao Desai, Age 28 Yrs. Occu.: Pvt.Job.
R/o Near Laharibaba Mandir, Lakshmi Nagar, Amravati.
5. Nitin Dipakrao Desai, Age 26 Yrs. Occu.: Pvt.Job
R/o Near Laharibaba Mandir, Lakshmi Nagar, Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Dipak Vasantrao Desai हे दिनांक 17.10.2021 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. तसेच मयत Kamalabai Vasantrao Desai + 4 हे दिनांक 19.06.2020 रोजी **बडनेरा, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Rajendraprasad Gayaprasad Jain + 4 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Kamalabai Vasantrao Desai + 4 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०३.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जाहीरनामा/सायटेशन नोटीस
एस.एस.भिंगारदेव, ७ वे न्यायदंडाधिकारी प्र.श्रे. जि.अमरावती यांच्या न्यायालयात (कोर्ट नं.०७)
कि.कि.अर्ज क्रमांक १२४८/२०२६

अर्जदार ः पंचशिल अशोक शेंडे
वय ३९ वर्षे, रा.भीम टेकडी जवळ, बेनोडा, अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदारः मा.निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी,
महानगरपालिका, अमरावती ता. जि.अमरावती

ज्याअर्थी यातील अर्जदाराने मा.कोर्ट नं.०१ मध्ये जन्म व मृत्यूची नोंदणी अधिनियम १९६६ चे कलम १३(३)(अ) प्रमाणे यातील अर्जदार **स्वतः** यांच्या जन्म दिनांक **२६.०८.१९८७** रोजी झाली आहे. अशी नोंद करण्याचा हुकूम होणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर अर्जाबाबत कोणाची काही तकार अगर हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द केल्यापासून ३० दिवसांच्या आत आपण आपल्या वकीलामार्फत अगर स्वतः मा.कोर्ट नं.०७ यांनी आपले म्हणणे मांडावे. सदर मुदतीत कोणाचीही तकार न आल्यास मा.कोर्ट नं.०७ योग्य तो हुकूम काढतील याची नोंद घ्यावी.

शिक्का

स्वाक्षरी/-
०७ वे सह दिवाणी न्यायालय,
कनिष्ठ स्तर, अमरावती

जाहीरनामा/सायटेशन नोटीस
वि.ए.बी.कट्टे साहेब न्यायदंडाधिकारी प्र.श्रे. जि.अमरावती यांच्या न्यायालयात (कोर्ट नं.०१)
कि.कि.अर्ज क्रमांक १२९२/२०२६

अर्जदार ः सैय्यद सादीक सैय्यद अकबर
वय ४९ वर्षे, रा.सुफियाना नगर नं.२, अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदारः मा.निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी,
महानगरपालिका, अमरावती ता. जि.अमरावती

ज्याअर्थी यातील अर्जदाराने मा.कोर्ट नं.०१ मध्ये जन्म व मृत्यूची नोंदणी अधिनियम १९६६ चे कलम १३(३)(अ) प्रमाणे यातील अर्जदार **सैय्यद सादीक सैय्यद अकबर** यांनी **सैय्यद सादीक सैय्यद अकबर** यांच्या जन्म दिनांक **०३.१०.१९७७** रोजी झाली आहे. अशी नोंद करण्याचा हुकूम होणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर अर्जाबाबत कोणाची काही तकार अगर हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द केल्यापासून ३० दिवसांच्या आत आपण आपल्या वकीलामार्फत अगर स्वतः मा.कोर्ट नं.०१ यांनी आपले म्हणणे मांडावे. सदर मुदतीत कोणाचीही तकार न आल्यास मा.कोर्ट नं.०१ योग्य तो हुकूम काढतील याची नोंद घ्यावी.

शिक्का

कनिष्ठ लिपिक
सह दिवाणी न्यायालय,
कनिष्ठ स्तर, अमरावती

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे

संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ६४
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

संक्षिप्त



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शिस्तबद्ध पथसंचलन

कुऱ्हा-राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्याला १०१ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने कुऱ्हा येथे शस्त्रपूजन उत्सवाचे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. या उत्सवाचे औचित्य साधून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने कुऱ्हा नगरातून भव्य व शिस्तबद्ध पथसंचलन काढण्यात आले. गणवेशधारी स्वयंसेवकांच्या शिस्तबद्ध संचलनाने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून भूषणजी पचारे उपस्थित होते. तसेच प्रमुख वक्ते म्हणून राजेशजी जुटी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.त्यानंतर स्वयंसेवकांनी पूर्ण गणवेशात पथसंचलनास प्रारंभ केला.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या १०१ वर्षांच्या कार्यप्रवासाचा गौरव करत संघटनेची विचारधारा, सामाजिक बांधिलकी, राष्ट्रीय भावना, सामाजिक समरस्ता, पंच परिवर्तन आणि समाजातील एकात्मता अधिक दृढ करण्याचा संदेश प्रमुख वक्ते राजेशजी जुटी सामाजिक समरस्ता मंच अमरावती जिल्हा या कार्यक्रमातून देण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सोहळे यांनी केले. त्यानंतर मुख्यशिक्षक अभिजितजी काढलकर यांनी कार्यक्रमाचे मार्गदर्शन केले. नोवीन पत्रे यांनी प्रार्थना सादर केली,तर प्रतीकजी पत्रे यांनी अमृतवचन सादर केले. मल्हार सोहळे यांनी सुभाषिताचे वाचन केले. गजाननजी बेहरे यांनी वैयक्तिक गीत सादर करून उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण केले.कार्यक्रमाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पदाधिकारी, स्वयंसेवक, कार्यकर्ते आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिस्तबद्ध नियोजन आणि उत्स्फूर्त सहभागामुळे शस्त्रपूजन उत्सव व पथसंचलनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

विद्यापीठ हिवाळीच्या काही परीक्षांच्या वेळापत्रकात बदल

अमरावती-संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या हिवाळी-२०२६ च्या लेखी परीक्षेची वेळापत्रके विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहेत, परंतु काही परीक्षांच्या वेळापत्रकात बदल करण्यात आले आहेत. यामध्ये बी.ए. (जे.एम.सी.) सेमि.-१ (एन.ई.पी.), बी.कॉम. (बी.डी.) सेमि.-३ (एन.ई.पी.) आणि बी.कॉम. (रिटेल मॅनेजमेंट) (एन.ई.पी.-ए.ई.डी.पी.) सेमि.-१ या परीक्षांचा समावेश आहे. यासंदर्भात सर्वसंबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य,केंद्राधिकारी,महाविद्यालये,परीक्षा केंद्रांना परीक्षा विभागाकडून कळविण्यात आले असून महाविद्यालयांनी तातडीने आपल्या विद्यार्थ्यांना याची जाणीव करुन द्यावी. तसेच विद्यार्थ्यांनी सुध्दा याची नोंद घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.नितीन कोळी यांनी केले आहे.अधिक माहितीकरीता विद्यापीठाच्या वेबसाईटवर परीक्षा विभागाच्या अधिका-यांच्या दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.



गावखेड्यांत पहाटे निनादतोय काकड आरतीचा स्वर

नांदगाव खंडेश्वर-गुलाबी थंडीची पहाट, सूर्य उगवायला अवकाश असतो, गाव साखर झोपेत असतानाच दूरवरून टाळांचा खणखणीत नाद कानी येतो, मृदंगाच्या तालावर एक धार्मिक सूर उमटतो आणि अंधारालाही भक्तीचे तेज चढते.गावखेड्यात मोठ्या प्रमाणात आणि उत्साहात टाळ-मृदंगाच्या गजरासोबत हरिभक्तीची चैतन्यमय लहर सर्वत्र पसरली असल्याचे दिसून येत आहे. महाराष्ट्रात कार्तिक स्नानानंतर काकडा आरतीने भक्तीचा जागर करण्याची वारकरी परंपरा आहे. कोजागिरी ते त्रिपुरारी पौर्णिमा, असे महिनाभर रोज पहाटे देवाला जागवण्यासाठी मंदिरात काकड आरती केली जाते. गावोगावचे भाविक ब्राह्ममुहूर्तावर स्नान करून मंदिरात एकत्र येतात. घंटानाद, टाळ, नगारा आणि शंखनादाने देवाला जागे करतात. तुळशीची वाळलेली काडी घेऊन तिला कोऱ्या कापडाची चिंधी गुंडाळतात आणि तेलातुपात भिजवून काकडा तयार करतात. त्याने देवाची आरती होते. वात जळल्यावर तिची काजळी कांस्याच्या पात्रावर काढून तिची भुकटी केली जाते, वारकरी आणि भाविक तो कपाळी धारण करतात. स्कंदपुराणात हा मास सर्व तीर्थांपेक्षा पवित्र सांगितला आहे.आजही काकड आरती मोजक्याच ठिकाणी दिसत असली, तरी वारकरी संस्कार पुढच्या पिढ्यांपर्यंत रुजवण्याचे काम त्यातून होत आहे.

अमरावती विद्यापीठाचे अवघ्या ४५ दिवसांत निकाल घोषित

अमरावती-संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी - २०२६ मधील ६७६ परीक्षांचे अवघ्या पंचेचाळीस दिवसांत निकाल घोषित करण्यात परीक्षा व मूल्यमापन मंडळाने मोठे यश मिळविले आहे. कमितकमी दिवसांत विद्यापीठाच्या परीक्षांचे निकाल घोषित करण्यात आल्याबद्दल परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी तसेच परीक्षा विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचा कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी पुष्पगुच्छ देवून सत्कार केला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनीही परीक्षा विभागातील सर्व अधिकारी व कर्मचा-यांनी केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल कौतुक केले. याप्रसंगी वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, उपकुलसचिव मोनाली तोटे पाटील, उपकुलसचिव राहुल नरवाडे, सहा. कुलसचिव अनिल मेश्राम, सहा. कुलसचिव मिलींद देशपांडे, गोपनिय विभागाचे सहा. कुलसचिव डॉ. विरेंद्र निमजे आदी उपस्थित होते.



दिवाळीवर दुष्काळाचे सावट; बाजारपेठेत शुकशुकाट!

दिवाळीला अवघा एक दिवस शिल्लक, तरीही बाजारपेठ ओस; फटाके, कपडे, फळांच्या खरेदीकडे ग्राहकांची पाठ

आसेगाव पूर्णा/वार्ताहर

दिवाळीला अवघा एक दिवस शिल्लक असतानाही आसेगाव पूर्णा येथील मुख्य बाजारपेठेत यंदा अपेक्षित उत्साह दिसून येत नाही. दरवर्षी दिवाळीच्या आठवडाभर आधीपासून ग्राहकांच्या गर्दीने फुलणारी बाजारपेठ यंदा मात्र ओस पडल्याचे चित्र आहे. नापिकी, दुष्काळी परिस्थिती आणि शेतकऱ्यांच्या हातात पैसा नसल्याने दिवाळीच्या खरेदीवर मोठा परिणाम झाला आहे.

दिवाळी हा आनंद, उत्साह आणि रोषणाईचा सण म्हणून ओळखला जातो. मात्र यंदा



शेतीतील नुकसान आणि आर्थिक अडचणींमुळे ग्रामीण भागातील नागरिकांचा उत्साह कमी झाल्याचे दिसत आहे. दरवर्षी दिवाळीच्या आठ दिवस आधीपासून फटाके, कपडे, मिठाई, फळे आणि सजावटीच्या साहित्याच्या दुकानांमध्ये मोठी गर्दी असते. यंदा मात्र सणाला एक दिवस उरला असतानाही बहुतांश दुकानांमध्ये ग्राहकांची वर्दळ कमी आहे.फटाके, कपडे आणि फळांच्या दुकानांमध्ये अपेक्षित विक्री होत नसून किराणा दुकानांमध्येही केवळ आवश्यक वस्तूंच्या खरेदीसाठी ग्राहक येत आहेत. यंदा नागरिकांकडून अनावश्यक खर्च टाळून केवळ गरजेच्या वस्तूंनाच प्राधान्य दिले जात असल्याचे चित्र आहे. परिणामी, दिवाळीच्या हंगामावर अवलंबून असलेल्या छोट्या व्यावसायिकांनाही मंदीचा सामना करावा लागत आहे.

यंदा दिवाळीच्या खरेदीत मोठी घट जाणवत आहे. ग्राहक केवळ आवश्यक किराणा साहित्य खरेदी करीत असून सणासाठीच्या अतिरिक्त वस्तूंची मागणी कमी झाली आहे. शेतकऱ्यांच्या हातात पैसा नसल्याने बाजारपेठेतील उलाढाल मंदावली आहे.

विक्रम कोळसकर, आसेगाव पूर्णा

'दरवर्षी दिवाळीच्या आदल्या दिवशी फळांची मोठ्या प्रमाणात विक्री होते. मात्र, यंदा ग्राहकांची संख्या खूपच कमी आहे. महागाई आणि शेतकऱ्यांच्या हातात पैसा नसल्याचा परिणाम बाजारपेठेवर दिसत आहे. फळे विक्रीसाठी आणली असली तरी ग्राहकांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने माल शिल्लक राहण्याची चिंता आहे. यंदाची दिवाळी आमच्यासारख्या छोट्या विक्रेत्यांसाठी आर्थिकदृष्ट्या निराशाजनक ठरत आहे.'

संजय धाकडे.

'तुझ्याच साठी' महानाटकाला रसिकांची उत्स्फूर्त प्रतिसाद

नागपूर-विश्वकेसरी फाउंडेशन, नागपूर यांच्या वतीने आयोजित आणि साईश्रवण निर्मित 'तुझ्याच साठी' या महानाट्याचा प्रयोग रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात उत्साहात पार पडला.विशेष म्हणजे, वेळेचे काटेकोर नियोजन राखत कार्यक्रमाची सुरुवात निर्धारित वेळेत करण्यात आली.

कार्यक्रमाचा प्रारंभ जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी फुटाणे,ठोंबरे काका, खांडेकर काकू आणि प्रदीप रहीसे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आला.यावेळी विश्वकेसरी फाउंडेशनच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे



बहारदार संचालन आसावरी जोशी यांनी केले. याप्रसंगी विश्वकेसरी फाउंडेशनच्या सामाजिक कार्याची माहिती उपस्थितांना देण्यात आली. संस्थेमार्फत गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत केली जात असून विद्यार्थ्यांच्या आरोग्य व स्वच्छतेसाठी 'स्वच्छ शौचालय उपक्रम' राबविण्यात येत आहे.

'तुझ्याच साठी' या महानाटकातील कलाकारांचा कसदार अभिनय, प्रभावी कथा आणि दर्जेदार दिग्दर्शन यामुळे संपूर्ण सभागृह मंत्रमुग्ध झाले. 'संत गजानन' फेम मुकुंद वसुले आणि 'माझ्या नवऱ्याची बायको' फेम देवेंद्र दोडके यांनी आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकली. तसेच रुपाली मोरे, अंश केदार आणि रोशनी सैलोकर यांच्या अभिनयालाही रसिकांनी भरभरून दाद दिली.

लेखक व दिग्दर्शक देवेंद्र बेलणकर यांनी नाटकाचे प्रभावी दिग्दर्शन केले. निर्माते देवेंद्र बेलणकर व रुपाली मोरे, तसेच कार्यकारी निर्माते देवेंद्र दोडके यांच्या नियोजनबद्ध संयोजनामुळे प्रयोग अत्यंत यशस्वी ठरला. या संपूर्ण कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विश्वकेसरी फाउंडेशनच्या ग्राउंड लेव्हल टीमने विशेष मेहनत घेतली.

या यशस्वी प्रयोगासाठी संस्थेने सर्व रसिक प्रेक्षक, मान्यवर, कलाकार, सहकारी आणि माध्यम प्रतिनिधींचे आभार मानले.

अंजनगाव बारीत पहाटे हरिनामाचा गजर...

अंजनगाव बारी/वार्ताहर

येथील प्रसिद्ध अकरावा महारुद्र हनुमान मंदिर व विठ्ठल-रखुमाई मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर काकड आरतीला भक्तिमय वातावरणात सुरुवात झाली आहे. यानिमित्त देवेंद्र कदम व वंदनाताई कदम यांच्याहस्ते विधिवत घटस्थापना करण्यात आली. तेव्हापासून दररोज पहाटे हरिनामाच्या गजरात काकड आरतीचा कार्यक्रम नियमितपणे सुरू आहे. दररोज महेंद्र तलमले यांच्या पुढाकाराने कार्यक्रमाची सुरुवात होते. त्यानंतर नारायणराव न्यायखोरे वारकरी पद्धतीने हरिनामाचा गजर करतात, तर आनंदराव हटवार काकड आरतीचे गायन करतात. संपूर्ण काकड आरती मुखपाठ असणारे ते एकमेव व्यक्ती आहेत. गुणवंतराव शेलोकार पांगुळ गायन सादर करतात, तर महादेवराव सैरपगारे वीणावादनाची साथ देतात. हार्मोनियमवर रुपलाल तलमले व सुधाकर तलमले साथ देतात. बालकलाकार प्रसाद किंदरळे मृदंगाची उत्कृष्ट संगत करतो, तर श्रीकृष्ण सैरीशे गौळण सादर करतात. शेवटी आरतीने कार्यक्रमाची सांगता होते.

यामध्ये शंकरराव पोकळे, माणिकराव इंगोले, भारत श्रीखंडे, मनोहर गोदे, पुरुषोत्तम कुन्हाडे, सुधाकर याऊल, मनोहर तेटू, राजू गुलालकरी, सुखदेव येवतकर, मारोतराव भुरे, सुरेश दरोळी, नरेंद्र रोडे, शंकरराव डोळे, बबलू राठोड यांच्यासह अनेक वारकरी व भाविकांची उपस्थिती असते. मंदिर परिसर स्वच्छ, सुंदर व सुशोभित ठेवण्यासाठी तसेच आकर्षक रांगोळ्या काढण्यासाठी परिसरातील महिलांचे मोठे योगदान लाभत आहे. विठ्ठल-रखुमाई मंदिरात प्रत्येक एकादशीला महिलांच्या भजनाचा कार्यक्रम आयोजित केला जातो. पहाटे काकड आरती आणि रात्री राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या सामुदायिक प्रार्थनेने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून जातो.



सावंगा (विठोबा) येथे दसरा यात्रा महोत्सवाची सांगता

चांदूर रेल्वे-विदर्भातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या चांदूर रेल्वे तालुक्यातील श्रीक्षेत्र सावंगा (विठोबा) येथील श्री विठोबा संस्थान ऊर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थानच्या दसरा यात्रा महोत्सवाची महाप्रसादाने सांगता झाली. यावेळी हजारो भाविकांनी उपस्थिती लावत महाप्रसादाचा लाभ घेतला. संस्थानचे विश्वस्त मंडळ आणि सेवाधारी यांच्या नियोजनातून हा महोत्सव भक्तिमय वातावरणात पार पडला.

दसऱ्याच्या दिवशी संस्थानचे विश्वस्त चरणदास नामदेवराव कांडलकर यांच्या हस्ते नवीन वस्त्र परिधान करून महाराजांच्या बोहलीचे विधिवत पूजन करण्यात आले. यानंतर संस्थान परिसरातील दोन्ही ७२ फूट उंच झेंड्यांचे पूजन करून त्यांना नवीन खोळ चढविण्याचा धार्मिक विधी पार पडला. झेंड्यांना पायाचा स्पर्श होऊ न देता दोरांच्या साहाय्याने नवीन खोळ चढविण्यात आली. हा चित्तथरारक सोहळा पाहण्यासाठी हजारो भाविकांनी गर्दी केली होती. मोठ्या उत्साहात हा सोहळा पार पडला. श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथे वर्षभर विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. या उपक्रमांसाठी सर्व भाविकांनी तन-मन-धनाने सहकार्य करावे, असे आवाहन संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल तसेच विश्वस्त वसंतराव शेंडे, गोविंद राठोड, फुलसिंह राठोड, चरणदास कांडलकर, प्रवीण कुकडकर, लक्ष्मण राठोड, विष्णू राठोड, वैभव मानकर आणि स्वप्निल चौधरी यांच्यासह समस्त विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात आले. गर्दी लक्षात घेता शांतता राखण्यासाठी संस्थानच्या वतीने स्वयंसेवक आणि सेवाधारी यांची नियुक्ती करण्यात आली होती. गैभाविकांची सोय आणि कार्यक्रम सुरळीत पार पाडण्यासाठी स्वयंसेवकांनी विशेष मेहनत घेतली.

कुऱ्हा प्राथमिक आरोग्य केंद्राला रिक्त पदांचे ग्रहण

विविध संवर्गांतील पदे वर्षभरापासून रिक्त; ८५ हजार नागरिकांच्या आरोग्य सेवेवर परिणाम

कुऱ्हा/वार्ताहर

येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला रिक्त पदांचे ग्रहण लागले असून, विविध संवर्गांतील कर्मचाऱ्यांची पदे दीर्घकाळापासून रिक्त असल्याने परिसरातील आरोग्य यंत्रणा कोलमडण्याच्या मार्गावर आहे. या प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत तब्बल ३० गावे आणि ७ आरोग्य उपकेंद्रांचा समावेश असून, सुमारे ८५ हजार लोकसंख्येच्या आरोग्याची जबाबदारी या केंद्रावर आहे. मात्र, आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने नागरिकांना आरोग्य सेवा पुरविताना कर्मचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्रातील सफाई कामगार गेली पाच वर्षांपासून आणि परिचर ही पदे मागील एक वर्षापासून रिक्त आहेत. याशिवाय आरोग्य सेविकांची दोन पदे, समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांची एक पदे रिक्त आहेत. त्यामुळे उपलब्ध कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण पडत असून, ग्रामीण भागातील रुग्णांना वेळेवर आणि पुरेशा प्रमाणात आरोग्य सेवा मिळण्यात अडथळे निर्माण होत आहेत.विशेष म्हणजे, प्राथमिक आरोग्य केंद्रातील प्रयोगशाळेत तज्ज्ञ पद रिक्त असल्यामुळे रक्त तपासणीसारख्या महत्त्वाच्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध होत नसल्याची गंभीर बाब समोर आली आहे. परिणामी, रुग्णांना रक्त तपासणीसाठी खासगी प्रयोगशाळा किंवा अन्य ठिकाणी जावे लागत आहे. यामुळे गरीब आणि सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक तसेच मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

आयुर्वेदीक दवाखाना मिर्चापूर येथे अतिरिक्त वैद्यकीय अधिकारी देऊन रुग्णांना सेवा देण्यात येत आहे.परिचर व सासफाई कामगार या पद भरतीसाठी मा. जिल्हा आरोग्य अधिकारी यांना पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे.

डॉ.शशिकांत सुर्यवंशी,
वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र कुऱ्हा

कुऱ्हा प्राथमिक आरोग्य केंद्रात सफाई कर्मचारी मागील पाच वर्षा पासून पद रिक्त आहे.क्लास चार चे चार पद असुन तीन पदे रिक्त आहेत तरी संबंधित विभागाने रिक्त असलेली पदे भरण्यात यावी.

संतोष भैसे,
रूग्ण सेवक तथा जिल्हा परिषद सर्कल प्रमुख प्रहार

दरम्यान, मिर्चापूर येथील आयुर्वेदिक दवाखान्यातही वैद्यकीय अधिकारी आणि परिचर ही पदे रिक्त असल्याने तेथील आरोग्य सेवांवर परिणाम होत आहे. ग्रामीण भागातील नागरिकांसाठी आरोग्य केंद्रे आणि दवाखाने हेच उपचाराचे प्रमुख आधार असताना, तेथेच आवश्यक कर्मचारी उपलब्ध नसल्याने नागरिकांमध्ये आरोग्य विभागाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.एकीकडे शासन ग्रामीण भागातील आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याचा दावा करीत असताना, दुसरीकडे कुऱ्हा प्राथमिक आरोग्य केंद्र आणि मिर्चापूर आयुर्वेदिक दवाखान्यातील रिक्त पदांचा प्रश्न वर्षभरापासून प्रलंबित आहे. या गंभीर समस्येकडे आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकारी कधी लक्ष देणार? रिक्त पदे भरण्यासाठी ठोस कार्यवाही कधी होणार? असा संतप्त सवाल परिसरातील नागरिक उपस्थित करीत आहेत. ८५ हजार नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित हा प्रश्न लक्षात घेता, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने दखल घेऊन सर्व रिक्त पदे भरावीत आणि आरोग्य सेवा सुरळीत करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

दिवाळीनिमित्त जिल्हा परिषद कन्या शाळेत
आकाशकंदील व सजावटीच्या वस्तू निर्मिती कार्यशाळा उत्साहात

अंजनगाव बारी/वार्ताहर

अंजनगाव बारी येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळेत दिवाळीनिमित्त आकाशकंदील व विविध सजावटीच्या वस्तू तयार करण्याची कार्यशाळा उत्साहात आयोजित करण्यात आली. शाळेच्या मुख्याध्यापिका विजया झाडे तसेच शिक्षक रामेश्वर स्वर्गीय, किशोर मालोकार,संगीता मंडे व रेशमा वांगे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

या कार्यशाळेत इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थिनींनी कागद व सेंच्युरी पेपरच्या माध्यमातून आकर्षक



आकाशकंदील तयार केले. तसेच पणत्यांची सजावट, वाती, फुलवाती, तोरण, कागदी फुले आणि विविध सजावटीच्या वस्तू स्वतःच्या कल्पकतेतून साकारल्या.विशेष म्हणजे सजावटीसाठी आवश्यक असलेल्या टाकाऊ वस्तू घरून आणून त्यांचा कल्पकतेने पुनर्वापर करण्यात आला.या उपक्रमातून विद्यार्थिनींना स्वनिर्मितीचा आनंद अनुभवण्यासोबतच कल्पकता, कलात्मकता आणि हस्तकौशल्य विकसित करण्याची संधी मिळाली. अभ्यासासोबतच विद्यार्थ्यांमध्ये विविध कौशल्ये विकसित होणे आवश्यक असून, ही कौशल्ये भविष्यात जीवन जगताना निश्चितच उपयोगी ठरतात, असे मत मुख्याध्यापिका विजया झाडे यांनी व्यक्त केले.

विद्यार्थिनींनी तयार केलेल्या वस्तूंचे शाळेत आकर्षक प्रदर्शन भरविण्यात आले.यावेळी शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा स्नेहा सुनील पोकळे उपस्थित होत्या.त्यांनी विद्यार्थिनींचे कौतुक करून त्यांना गोड खाऊचे वाटप केले व दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. विद्यार्थिनींच्या कलागुणांना वाव देणारी ही कार्यशाळा उत्साहपूर्ण वातावरणात झाली.

श्रीमती आरती एल. सराफ, न्यायाधीश, कामगार न्यायालय, अगरावती

जाहीर नोटिस

वकील:- एन. जे. टावरी
जावक नं. ६०८/२०२६
कामगार न्यायालय, अमरावती
जिल्हा व सत्र न्यायालय जूनी इमारत
दूरध्वनी नं. ०७२१-२६६२२०२
दिनांक १९/०८/२०२६

केस नंबर-मिसली नेस डबल्यूसीए १२/२०२६ **पुढील तारीख २४/१२/२०२६**

Smt.Sheelabai Tulshiramgi Verma ...अर्जदार

सूचना

Anshjeet Baburaogi Kakad and Anr. ...प्रतिवादी

इस सुचना के द्वारा अवगत किया जाता है कि, उपर दिये गये आवेदकने Suresh Tulshiramji Verma का काम करते समय **दि.०६/०२/२०१४** को दुर्घटना से निधन हो गया और उनके निधन के पश्चात यह सब आवेदक इनके कानुनन वारिस है और इस न्यायालय मे अर्जी दाखिल किये है। इस कंपनीने रक्कम धनादेश के द्वारा श्रमिकः भरपाई आयुक्त, अमरावती में जमा किया गया है। नुकसान भरपाई की रक्कम **रू.१५,७१,३६९/-(रू.पंधरा लाख ऐंकाहत्तार हजार तीनशे ऐकोनसहत्तार मात्र)** इतनी रक्कम उपरोक्त आवेदक ने श्रमिक भरपाई आयुक्त कार्यालय, अमरावती में जमा कि गयी उनको वितरण करने के लिये अर्जी दाखिल कि है।

अतः इस सुचना तहत अवगत किया जाता है, कि इस न्यायालय गे जमा कि गयी नुकसान भरपाई रकम आवेदको को प्रदान करने पर अगर किसी भी वा व्यक्तीयो को आपत्ति है या उसे विरोध है तो उस प्रकार कि सुचना प्रकाशीत होने के ३० दिन के भितर न्यायालय मे दाखल करे। ३० दिन की अवधी समाप्त होने के पश्चात प्राप्त विरोध या सुचना पर विचार नही किया जाऐगा। इससे संबधित लोग ध्यान रखे।

सुनवाई की तारीखः २४/१२/२०२६

आदेशनुसार
न्यायालय लिपिक,
कामगार न्यायालय, अमरावती

शिक्का

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

३ लाख ६ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात १५३ कोटी जमा

दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना प्रत्येकी ५ हजाराची मदत

अमरावती/प्रतिनिधीः- कमी पर्जन्यमान आणि भूगर्भातील कमी जलसाठ्यामुळे यावर्षी दुष्काळस्थिती निर्माण झाली आहे. जिल्ह्यातील सर्व तालुक्यांत दुष्काळ घोषित करण्यात आला आहे. कमी पर्जन्यमानाचा खरीप पिकांवर देखील परिणाम झाला. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी दिवाळीपूर्वी प्रत्येकी ५ हजार रुपये त्यांच्या खात्यात जमा करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. त्यानुसार आतापर्यंत ३ लाख ६ हजार ७०९ शेतकऱ्यांच्या खात्यात प्रत्यक्ष रक्कम जमा करण्यात आली आहे.

एलनिनोच्या प्रभावामुळे यावर्षी पर्जन्यमान कमी झाले. त्याचा परिणाम कापुस, सोयाबिन, तुरसह अन्य पिकांवर झाला. बहुतांश भागात शेतकऱ्यांना उत्पन्नात घट आली. पुढे रब्बी आणि उन्हाळी पिकांवर देखील विपरीत परिणाम होणार आहे. अशा स्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने दुष्काळी परिस्थिती जाहीर करून उपाययोजना सुरु केल्या आहे. त्यात विविध दिलासादायक बाबींचा समावेश



आहे. दुष्काळीस्थितीमुळे हवालदील शेतकऱ्यांना तातडीचा दिलासा देण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात प्रत्येकी ५ हजार रुपये जमा करण्याची घोषणा केली होती. जिल्ह्यात सोमवार, दि. २ नोव्हेंबर पासून शेतकऱ्यांच्या आधारलिंक खात्यात रक्कम जमा केली जात आहे. तालुका व जिल्हास्तरावर खाती स्विकृत करण्यात आलेल्या आतापर्यंत ३ लाख ६ हजार ७०९ खात्यांमध्ये प्रत्येकी ५ हजार याप्रमाणे १५३ कोटी ३५ लाख ४५ हजार रुपये जमा करण्यात आले आहेत.

आतापर्यंत रक्कम जमा करण्यात आलेल्या शेतकऱ्यांची तालुकानिहाय संख्या पुढील प्रमाणे आहे. अमरावती तालुक्यात २० हजार ४६० शेतकऱ्यांना १० कोटी २३ लाख, ☞(पान २ वर)

७ तास महासमाधीस्थळावर गुरुदेव सेवकांचे आत्मक्लेश आंदोलन

साहित्यीक, कवी, विचारवंत, प्रबोधनकार आणि कीर्तनकारांची उपस्थिती



तिवसा/प्रतिनिधीः- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या श्रीक्षेत्र गुरुकुंज मोझरी येथील ५८ व्या पुण्यतिथी महोत्सवात सादर करण्यात आलेल्या निवेदनातील तरुणांच्या आंदोलनांना अराजकता संबोधण्यात आले होते. त्याशिवाय, अनेक वादग्रस्त वक्तव्य करण्यात आले. या प्रकरणावरून गुरुदेव सेवकांनी नाराजी व्यक्त केली. याच पार्श्वभूमीवर शुक्रवारी सकाळी ११ वाजल्यापासून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या महासमाधीस्थळी शेकडो गुरुदेव सेवकांनी आत्मक्लेश आंदोलन केले. ज्यामध्ये लेखक चंद्रकांत वानखडे यांच्या नेतृत्वात निवेदन देऊन दिवाळीनंतर संयुक्त बैठक घेऊन गुरुदेव सेवकांच्या मागण्यांवर चर्चा करून निर्णय घेणार असल्याचे आश्वासन गुरुदेव सेवा मंडळाचे कार्यकारिणी सदस्य एड दिलीप कोहळे, राजाराम बोथे, गोपाल कडू, टी के कठाळे यांनी दिले. यावर जर आगामी बैठकीत आंदोलनाच्या निवेदनातील मागण्यांवर समाधानकारक निर्णय झाला नाही तर पुन्हा तीव्र स्वरूपाचे आंदोलन सुरू करण्यात येणार असल्याचा इशारा आत्मक्लेश आंदोलनकर्त्यांनी दिला आहे.

पुण्यतिथी महोत्सवातील श्रद्धांजलीपर निवेदनात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या जिवनपटावर प्रकाश टाकणे गरजेचे होते. त्यांचे भजन त्यांचे कार्याचा भावनिक उलगडा करणे गरजेचे होते. मात्र, जगातील विविध घडामोडींचा उल्लेख करताना, युवकांच्या आंदोलनांच्या संदर्भात अराजकता या शब्दाचा उल्लेख झाल्यानंतर युवकांमध्ये नाराजी पसरली होती. त्याशिवाय, धर्मनिरपेक्षता, सर्वधर्मसमभाव, मानवतावाद यावर प्रश्न उपस्थित केले होते. त्यामुळे राष्ट्रसंतांच्या विचारांचा वारसा जपणाऱ्या तरुणांच्या आंदोलनाबाबत अराजक शब्दप्रयोग का करण्यात आला, असा सवाल ☞(पान २ वर)

परतवाडात नॉर्मल प्रसूतीनंतर महिलेचा मृत्यू

-कुटुंबीयांचा रुग्णालयात आक्रोश

डॉक्टरांवर निष्काळजीपणाचा आरोप

अचलपूर/प्रतिनिधीः- परतवाडा येथील एका खासगी रुग्णालयात सामान्य प्रसूतीनंतर ३२ वर्षीय महिलेची तब्येत बिघडून वेळेवर योग्य उपचार न मिळाल्याने मृत्यू झाल्याचा गंभीर आरोप परिजनांनी केला आहे. यामुळे वैद्यकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

घरात नवजात शिशूच्या आगमनाचा आनंद काही तासांतच मातमात बदलला. या घटनेमुळे नवघरे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मृत महिलेचे नाव माधवी वैभव नवघरे असे आहे. परिजनांच्या म्हणण्या नुसार, प्रसूती पीडा सुरू झाल्यानंतर माधवीला परतवाडा येथील डॉ. श्रीकांत धुमाले यांच्या रुग्णालयात भरती करण्यात आले होते. सकाळी १० वाजून १८ मिनिटांनी तिने एका निरोगी बाळाला जन्म दिला. प्रसूती सामान्यरित्या झाल्यानंतर डॉक्टरांनी आई आणि नवजात बाळाला जनरल वॉर्डमध्ये हलविले.



परिजनांचा आरोप आहे की, डिलिव्हरी नंतर काही वेळातच माधवीची प्रकृती बिघडू लागली. मात्र वेळेवर योग्य उपचार न मिळाल्याने दुपारी २ वाजता तिने अखेरचा श्वास घेतला.या प्रकरणी परिजनांनी रुग्णालयात हंगामा करून डॉक्टर आणि रुग्णालय प्रशासनावर कारवाईची मागणी केली आहे.

आता सर्वांचे लक्ष पोलीस तपास, आरोग्य विभागाची कारवाई आणि पोस्टमॉर्टम अहवालाकडे लागले आहे.

भरधाव वाहन अनियंत्रित झाल्याने अपघात

सुदैवाने बचावला चालक

तिवसा/प्रतिनिधीः- नागपूरवरून मुंबईकडे अमरावतीच्या दिशेने जाणाऱ्या एका मिनी मालवाहू भरधाव वाहनाचा अनियंत्रित होऊन मध्यरात्री ३ वाजताच्या सुमारास अपघात झाला.राष्ट्रीय महामार्गावरील तिवसा बसस्थानकासमोर असलेल्या स्पीडब्रेकरवर ही घटना घडली.

प्राप्त माहितीनुसार, MH ०४ NB-८७९८ हे वाहन नागपूर वरून मुंबईकडे तिवसामार्गे गुरुवारी मध्यरात्री ३ वाजताचे सुमारास भरधाव जात होते.दरम्यान तिवसा बसस्थानकाजवळ असलेल्या स्पीडब्रेकरवर समोरील एका



वाहनाने ब्रेक दाबताच मागून येणारे मिनी ट्रक वाहन त्यावर आदळले व या अपघातात मागील वाहनाचा समोरील भागाचा चुराडा झाला मात्र सुदैवाने वाहन चालक यात बचावला. त्याला कुठलीही दुखापत झाली नाही.तिवसा पोलिसांनी घटनेची नोंद घेतली आहे.

कपाशी लाल्या रोगाच्या विळख्यात

दुसऱ्या वेचणीतच उलंगवाडी,शेतकरी हवालदिल

नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः- यावर्षी तालुक्यात पाऊस अनियमित व कमी प्रमाणात राहिला व अनुकूल नैसर्गिक वातावरणाची साथ मिळत नसल्याने त्याचा परिणाम पिकावर होत आहे. आधीच नैसर्गिक संकटाने अडचणीत असलेल्या कपाशी उत्पादक शेतकऱ्यांसमोर असमतोल वातावरणामुळे कपाशी पिकावर लाल्या नावाच्या रोगाचे नवीन संकट उभे ठाकले असल्याने दुसऱ्या वेचणीतच कापसाची उलगवाडी होण्याचे चिन्ह दिसत आहे. त्यामुळे शेतकरी पूर्णतः हवालदिल झाला.

हल्ली अनेक शेतामधील



कपाशीच्या झाडाचे पाने लालसर होत असून गळून जात आहे. पाने लाल होणे, बोंड गळणे व बोंडासह कपाशीचे संपूर्ण झाड सुकणे या प्रकार वाढत झाल्याचे चित्र दिसून येत आहे. मेहनतीने तयार केलेले पीक हाता तोंडाशी आल्यावर रोगाला बळी पडून खराब होत असल्याने शेतकरी हतबल झाला आहे.

यावर्षी कपाशी पिकाच्या लागवडी पासून शेतकऱ्यांना नैसर्गिक संकटासह अडचणीचा सामना करावा लागला. मशागती पासून बियाणे खते कीटकनाशक औषध फवारणी यावर मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी खर्च केला परंतु पावसाचे प्रमाण कमी व पावसात पडणारा मोठा खंड शिवाय नैसर्गिक वातावरणातील बदल, जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होत असल्याने जमिनीतून झाडाला मिळणारे अन्नद्रव्याची कमतरता यामुळे पिकाच्या वाढीवर परिणाम होऊन तालुक्यातील ☞(पान २ वर)

फायनान्स कर्मचाऱ्यांचा मोर्चा

कर्जवसुलीसाठी जाताना राजकीय धमक्यांचा आरोप



अमरावती/प्रतिनिधीः- कर्जवसुलीसाठी गावा गावात जाताना राजकीय पदाधिकारी आणि काही संघटनांकडून धमकावले जात असल्याचा गंभीर आरोप करत जिल्ह्यातील फायनान्स कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांनी आज शुक्रवार ६ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. कर्मचाऱ्यांना संरक्षण द्यावे आणि धमकावणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,

कर्जवसुली दरम्यान कर्मचाऱ्यांना धमकावणाऱ्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करावेत. कर्मचाऱ्यांना पोलीस संरक्षण द्यावे, नियमा प्रमाणे वसुली करणाऱ्या कर्मचाऱ्यांना राजकीय दबावाखाली काम करण्यास भाग पाडू नये. ☞(पान २ वर)

अल्पवयीन मुलीचे अपहरण करून सामूहिक अत्याचार प्रकरणात दोघांना जन्मठेप

चांदुर रेल्वे पोलीस स्टेशन हद्दीतील घटना

अमरावती/प्रतिनिधीः- दुकानातून चिप्सचा पुडा आणण्यासाठी घराबाहेर पडलेल्या अल्पवयीन मुलीला आजीकडे सोडण्याचे आमिष दाखवून दुचाकीवर बसविले आणि तलावावर नेत तिच्यावर सामूहिक अत्याचार करण्यात आल्याची धक्कादायक घटना चांदूर रेल्वे तालुक्यात घडली होती. जून २०२४ मधील या प्रकरणाचा न्यायालयीन निकाल लागला असून, जिल्हा व सत्र न्यायालय क्रमांक ५ च्या न्यायाधीश एस. एम. कनकदंडे यांनी दोन आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. शिवाजी बंडू चौधरी आणि राजेश ऊर्फ राजा शंकरराव कोहळे अशी शिक्षा झालेल्या आरोपींची नावे आहेत. चांदूर रेल्वे परिसरात २९ जून २०२४ रोजी ही घटना घडली. न्यायालयात सादर झालेल्या अभियोजन पक्षाच्या माहितीनुसार, घटनेच्या दिवशी पीडिता आणि तिची मोठी बहीण घरी होत्या. याचवेळी राजेश ऊर्फ राजा कोहळे त्यांच्या घरी आला. आई-वडील घरी नसल्याची खात्री केल्यानंतर त्याने अन्य आरोपींना



फोन करून बोलावले. काही वेळाने पीडितेच्या बहिणीने तिला पाच रुपये देऊन दुकानातून चिप्स आणण्यासाठी पाठविले. पीडिता दुकानाकडे जात असताना शिवाजी चौधरी याने तिला रस्त्यात अडविले. आजीकडे सोडून देण्याचे सांगत त्याने तिला दुचाकीवर बसविले आणि गावातील तलावावर नेले. तेथे अन्य आरोपीही पोहोचले. त्यानंतर शिवाजी चौधरी आणि राजेश कोहळे यांनी पीडितेला मारहाण करीत तिच्यावर अत्याचार केल्याचे समोर आले. घटनेनंतर पीडिता आणि तिचे कुटुंबीय भीतीच्या वातावरणात होते. त्यामुळे तातडीने पोलिसांत तक्रार दाखल झाली नाही. अखेर ५ जुलै २०२४ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्याकडे या घटनेची माहिती पोहोचली. त्यानंतर चौकशी करण्यात आली आणि पीडितेच्या मोठ्या बहिणीने तक्रार दाखल केली. चांदूर रेल्वे पोलिसांनी गुन्हा नोंदवून आरोपींना अटक केली. तपास पूर्ण ☞(पान २ वर)

विजेच्या तारेच्या संपर्कात आल्याने चिमुकलीचा मृत्यू

पश्रोट जवळील वाल्मीकपूरची घटना

अमरावती/प्रतिनिधीः- जिल्ह्यात पाण्याच्या टंचाईदरम्यान घरांमध्ये पाणी भरण्यासाठी विजेच्या मोटरचा वापर आता जीवघेणा ठरू लागला आहे. अशीच एक हृदयद्रावक घटना गुरुवार, ५ नोव्हेंबर रोजी पश्रोट जवळील वाल्मीकपूर गावात घडली. घरात नळाने पाणी खेचण्यासाठी लावलेल्या इलेक्ट्रिक मोटरच्या उघड्या विजेच्या केबलच्या संपर्कात आल्याने १ वर्ष २ महिन्यांच्या चिमुकलीचा करंट लागून मृत्यू झाला. या हृदयद्रावक घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मृत चिमुकलीची ओळख नव्या उर्फ प्रगती सतीश इंगोले अशी झाली आहे.



माहितीनुसार, कासमपूर ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या वाल्मीकपूर गावात सध्या पाण्याची समस्या गंभीर बनली आहे. गावात जलापूर्तीच्या पाइप लाइन मधून पाण्याचा दाब कमी होत असल्याने अनेक परिवार आपल्या घरच्या नळांवर इलेक्ट्रिक मोटर लावून पाणी खेचत आहेत. गुरुवारी सकाळी सतीश इंगोले यांच्या घरातही नळावर पाणी भरण्यासाठी इलेक्ट्रिक ☞(पान २ वर)

आ.प्रवीण पोटे पाटील यांचा सामाजिक बांधिलकीचा अनोखा आदर्श

वाढदिवसाच्या शुभेच्छांचे रूपांतर शेतकरी कुटुंबांच्या मदतीत!

अमरावती/प्रतिनिधीः- दुष्काळाच्या भीषण परिस्थितीचा सामना करणाऱ्या शेतकरी बांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे ही केवळ सामाजिक जबाबदारी नसून आपले कर्तव्य आहे, ही भावना मनात ठेवून आमदार प्रवीण पोटे पाटील यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त एक अभिनव आणि प्रेरणादायी संकल्पना मांडली. वाढदिवसाच्या निमित्ताने होणारा अनावश्यक खर्च टाळून तो दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या मदतीसाठी वळविण्याचे आवाहन त्यांनी केले होते.



वाढदिवसानिमित्त फ्लेक्स बॅनर, जाहिराती, हार-तुरे यावर अनावश्यक खर्च न करता शुभेच्छा देण्यासाठी येणाऱ्या आप्तेष्ट, हिताचिंतक, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी त्यासाठी खर्च होणारी रक्कम त्यांच्या जनसंपर्क कार्यालयात ठेवण्यात आलेल्या मुख्यमंत्री सहायता निधीच्या मदतपेटीत जमा करावी, असे आवाहन आमदार पोटे पाटील यांनी प्रसिद्धी माध्यमांद्वारे केले होते. त्यांच्या या सामाजिक जाणीवेतून केलेल्या आवाहनाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. वाढदिवसानिमित्त हजारो नागरिकांनी जनसंपर्क कार्यालयात प्रत्यक्ष भेट देऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी अनेकांनी आपापल्या परीने शक्य ती आर्थिक मदत मदतपेटीत जमा करून दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या मदतीसाठी खारीचा वाटा उचलला. या उपक्रमातून जवळपास लाखो रुपयांचा निधी मुख्यमंत्री सहायता निधीसाठी जमा झाला. ☞(पान २ वर)

दोन दिवसांत गुटख्याची १३ प्रकरणे उघड

ग्रामीण पोलिसांचे छापासत्र

अमरावती/प्रतिनिधीः- शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटख्याची ग्रामीण भागात सर्रास विक्री होत असल्याचे पुन्हा एकदा पोलिसांच्या कारवाईतून समोर आले आहे. अमरावती ग्रामीण पोलिसांनी अवघ्या दोन दिवसांत जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत छापे टाकून गुटखा विक्रीची १३ प्रकरणे उघडकीस आणली. या कारवाईत एकूण १ लाख ४६ हजार ४५३ रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व अन्य मुद्देमाल जप्त करण्यात आला. 'ऑपरेशन कवच' अंतर्गत ही विशेष मोहीम राबविण्यात आली. ४ आणि ५ नोव्हेंबर रोजी ग्रामीण पोलिसांनी प्रतिबंधित गुटख्याच्या विक्रीविरोधात विशेष मोहीम हाती घेतली. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांसह संबंधित पोलीस ठाण्यांच्या पथकांनी विविध ठिकाणी तपासणी आणि छापासत्र राबविले. या मोहिमेत ब्राह्मणवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन, मोर्शी येथे दोन, खोलापूर येथे दोन, तर परतवाडा, शिरखेड, माहुली जहागीर, खल्लार, येवदा, बेनोडा आणि धारणी पोलीस ठाण्यांच्या हद्दीत प्रत्येकी एक कारवाई करण्यात आली. ☞(पान २ वर)

समृद्धी महामार्गावर ट्रकची कारला धडक, एकाचा मृत्यू

-धामणगाव रेल्वेजवळ भीषण अपघात; दोघे गंभीर

अमरावती/प्रतिनिधीः- नागपूरच्या दिशेने जाणाऱ्या चारचाकी वाहनाला पाठीमागून आलेल्या भरधाव ट्रकने जोरदार धडक दिल्याने समृद्धी महामार्गावर भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा येथील अशोक अंभोरे (वय ४०) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर अन्य दोघे गंभीर जखमी झाले. अपघातानंतर ट्रकचालक वाहन घटनास्थळीच सोडून पसार झाला.

दत्तापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील समृद्धी महामार्गाच्या नागपूर कॉरिडोअरवर, आयसी-६, चॅनल क्रमांक ९९+९०० येथे शुक्रवारी ६ नोव्हेंबर रोजी पहाटे पाचच्या सुमारास ही घटना घडली. अक्षय ठाकरे (वय २७), अशोक अंभोरे आणि अमित पांडे (वय ४५) हे तिघे एमएच ३४ सीडी २६९९ क्रमांकाच्या चारचाकी वाहनाने नागपूरकडे प्रवास करीत होते. त्याचवेळी मागून आलेल्या एनएल ०१ एजे ३३४३ क्रमांकाच्या ट्रकने त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता मोठी असल्याने कारमधील तिघेही गंभीर जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच महामार्ग सुरक्षा पथकातील नरेंद्र मेश्राम, स्नेहल तायडे आणि लखन राठोड यांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केले. तिन्ही जखमींना तातडीने धामणगाव रेल्वे येथील ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, उपचार सुरू असताना अशोक अंभोरे यांची प्राणज्योत मालवली. ☞(पान २ वर)

घरातच गांजाचा साठा; २३ हजारांचा मुद्देमाल जप्त

मुगलाईपुऱ्यात परतवाडा पोलिसांची धाड

अमरावती/प्रतिनिधीः- घरातूनच गांजाची विक्री करण्याच्या तयारीत असलेल्या एका व्यक्तीचा परतवाडा पोलिसांनी छापा टाकून पर्दाफाश केला. मुगलाईपुऱ्यातील आरोपीच्या घरातून २३ हजार रुपये किमतीचा गांजा जप्त करण्यात आला. जमील हुसैन साबीर हुसैन (वय ३९, रा. मुगलाईपुरा, परतवाडा) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. जमील हुसैन याने विक्रीच्या उद्देशाने घरात गांजा साठवून ठेवल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीची पडताळणी केल्यानंतर परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षक आशिषकुमार साळुंखे यांच्या नेतृत्वातील पथकाने गुरुवारी ५ नोव्हेंबर रोजी त्याच्या घरी धाड टाकली. पोलिसांनी घराची झडती घेतली असता एका छोट्या पोत्यामध्ये गांजा आढळून आला. पोलिसांनी हा साठा जप्त केला. त्याचे वजन ०.४६७ असल्याची नोंद असून, बाजारमूल्य अंदाजे २३ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. यानंतर जमील हुसैन याला ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. त्याच्याविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई परतवाडा पोलीस ठाण्याचे ठाणेदार अजय आकरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पथकात परिविक्षाधीन ☞(पान २ वर)





